५ एप्रिल १९६९ : ४० पैसे

# माणूस

५, कोल्हापूर

स. न. २६-३-६९

'माणूस'च्या २२ मार्चच्या अंकातील 'श्रमिक नगरची कहाणी' वाचून मनाला जे समाधान लाभले ते व्यक्त करण्याकरिता दोन ओळी लिहीत आहे. व्यक्तिगत व सामाजिक मन यातील प्रेरणांचे झरे मोकळे झाले म्हणजे लुळा पांगळा झालेला पुरुषार्थ कसा धावू लागतो याचे सुरेख चित्र त्या कहाणीत आहे. अशा प्रेरकतेची पूजा हे माणूसचे पहिल्यापासूनचेच वैशिष्टय आहे. ते सतत प्रभावी होत राहो हीच इच्छा.

वि. स. खांडेकर



समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : पंचेचाळीसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. मार्च, २१

सध्या ' रातराणी ' सदर बंद का केले ? वसु भगत लिखित जे निनावी सदर सुरू केले आहे ते ' रातराणी 'ची नक्कल वाटते. वसु भगत लिहितात चांगले. ' काळेबेट ' च्या भल्यामोठ्या परीक्षणात ते पात्रांच्या कामाबद्दल लिहायला विसरलेले दिसतात.

तुमचे ' मुंबई समाचार ' सदर बरे असते, पण त्यात ' मुंबई ' नसतेच मग त्या सदराला ' मुंबई समाचार ' हे नाव का ? झुंड चांगली आहे. पण लेखक मूळ मुद्यावर केव्हा येणार ? त्यात पाकिस्तानबद्दलची चर्चाच जास्त असेल तर ही दुसरी ' Untold Story ' होईल इतकेच. ' मार्ग ' नंतर ' श्रमिक नगर ' निमित्ताने आपली भेट झाल्याचे समाधान मिळाले.

अनिल देशपांडे, मुंबई

स. न. मार्च, २२

आपल्या साप्ताहिकात लिहिणारे लोक ठरून गेल्याने त्यांची विचार करण्याची पद्धतही ठरून गेली आहे. दळवींच्या पुस्तकात फापटपसाराच जास्त दिसतो. ' काळे बेट ' वरील दहा पानांचे परीक्षण जाहिरात थाटाचे वाटते. विनंती—नवीन लेखकांकडून लेख मागवावे. एखादा लेख तरी वेगळ्या विचाराचा असावा.

श्री. ग. बापट, विले पारले

किंमत : ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

सु. ल. सोमण

# सव्वा कोटीची धाड!

श्रीवर्धन, पनवेल, मुरुड - जंजीरा, गुजराथ वगैरे कित्येक मैलांपर्यंत पसरलेल्य प्रदेशात जवळ जवळ सतत महिनाभर मिळालेल्या वेगवेगळ्या बातम्यांच्या आधारे तपास करून, अविश्रांत धडपड करून मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचे अधिकारी, कर्मचारी दमूनभागून, कंटाळून, बुधवारी मुंबईला परतले. दोनच दिवस जेमतेम मध्ये गेले आणि शुक्रवारी संध्याकाळी एक खबऱ्या त्यांच्या कार्यालयात शिरला. ज्याच्यासाठी भटक भटक भटकंती केली, तो मुद्देमाल किनारपट्टी सोडून खुद्द मुंबईतच असल्याची बातमी कार्यालयात आली; आणि मग सर्वांची एकच धावपळ उडाली. फोन खणखणू लागले, निरनिराळ्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना जमा केले जाऊ लागले. शनिवारी, दि. २२ मार्चची पहाट उजाडता उजाडताच, मुंबईच्या पेडर रोडवरील आलिशान वस्तीतल्या मफतलाल पार्कमध्ये उभा असलेल्या दोन भपकेबाज अँबॅसडर गाड्यांवर धाड घालून लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी एक कोटी, अठरा लक्ष, पंचवीस हजार रुपयांचे चोरटे सोने जप्त केले, आणि गेल्या दोन वर्षांपासून उघडलेल्या चोरट्या सोन्याविरुद्धच्या आघाडीच्या कार्यातले विक्रमी यश संपादले. अरबी गलबतांतून, दुबईहून हा माल भारतात आला असावा, असा निरीक्षकांचा कयास आहे. जप्त करण्यात आलेले हे पंचावन्न हजार तोळे चोरटे सोने, पंधरा गोण्यांमधून पंचावन्न जाकिटांतून आणलेले होते. प्रत्येक जाकिटात दहा - दहा तोळ्यांच्या शंभर चिपा होत्या; आणि ह्या सर्व चिपांवर पाश्चात्य मुद्रा होत्या.

गेल्या दोन वर्षांतली, लाचलुचपत प्रतिबंधक पोलिसांची ही सत्त्याहत्तरावी धाड. आणि ह्या एकूण धाडींमध्ये जवळ जवळ अकरा कोटींचे सोने पोलिसांनी पकडले. चोरटी आयात हा वास्तविक कस्टम्स अधिकाऱ्यांच्या अखत्यारीतला विषय. कस्टम्स एक्साईझ अधिकाऱ्यांच्यादेखील अशा धाडी नियमितपणे चालू असतात आणि तरीही फार मोठी चोरटी आयात दुर्लक्षित राहत होती. त्याला थोडाफार पायबंद बसावा म्हणूनच पोलिसांची ही आघाडी उघडली गेली. आणि

गेल्या दोन वर्षांत ह्या आघाडीने खरोखरच आश्चर्यकारक यश संपादले आहे. अर्थात हे यश त्यांना सहजासहजी मिळालेले नाही. त्यासाठी खात्याचे प्रमुख श्री. मिरांडा, श्री. मेसाडिया, त्यांचे इतर सहकारी व शिपाई इत्यादींनी अविश्रांत परिश्रम उचलेले आहेत. कधी कधी आठ-आठ, पंधरा-पंधरा दिवस दूरवर जंगलात राहून त्यांनी खडे पहारे दिलेले आहेत, तर कधी कधी एवढ्या धडापडीनंतरही, त्यांना मिळालेली बातमी चुकीची ठरे, तर कधी पोलिसांच्या हालचालींची बातमी चोरट्यांना अचूक मिळून, त्यांनी मार्ग बदललेला असे. चोरट्यांचा पाठलाग करता करता ह्या अधिकाऱ्यांच्या जिवावरदेखील अनेकदा बेतले होते. पनवेलजवळच्या जंगलातून, दरीतल्या रस्त्यावरून पाठलाग करताना एकदा त्यांच्या जीपला ट्रकची जाणूनबुजून धडक देऊन, उलटण्याचा प्रयत्न चोरट्यांनी केला. त्या वेळी हे सर्वच अधिकारी प्राणावरच्या संकटांतून जेमतेम बचावले. एवढेच नाही, तर त्या ट्रकच्या ड्रायव्हरला मुंबईत एक गाडी चालवताना त्या प्राणसंकटानंतर त्यांनी थोड्याच वेळात ओळखले, त्या गाडीचा पाठलाग केला आणि परळ नाक्यापाशी गाडी, ड्रायव्हर व चोरट्या आयातीचा माल—तिन्ही पकडले. एकदा लाँचमधून समुद्रात गस्त घालीत असता, ह्यांच्या लाँचमध्येच पाणी शिरले. नावेसकट सर्वांना जलसमाधी मिळणार की काय, अशी भीती निर्माण झाली; पण केवळ बलवत्तर नशीब, आणि प्रखर मनोधैर्य ह्यांमुळेच ते सर्व बचावले. लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या ह्या चोरटी आयात-विरोधी आघाडीच्या दोन वर्षांच्या लहानशा कारकीर्दीत अशा कितीतरी रोमहर्षक घटना घडल्या. त्यांची जंत्री स्वतंत्रपणेच द्यावी लागेल. एवढे मात्र खरे की, दोन वर्षांतल्या ह्यांच्या कार्याने एक वेगळा इतिहास घडवला आहे. परवाच्या आलिशान वस्तीतल्या सव्वा कोटींच्या धाडीनंतर मुंबईच्या बाजारात जी धालमेल झाली आणि सोन्याचे भाव एकदम कडाडले त्यावरूनच हे सहज लक्षात येईल.

पण एवढे प्रचंड प्रयत्न होत असूनही चोरट्या आयातीचे जे सोने किंवा माल पकडला जातो, तो एकूण चोरट्या आयातीच्या जेमतेम एकदशांशच असावा, असा निरीक्षकांचा कयास आहे. ह्यामुळे सध्या देशातल्या चोरट्या आयातीच्या उद्योगाचे स्वरूप केवढे प्रचंड आहे ह्याची पुसट कल्पना यावी. सोन्याची चोरटी आयात अरबी व पारशी सामुद्रधुनीतल्या दुबई, कुवैत, बहारीन वगैरे छोट्या छोट्या राज्यांतून होते. ह्या ठिकाणी सोन्यावर कसलेही निर्बंध नाहीत. आणि सोन्याचा भाव जेमतेम ५० रु. तोळ्याच्या आसपास आहे. तेथून हे सोने, सर्व कर चुकवून भारत, पाकिस्तान, ब्रह्मदेश, मलाया आदी आशियायी राष्ट्रांत चोरट्या मार्गांनी आणले जाते नि जवळ जवळ चौपट—पाचपट फायदा उचलून ते ह्या देशांतून विकले जाते. खास तयार केलेल्या गलवतांतून किंवा मसाले व इतर पदार्थांच्या व्यापाऱ्यांच्या जहाजांतून ह्या सोन्याची ने-आण चालते. विविध टोळ्यांमार्फत ह्यांचे काम

चालते आणि जवळ जवळ सर्वच देशांतून, खालपासून—वरपर्यंत, सर्वच थरांतून ह्यांच्या हस्तकांचे जाळे पसरलेले असते. क्वचित कुठे सोने पकडलेच गेले तर बहुधा नुसत्या गाड्या किंवा फार तर एखाद-दुसरा ड्रायव्हर सापडतो. ह्या ड्रायव्हरांना बहुधा काहीच माहिती नसते व त्यांनाही सोडवण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले जातात. ज्या गाड्या पकडल्या जातात त्यांचे मालक एकतर कधीच भारत सोडून गेलेले ब्रिटिश वा अन्य पाश्चात्य तरी असतात, किंवा अनेक वेळा चोरीच्या गाड्यांचा उपयोग होत असतो आणि म्हणून ह्या प्रचंड चोरट्या आणि देशविघातक धंद्यांच्या बुडाशी असणाऱ्या बड्या असामींविरुद्ध पुरावा सापडून ते पकडले जात नाहीत तोवर काही कोटींचे सोने आणि काही गाड्या पकडल्या जाऊन त्यांना फारसे नुकसान कधीच पोचणार नाही. एका संबंधित पोलिस-अधिकाऱ्याशी बोलण्याचा योग आला असता त्यानेही हेच मत व्यक्तविले; परंतु त्याने हेही सांगितले की, कदाचित तशी वेळही लवकरच येईल. काही का असेना ही धाड, हा आशावादही थोडका नसे. आणि म्हणूनच श्री. मिरांडा, भेसाडिया—कुलकर्णी—लागली—सोमण आणि मंडळी, अभिवादन !

# चिमुकल्या बेटाची शोककथा

अँग्वीला ! कॅरेबियन समुद्रातले छोटेसे बेट. चौतीस चौरस मैलांचे सारे क्षेत्रफळ आणि एकूण लोकवस्ती फक्त सहा हजार. बेटावर ना इलेक्ट्रिसिटी, ना टेलिफोन; तिथे ना आरमार, ना पोलीस दल. प्यायच्या पाण्याचे नळसुद्धा ह्या चिमुकल्या बेटाने पाहिलेले नाहीत. जगाचा नकाशा बघू गेले तर, त्रिनिदाद, टोबॅग, बार्बाडोस, जमैका, बहामा वगैरे वेस्टइंडियन बेटांच्या वर्तुळाच्या मध्यभागी, अँग्वीलाचा छोटासा, पूर्णविरामाच्या आकाराचा ठिपका दिसेल. हे असे लहानसे, संपूर्णपणे अपरिचित असलेले बेट परवा अचानक प्रसिद्धीला आले. ब्रिटनच्या फौजा विमानातून, समुद्रातून ह्या चिमुकल्या बेटावर उतरल्या आणि जगातल्या बहुतेक सर्व वृत्तपत्रांनी अँग्वीलाला पहिल्याच पानावर मानाचे स्थान दिले. इथे शिरलेल्या ब्रिटिश फौजांशी प्रतिकार होणे शक्यच नव्हते. अँग्वीला म्हणजे काही स्मिथ सरकारचा ऱ्होडेशिया नव्हता. पाठोपाठ ब्रिटनने आपला हायकमिशनर म्हणून श्री. टोनी ली ह्यांची नेमणूक केली. त्यांच्या नेमणुकीविरुद्ध निदर्शने झाली, त्यांच्या गाडीला गराडा घालायचा प्रयत्न केला गेला, ब्रिटिश फौजांना ' चलेजाव ' सांगितले गेले—एवढाच काय तो प्रतिकार अँग्वीलाच्या प्रजाजनांनी केला. तेवढेच करणे त्यांना शक्य होते. ब्रिटनच्या पार्लमेंटमध्ये ह्याविषयी घोषणा करताना, संबंधित मंत्र्यांनी सांगितले की, ब्रिटनच्या फौजा तेथे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी

गेलेल्या आहेत. सुनियंत्रित राज्ययंत्रणा निर्माण होताच त्या परत बोलावल्या जातील. ब्रिटनने आपल्या जुन्या वसाहतींना स्वातंत्र्य बहाल केल्यानंतर, त्या वसाहतींवर पुनश्च कबजा मिळवण्याची ही पहिलीच वेळ आहे नि म्हणूनच त्याविरुद्ध जगभर निषेध व्यक्तविला जात आहे. अँग्वीलांनी आपल्या केंद्रसत्तेविरुद्ध बंड पुकारून स्वतःचे स्वातंत्र्य घोषित केले म्हणूनही ब्रिटनची ही कृती. परंतु नेमक्या अशाच तऱ्हेच्या ऱ्होडेशियातल्या स्मिथ सरकारच्या कृत्याविरुद्ध मात्र ब्रिटनने कसलीही कृती केली नाही. कदाचित् स्मिथ-सरकारजवळ अधिक सामर्थ्य असल्यामुळे ब्रिटन त्यांच्याविरुद्ध भरीव उपाययोजना करण्यास धजावला नसावा; किंवा कदाचित् स्मिथ-सरकार किती झाले तरी गोरे सरकार आहे आणि अँग्वीलाचे डॉ. वेब्स्टर सरकार हे काळे सरकार आहे हा भेदही ब्रिटन सरकार विसरू शकले नसावे. ही शंका खुद्द न्यूयॉर्क टाईम्सनेदेखील व्यक्तविली आहे. काही का असेना, ब्रिटनच्या ह्या कृतीविरुद्ध जगभर विरोध व्यक्तविला जात आहे आणि आता अँग्वीलाचे अध्यक्ष म्हणवून घेणारे डॉ. वेब्स्टर गुप्तपणे 'यूनो'च्या मध्यवर्ती ठिकाणी पोचले असून, तेथून ते अँग्वीलाच्या स्वातंत्र्येच्छेला जागतिक लोकमताचा पाठिंबा मिळवून द्यायचा व त्यामार्गे ब्रिटनवर दडपण आणण्याचा प्रयत्न करू पाहत आहेत. 'यूनो'च्या 'वसाहतवाद' विरोधी समितीनेदेखील आपला निषेध व्यक्तवून, अँग्वीलात


मातांनो
आपले बाळ
निरोगी असावे
असे आपल्याला
वाटते ना ?
बाळाच्या
कोणत्याही तक्रारींवर
खालील ठिकाणी
वैद्यकीय सल्ला
मिळेल.

न्यू इरा
होमिओपॅथिक
फार्मसी

दादर रेल्वे स्टेशनसमोर,
(पश्चिम) मुंबई–२८

समितीचे पाहुणीमंडळ पाठवायचा निर्णय घेतला आहे !

अँग्वीला हे छोटेसे बेट फ्रेंच दर्यावर्दींना प्रथम गवसले. त्यापाठोपाठ ब्रिटीशही ह्या बेटावर आले. ब्रिटन-फ्रेंचांच्या बऱ्याच वर्षांच्या तंटयांनंतर १८४० च्या सुमारास ह्या बेटावरची ब्रिटिशांची मालकी निर्विवादपणे सिद्ध झाली. त्यानंतर १९६७ पर्यंत ब्रिटिशांनी ह्या बेटावर राज्य केले. तिथल्या विविध मळयांच्या मशागतीसाठी आणलेल्या काळया आफ्रिकनांचे व निग्रोंचेच ह्या बेटावर वास्तव्य. ह्या छोटयाशा बेटातला मुख्य व्यापार म्हणजे मीठ व खेकडे, काही थोडे मळे. बहुतेकांचा आर्थिक डोलारा सांभाळला जातो तो, अमेरिका, कॅनडा व इतर अनेक ठिकाणी विखुरलेल्या अँग्वीलियन तरुणांनी त्या त्या देशात कमावून पाठवलेल्या मिळकतीच्या जोरावर. १९६७ मध्ये अँग्वीला, अँटीग्वा सेंट कीट्स् (नेव्हिस्) ह्या तीन बेटांचे संयुक्त राज्य निर्माण करून, ह्या राज्याला, वेस्टइंडियन बेटांतर्गत स्वायत्तता ब्रिटनने दिली. फक्त संरक्षण व परराष्ट्र संबंध ब्रिटनने स्वत:जवळ ठेवले. परंतु ह्या राज्याच्या निर्मितिपासूनच स्वातंत्र्येच्छू अँग्विलियनांनी ह्या राज्याला विरोध केला. सेंट किट्स् येथील मध्यवर्ती शासनाचे वर्चस्व झुगारून देऊन, डॉ. वेबस्टर ह्या अँग्विलियन नेत्याने अँग्वीलाच्या प्रजासत्ताक राज्याच्या निर्मितीची घोषणा केली. बंदुकीच्या नळीच्या जोरावर ब्रिटनच्या अँग्वीलातील प्रतिनिधीला पळवून लावले. परंतु डॉ. वेबस्टर ह्यांनी घोषित केलेले स्वातंत्र्य औट घटकेचेच ठरले आणि परवा १८ मार्चला ब्रिटिश फौजांनी अँग्वीलासारख्या नि:शस्त्र राज्यावर शस्त्रसज्ज फौजा पाठवून आक्रमण केले. त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. ब्रिटन आता कितीही साधनशुचितेच्या गप्पा मारू देत पण त्यांच्या ह्या आक्रमणाचा पत्ता त्रिनिदादच्या पंतप्रधानांनादेखील नव्हता व त्यांनीदेखील ह्या उघडया-नागडया आक्रमणाबद्दल नापसंतीच व्यक्तविली. वास्तविक हा प्रश्न सेंट किटस, अँटिग्वा व अँग्वीला ह्यांच्या संयुक्त राज्याचा अंतर्गत प्रश्न, ब्रिटनचा त्यात संबंधच नव्हता. परंतु ब्रिटनने स्वत:च्या स्वार्थापायी, गुलामगिरी अँग्वीलियनांवर लादली. ब्रिटनचे हे आक्रमण म्हणजे ' युनो 'च्या वसाहतवाद-विरोधी समितीलाच एक जबरदस्त आव्हान आहे.

---

# तमाशाचा तिसरा अंक सुरू होत आहे

---

सावधान मंडळी ! मध्यप्रदेशातल्या राजकीय मंचावर सध्या चालू असलेल्या राजकीय तमाशाचा तिसरा अंक सुरू होत आहे. हा अंक सुरू व्हायला थोडा विलंब आहे. तोपर्यंत मागील दोन अंकांचेच समालोचन करू.

आतापर्यंतच्या दोन अंकांतली सर्वांत मोठी गंमत ही की, ह्यात खलनायकांचा झाला आहे सुळसुळाट आणि खऱ्या नायकाचा अद्याप कुठे पत्ताच नाही. पहिला

खलनायक मध्यप्रदेशाचे भूतपूर्व मुख्यमंत्री, काँग्रेसचे मध्यप्रदेशातले सर्वकाही श्री. मिश्राजी. देशात सर्वत्र काँग्रेसची लक्तरे वेशीवर टांगली जात असता, ह्या साहेबांनी मध्यप्रदेशात काँग्रेसला निवडून आणले. अगदी ग्वाल्हेरच्या राजमातांना दूर सारूनही आणि स्वत:चे मंत्रिमंडळ बनवले. पण राजमाताही पक्क्या, त्यांनी गोविंद नारायण सिंग ह्यांचे प्यादे पुढे सरकवले नि मिश्राजींना शह दिला. संविदची स्थापना झाली. जनसंघीय, संसोपावले, डावे–उजवे लालबावटे, –सगळ्यांची मोट राजमाता यांनी बांधली आणि संविदचे मंत्रीमंडळ स्थापून, श्री. सिंग ह्यांना, त्यांनी मिश्रा-मंत्रिमंडळ पाडले म्हणून, खास आसन दिले. ह्या ठिकाणी ह्या तमाशातला पहिला अंक संपला. मिश्रांवर मात करायला राजमातेच्या रूपाने दुसरा खलनायक जनतेसमोर आला.

दुसऱ्या अंकाला सुरुवात होताच, सिंगसाहेबांनी आपले खायचे दात दाखवायला सुरुवात केली आणि अगदी अल्पावधीतच, राजमाता, जनसंघीय, संसोपावाले वगैरे वगैरे सर्वांना साफ गुंडाळून ठेवले. त्यांना दूर करण्याचा घाट राजमातेने, जनसंघीयांनी, आदिवासींचे राजे श्री. राजा नरेशचंद्र ह्यांना काँग्रेसमधून फोडून काढून घातला. पण सिंगांनी त्या सर्वांना चक्कच धमकी दिली, ' संविदच मोडून टाकीन. ' बापडे सर्वच चूप झाले. आठ महिने असेच गेले. गो. ना. सिंग अधिकच डोईजड होऊ लागले. तेव्हा ' किंगमेकर ' बनलेल्या राजमातेने जनसंघीयांशी कानगोष्टी केल्या आणि निर्णय घेतला, काही झालं तरी सिंगला उडवायचा. सिंग मनोमन सारे उमगले. दिल्लीला आले. काँग्रेस श्रेष्ठींशी त्यांनी गुफ्तगू केले. भोपाळला परतताच राजीनामा सादर केला, नरेशचंद्रांचे नाव सुचवले नि स्वत: मिश्रांकडे चक्क दुर्लक्ष करून पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला, आपल्या एकोणीस साथीदारांसह. बिच्चारे नरेशचंद्र ! केव्हाचे बाशिंग बांधून तयार होते ! पण मुख्यमंत्रीपदाची माळ गळ्यात पडते न पडते तोच संकटांवर संकटे कोसळली आणि विधानसभेत मुख्यमंत्रीपद भूषविण्यापूर्वीच त्यांना राजीनामा सादर करावा लागला. मिश्राजींना वाटले, आपण जिंकली. पण मध्येच एक नाट्यपूर्ण घटना घडली. मिश्राजींवर मध्यप्रदेश हायकोर्टानेच डिक्री बजावली. आता त्यांचे नेतेपदही त्यांना सोडून गेलंय. दुसरा अंक संपता संपता, राजमातांनी एक खळबळजनक वाक्य हवेत सोडून दिले, " माझे आणखी काही लाख मी खर्च केले तर अजूनही मी ' संविद ' ला अधिकारारूढ करू शकेन. पण त्यात आता काही स्वारस्य नाही. " बिचारे जनसंघीय, संसोपक्षीय, प्रसोपावाले– त्यांचा मात्र ह्या खऱ्या चोरांनी साफ ' मामा ' बनवला. आता तिसरा अंक सुरू होत आहे. हे सारे खलनायक जर मध्यप्रदेशातल्या राजकीय मंचावरून दूर झाले व कुणी खराखुरा ' नायक ' भेटला तरच काही आशा आहे ह्या तमाशाचे एखाद्या चांगल्या नाटकात रूपांतर व्हायची. नाहीतर आहेच राजमातेचे वरील वाक्य मार्गदर्शनासाठी ! स्वार्थी ' आयाराम–गयारामां ' ची निर्लज्ज चलती ! ! ○

# गुढी पाडव्याची गोष्ट

नव्या वर्षाचा पहिला दिवस हा नवीन कामाची सुरुवात करण्याचा शुभदिवस. इतके दिवस या दिवशी सरकारी कचेऱ्यांना सुटी असल्यामुळे, सरकारी कचेऱ्यांत हा शुभ दिवस कधीच उगवत नसे. सुटी मिळालेले कर्मचारी, घुण्याच्या काठीला खण गुंडाळून सकाळी गुढी उभारली की, तडक श्रीखंड गाळायला बसत असत. श्रीखंडाचे जेवण अंगावर आल्यामुळे नंतर तीन-चार तास झोप घेणे हे आवश्यक असे. घराबाहेर गुढीच काय ती 'उभी' असे व घरात बहुतेक मंडळी दिवसभर 'आडवी' असत. नवी कामे सोडा, रोजची कामेही कुणी करीत नसे. गुढीपाडव्याचा हा दुरुपयोग महाराष्ट्र सरकारच्या लक्षात आला व यंदा गुढीपाडव्याची सुटी सरकारने रद्द केली. ही गोष्ट खरोखर अभिनंदनीय असताना विधानसभेत एका आमदाराने याबद्दल सरकारचा निषेध म्हणून सभात्याग केला. सरकारने केलेली प्रत्येक गोष्ट ही किती खोल विचारपूर्वक केलेली असते ते या आमदारांच्या लक्षात आलेले दिसत नाही.

महाभारताच्या आदिपर्वात 'गुढी पाडव्या'ची कथा आहे. या भरतखंडात उपरीचर नावाचा राजा राज्यावर असताना ही उत्सवाची प्रथा सुरू झाली. देशात त्या वेळी गोधन, धान्य व संपत्ती यांची समृद्धी होती. प्रजा संतुष्ट होती; कारण राजा पराक्रमी होता. पराक्रमाची नवी नवी क्षेत्रे तो धुंडाळीत होता. इंद्राचे ऐश्वर्यच काय ते त्याला आव्हान देत होते. इंद्रपदाच्या प्राप्तीसाठी राजाने युद्धाची तयारी चालवली होती. इंद्राला याची बातमी लागताच तो भयभीत झाला. उपरीचर राजाकडे येऊन इंद्राने त्याला सांगितले, "राजा, तुला मी माझी गळयातील वजयंती देतो. ही माळ गळयात असेपर्यंत युद्धात तुझा कुणी पराजयच करू शकणार नाही. तुला आणखीन ते काय हवे?" उपरीचर खूष झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी प्रजानन जागे होऊन पाहतात तो काय! राजप्रासादावर गुढी!! वेळूच्या काठीला रेशमी वस्त्र फडफडत होते. गुढी शृंगारलेली होती. प्रजाजन उपरीचराला भेटायला गेले. राजा म्हणाला, "लोकहो, हा इंद्रध्वज आहे. ही वेळूची काठी इंद्राची आहे.....!"

प्रजाजन चकीत झाले. आपआपसांत कुजबुजू लागले. प्रत्यक्ष इंद्र राजाकडे पायधूळ झाडून गेला की काय? संयुक्त पत्रक नाही....काही नाही! राजा म्हणाला— "तुम्हांला हे खरं वाटणार नाही. म्हणून मी इंद्राची हातातली काठी मुद्दाम ठेवून घेतली. सोन्याची मूठ असलेली दुसरी काठी त्या म्हाताऱ्याला दिली व परत पाठवला. माझ्या गळयातली ही 'वैजयंती' इंद्रान मला दिली ...प्रजाजनहो, या

दिवशी सर्वांनी उत्सव करावा. इंद्राचं ऐश्वर्य या भूमीवर मी निर्माण केलं याची आठवण म्हणून हा उत्सव गोडधोड खाऊन साजरा करा !"

प्रजाजन आनंदाने घरोघर परतले. प्रत्येकाने घरावर गुढ्या उभ्या केल्या. सगळीकडे आनंदीआनंद पसरला.

इंद्राचे ऐश्वर्य आपल्या कर्तृत्वाने प्रजाजनांना उपलब्ध करून देणाऱ्या राज्यकर्त्याने केलेला हा 'गुढी पाडवा' मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनीही धुमधडाक्याने तूर्त साजरा करण्यात काय बरे अर्थ आहे ? राज्यात भरपूर गोधन आहे. धन-धान्य आहे. प्रजाजन संतुष्ट आहेत. पराक्रमाची वैजयंती राज्यकर्त्यांच्या गळ्यात असल्यामुळे, सामान्य नागरिकाला निर्भयपणे जगता येते आहे, अशी का आज परिस्थिती आहे ? अमेरिकन गव्हाच्या पोळीवर पुरेसे 'डालडा'ही नसताना गुढ्या कसल्या उभारता ? गुढ्या उभारल्या की, जुन्या आठवणी जागृत होणार. राज-द्वारी ऐरावत नसताना एखाद्या पंचाधारी ग्रामभटाने दारात 'इंद्रध्वज' उभारला तर ते हास्यास्पद होणार नाही का ? गुढीपाडवा इतिहासजमा करण्याचा ना. नाईकांचा निर्णय प्रजाजनांनी निमूटपणे मानला आहे, कारण प्रजाजन शहाणे आहेत !

---

## एक मागोवा

---

गेल्या महिन्यात फरूक मारीकर नावाच्या दुष्ट मारेकऱ्याने पाँडीचेरी या राज्यात काँग्रेसला नेस्तनाबूत केले आहे. पाँडीचेरी राज्यातील सत्तास्पर्धेचा मागोवा घेतल्याखेरीज या मारीकराची नीट कल्पना येणार नाही. मामला गंभीर असल्याने 'मागोवा' हा आम्हांला न पेलणारा शब्द वापरला आहे इतकेच. एकेकाळी फ्रेंचांच्या सत्तेखाली असलेले हे छोटेखानी राज्य वस्तुत: 'तामीळनाडू'मध्ये विलीन करायला हरकत नव्हती. परंतु प्रत्येक राज्याची संस्कृती काही वेगळी असते नाही का ? म्हणून तर गोवा पंडित नेहरूंनी महाराष्ट्राबाहेर ठेवला. तशीच पाँडीचेरी बाजूला बसली. १९६२ च्या निवडणुकीनंतर तिथे वेंकटसुब्बा रेड्डीयार मंत्रिमंडळात, कंगायन नावाचा लबाड मजूरमंत्री होता. हा आपल्या अनुयायांसह एके दिवशी काँग्रेसमधून फुटला. मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. फरूक मारीकर हा त्या वेळी स्पीकर होता. त्याने धावपळ करून काँग्रेसचे बहुमत कसेबसे टिकवले व मार्च १९६७ मध्ये फरूक मारीकर हा ३१ वर्षांचा तरुण मुख्यमंत्री झाला. पाँडीचेरीला दारूबंदी नसल्यामुळे गुन्ह्याचे प्रमाण जरा अधिक होते. चालायचेच ! परंतु खुद्द गृहमंत्र्यांच्याच घरी खून व्हावा का ? श्री. जीवरत्न उदयार या काँग्रेसी गृहमंत्र्यांच्या घरी एक खून झाला. काय म्हणावे या रत्नाला ? या खुनात मंत्रीमहाशयांचाच हात असावा, असा श्री. फरूक

मारीकर यांना संशय आला. प्रत्यक्ष गृहमंत्र्याबद्दल असा संशय येणे चांगले का? झाले! मुख्यमंत्री मारीकर श्री. उदयार यांचा राजीनामा मागू लागले. म्हणजे गंमत पाहा— जे पोलीस खाते श्री. उदयार यांच्याविरुद्ध कारवाई करायला घाबरत होते तेच उद्या हे 'रत्न' गृहमंत्रीपदावरून हुसकले गेले की, त्यांना हातकड्या घालणार! हा अन्याय काँग्रेस अध्यक्ष श्री. कामराज यांना मुळीच सहन झाला नाही. ते पाँडीचेरीला गेले. त्यांनी मुख्यमंत्र्यांना दम दिला— "श्री. जीवरत्न राजीनामा देणार नाहीतच. तुम्हीच पुन्हा आपले स्पीकर व्हा कसे!" श्री. फरूक मारीकर काही ऐकेनात. म्हणले— "खून कुणी केला? फाशी कुणाला देता?" श्री. कामराज काहीच म्हणाले नाहीत. श्री. वेंकटसुब्बा रेड्डीयार मुख्यमंत्रीपद गेल्याने चिडलेले होतेच. त्यांनी शिस्तभंग केल्याबद्दल काँग्रेस विधिमंडळ पक्षातून श्री. मारीकर यांना हाकलून लावण्याचा घाट घातला. श्री. मारीकर यांना सुगावा लागला की गृहमंत्र्याला हातकड्या घालायला संधी देणाऱ्या आपल्या दुष्कृत्याबद्दल आपल्याला शासन होणार. त्यांनी दिला राजीनामा!

फाशीवाचून फरूक हा असा गेला!

हा दुष्ट माणूस काँग्रेसमधून असा पळाला आणि तेव्हापासून द्र. मु. कळघम पक्षाशी त्याचे सूत जमू लागले. नाकाशी सूत धरावे अशी ज्या पक्षाची परिस्थिती होती तो पक्ष हां हां म्हणता 'तामीळनाडू' प्रांतात सत्तेवर येतो काय आणि श्री. मारीकर यांचे नशीब पुनः फळफळते काय? गेल्या महिन्यात ज्या निवडणुका झाल्या त्यांत द्र. मु. क. पक्षाला तिसातल्या पंधरा जागा मिळाल्या. काँग्रेसला दगा देऊन श्री. फरूक मारीकर हे आता द्र. मु. क. पक्षाचे मुख्यमंत्री झाले आहेत. सुखेनैव त्यांना मुख्यमंत्री होऊ द्या. परंतु सत्यनिष्ठ कामराज, कर्तव्यदक्ष जीवरत्न उदयार, शिस्तप्रिय वेंकटसुब्बा रेड्डीयार ही मंडळी जोपर्यंत काँग्रेसमध्येच आहेत तोपर्यंत आमचा भविष्यकाळ उज्ज्वलच राहील यात आम्हांला मुळीच शंका नाही!

---

# इतिहासलेखन

डॉ. इर्फान हबीब हे गृहस्थ अलीगड मुस्लीम विद्यापीठात मध्ययुगीन भारतीय इतिहासाचे रीडर आहेत. भारतात जो इतिहास शिकवला जातो तो कसा चुकीचा आहे, हे सांगणारी त्यांची मुलाखत आम्ही वाचली. डॉ. हबीब या मुलाखतीत म्हणतात—

"असंख्य शिक्षक व सरकारी नोकर यांच्यावर जनसंघासारख्या प्रतिगामी विचारसरणीचा पगडा आहे. त्यामुळे इतिहासाचे अध्यापन हे अत्यंत प्रतिगामी पद्धतीने तूर्त केले जाते आहे. द्र. मु. कळघमच्या शिक्षकांनी असे शिकवण्यास सुरुवात केली आहे की, 'चोला' राजांनी एकेकाळी बंगाल, ब्रह्मदेश व मध्य आशिया-

पर्यंत राज्य केलेले आहे. मराठी लोक हे शिवाजीचा जयजयकार करून मोंगलांना वाईट ठरवतात. रजपूत मंडळी हीदेखील राणाप्रतापची कर्तबगारी सांगून मोंगलांविरुद्ध मने कलुषित करतात."

आपला भूतकाळ उज्ज्वल होता हे कळल्यामुळे लहान लहान मुलांच्या मनावर जो घातुक परिणाम तूर्त होतो आहे तो थांबवला पाहिजे यात शंका नाही. काँग्रेस सरकारने यासाठी खूप प्रयत्नही केलेले आहेत. हिंदुस्थानच्या इतिहासात मोंगलांचे यथोचित मूल्यमापन करणारी इतिहासाची पुस्तके लिहिण्यासाठी भारतसरकारने एक समिती नमली. डॉ. थापर (दिल्ली विश्वविद्यालय), श्री. नुसल हसन, श्री. सतीशचंद्र असे त्याचे सभासद होते. या मंडळींनी अशा इतिहासाचे एक पुस्तक लिहिले. ते प्रसिद्ध झाले. परंतु उत्तर प्रदेशातल्या एकाही शाळेने ते शाळेत लावले नाही. डॉ. थापर यांना याचे कारण विचारले गेले, तेव्हा त्यांनी सांगितले—

"या आमच्या इतिहासात वैदिक काळात हिंदू गोमांस खात असत असे विधान आहे. हे विधान काढून टाकलेत तर पुस्तक लावू असे आम्हांला शाळाधिकाऱ्यांनी सांगितले. आम्ही चक्क नकार दिला. जर हिंदू गोमांस खात होते तर तसे आम्ही लिहिणार. कुणाला आवडो न आवडो. इतिहास जसा आहे तसाच आम्ही लिहिणार !"

यावर कुणी असे म्हणेल की इतिहास घडला तसाच अगदी सांगायचा नाही. मोंगल चांगलेच उदार, धर्मसहिष्णू दाखवायचे. शिवाजी–राणाप्रताप ही सामान्य माणसे होती. त्यांचा फारसा उदो–उदो करण्यात अर्थ नाही, इत्यादी गोष्टी डोळ्यांपुढे ठेवून जर मुद्दाम समिती नेमली तर मग फक्त वैदिक काळाच्या बाबतीत हा सत्यनिष्ठ आग्रह का ? परंतु आम्हांला तर हा प्रश्नच बाष्कळ वाटतो. कारण हिंदू गोमांस खात होते हे सांगितल्याखेरीज विजापूरच्या वाटेवर गोहत्या करणाऱ्या कसायाचा हात खांद्यापासून तोडणारा शिवाजी, हा अत्याचारी कसा ठरणार ? कसायाच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याबद्दल शिवाजीला पकडून मनुष्यवधाबद्दल तावडतोड फाशी दिला असता तर भारताची फाळणीदेखील करावी लागली नसती. इतिहास सोपा नसता झाला ! हा माणूस पुढे राजा काय झाला, गोब्राह्मणप्रतिपालक काय झाला ! वैदिक काळातील एक गोष्ट घ्यावी, ती शिवकाळाला जोडावी, शिवकाळातली एक गोष्ट घ्यावी ती सावरकरांना जोडावी असा अभिनव धावता इतिहास हीच आजची गरज आहे.

इतिहासलेखन ही येरा गबाळाची कामे नव्हेत ! उत्तर प्रदेशात आता पुनश्च चंद्रभानू गुप्ता राज्यावर आले आहेत. समितीने मुळीच निराश होऊ नये. डॉ. हबीब, डॉ थापर, नुसल हसन संशोधन जारी ठेवा.

– ग्यानबा

# मुक्काम सगरोळी जिल्हा नांदेड

सन १९६० साली संस्कृतिसंवर्धन मंडळाची स्थापना होऊन संस्थेची स्वतंत्र वसाहत स्थापन झाली. संस्थेच्या स्थापनेपासून संस्था स्वतःच्या मालकीच्या भूमीतच आपल्या वसाहती बांधून त्यातच :आपले कार्य करीत आहे. संस्थेची १०० एकर जमीन स्वतःच्या मालकीची आहे. वसाहतीत विद्यार्थी, शिक्षक व कार्यवाह वगैरे मिळून एक हजार लोक आहेत.

संस्था स्वयंपूर्ण करावयाची म्हणजे संस्थेची जमीन सुपीक करणे अगत्याचे होते. संस्थेच्या शैक्षणिक, आदी कार्यातच पैशाचा अपुरा पुरवठा. मूळ जमिनीवर काही विशेष खर्च करता येण्याजोगी परिस्थिती नव्हतीच, पण जमीन सुपीक बनवली पाहिजे, हा ध्यास कार्यकर्त्यांस सतत लागून होता. अशाच ध्यासातून एक कल्पना सुचली, की येथे एवढे मानवी मलमूत्र वाया जाते त्याचा जर पद्धतशीर उपयोग झाला तर जमीन सुपीक होईलच, शिवाय स्वच्छता राखली जाऊन भंगीमुक्तीचे श्रेय पण मिळेल.

लागलीच कामाची आखणी करून योजना अंमलात आणली. फलशवजा एकूण वीस संडास बांधण्यात आले व सर्व संडासांतील मलमूत्र ड्रेनेजद्वारा एकाच खड्ड्यात येईल अशी व्यवस्था करण्यात आली. दरवर्षी मे महिन्यात सर्वजण सुटीत गेल्यावर सदर खड्ड्यावर बारीक मातीचा थर देण्यात येतो. प्रथम २० एकर जमीन प्रयोगाकरिता घेण्यात येऊन दरवर्षी ह्या २० एकरात सदर खड्यातील मैला मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात टाकण्यात आला. मेच्या उन्हामुळे व संपूर्ण मे महिन्यात संडासांचा वापर बंद असल्यामुळे व शेवटी वर मातीचा थर देण्यात आल्यामुळे हे खत अगदी कोरडे व कोणत्याही दुर्गंधीपासून मुक्त असे असते. अशा प्रकारे केवळ ५ वर्षांत वीस एकर जमीन सुपीक बनली.

**१९६० मध्ये या २० एकराच्या प्लॉटमधून केवळ साडेसहा पोती ज्वारी झाली होती, पण ती १९६५–६६ च्या हंगामात ह्याच प्लॉटमधून एकशे आठ्ठावीस पोती ज्वारी झाली. तसेच जनावरांना भरपूर वैरण पण मिळाली.**

१९६६–६७ पासून दुसऱ्या ४० एकरांच्या प्लॉटमध्ये हाच प्रयोग सुरू केला आहे. आमचे हे कार्य पाहून महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग बोर्डाने गॅस प्लँटची योजना दिली आहे. आता तर ह्या मैल्यापासून उत्तम खत तर मिळेलच, शिवाय आमच्या वसतिगृहाचा स्वयंपाक पण गॅसवर होईल. ह्या प्रयोगामुळे शून्यातून सृष्टी निर्माण करण्याचे समाधान आम्हांस लाभले.

भारत कृषिप्रधान देश असून सर्वत्र खेड्यांतून प्रामुख्याने शेताचाच उद्योग चालतो. पण गेल्या शंभर वर्षांच्या काळात तरी शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालास योग्य किंमत मिळाल्याचे दिसत नाही. वर्षभर उन्हा-पावसात कष्ट करून पिकवलेल्या मालास योग्य किंमत नसल्यानेच सुजलाम सुफलाम भारताची आज अन्नान्नदशा झाली आहे.

कृषिक्रान्तीतील महत्त्वाचा भाग म्हणजे उत्पादित मालास योग्य किंमत मिळणे. ह्याचाच प्रामुख्याने आम्ही विचार करून सगरोळी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी सहकारी पतपेढी सन १९५८ साली स्थापन केली. ह्या सहकारी पतपेढीद्वारा शेतकऱ्यांना योग्य दरांत कर्जपुरवठा, खत, बी-बियाणे आदी शेतीच्या आवश्यक गरजेच्या वस्तू माफक दरांत पुरवण्यात येतातच; पण विशेषतः, शेतकऱ्यांनी पुरवलेल्या मालास योग्य किंमत मिळवून देणे ही गोष्ट दक्षतेने अंमलात आणली जाते. ह्या परिसरात पिकलेला माल कोणत्या ठिकाणी चांगल्या किमतींस विकला जाईल, त्या ठिकाणचा शोध घेऊन नेमका अशा जागी माल पाठवण्यात येतो.

संस्थेचे प्रतिनिधी ह्या बाबतीत नेहमी शोध घेत असतातच. आता मोठमोठ्या शहरांतून सहकारी ग्राहक भांडारे स्थापन झाली आहेत. अशा ग्राहक भांडारांशी




संपर्क साधून त्या त्या ठिकाणी माल पाठवला जातो. शेतकऱ्यांचा माल विक्री होईपर्यन्त त्यांना पैशाची गरज लागली तर शेतकऱ्यांच्या मालतारणावर त्यांना पैशाचा पुरवठा करण्यात येतो. अशा माल साठवणीकरिता संस्थेने दोन प्रचंड गुदामे बांधली आहेत.

सर्व तऱ्हेची आधुनिक अवजारे माफक दराने शेतकऱ्यांना पुरवण्यात येतात. आधुनिक खते व अवजारे कशी वापरावीत, याची प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना शेतांत मोफत दाखविण्याची सोय केल्याने ह्या परिसरात शेतीचे उत्पन्न चौपट वाढले आहे. ह्या दहा वर्षांच्या काळात येथील शेतकरी सावकारशाहीच्या जाचातून मुक्त झाला आहे.

शेतकऱ्यांना शेतीस जोडधंदा म्हणून दूध उत्पादनाकरिता कर्जपुरवठा करून जातिवंत म्हशी आणून देण्यात आल्या.

ह्या सर्व प्रयत्नांनी सगरोळी परिसरातील शेती व्यवसायात आमूलाग्र बदल झाला असून कृषिक्रान्तीचे स्पष्ट स्वरूप दिसत आहे. ◻

## विज्ञानाचा चमत्कार

माझ्या मालकीच्या जमिनीपैकी लिंबाचे खरब ह्या नावाच्या चार एकरांच्या तुकड्यात केव्हाही दोन पोत्यांपेक्षा जास्त माल झाला नाही. सदरहू जमिनीच्या मशागतीचा खर्चही निघत नसल्यामुळे ही जमीन विकून टाकावी ह्या विचारातच होतो.

सदर जमिनीस ४०० ते ५०० रुपयेपर्यन्त खरेदीची मागणी येत होती. पण ह्याच सुमारास शेतकी खात्याची हायब्रीडसंबंधीची माहितीपत्रके माझ्या वाचण्यात आली व हा प्रयोग करून पाहण्याचे मी ठरविले. त्याप्रमाणे शेतीची पारंपरिक जुनी पद्धत टाकून सर्व बाजूंनी मी आधुनिक पद्धतीचा अवलंब केला. कृषीतज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार मशागत केली. रासायनिक खतांचा भरपूर वापर केला. रोगप्रतिबंधक औषधीची योग्य वेळी उपाययोजना केली. वरचेवर आतील तण, गवत वगैरे साफ केले. या सर्व चार महिन्यांच्या कष्टाचे फळ म्हणजे याच चार एकरांच्या तुकड्यातून यंदाच्या हंगामात मला अठ्ठावीस क्विंटल संकरित ज्वारी होऊन १५६८ रुपये ज्वारीचे व ६५० रुपये वैरणीचे आले. जे शेत ४०० रुपयांस विकण्याचा माझा विचार नक्की झाला होता, त्याच शेतातून केवळ एका वर्षाचे उत्पन्न २२१८ रुपये आले असून खर्च वजा जाता निव्वळ १२०० रुपये नफा झाला.

—के. ना. देशमुख

# नियमितपणें वापरल्यानें फोऱ्हान्स टूथपेस्ट हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालते

तरुण तसेंच वयस्कर लोकांकडून आलेली अनाहूत प्रशस्तीपत्रें हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालण्यात फोऱ्हान्स टूथपेस्टला मिळालेल्या आश्चर्यजनक यशाची स्तुति करतात. ही प्रशस्ती पत्रें जेफ्री मॅनर्स अॅण्ड कं. लि. च्या कोणत्याहि कार्यालयात पहावयास मिळतील.

"मला दातांच्या विकाराचा त्रास होत असे. मी आपली फोऱ्हान्स वापरू लागलो. आता मला दातांचा कोणताच विकार नाही. सुमारे २० ते २५ लोक आधीची टूथपेस्ट बदलून फोऱ्हान्स वापरू लागले आहेत. आणि माझ्या कुटुंबात तर ती सर्वांची अत्यंत आवडती होऊन राहिली आहे."

—उदयशंकर तिवारी, पाटणा.

"शास्त्रीय पद्धतीने बनविलेली आपली फोऱ्हान्स टूथपेस्ट गेली दहा वर्षे मी वापरीत असून तिच्यामुळे माझे हिरड्यांचे सर्व विकार दूर झाले. आता माझ्या कुटुंबातील सर्वजण फोऱ्हान्स टूथपेस्टने नियमितपणे दांत घासतात."

—एस्. एम्. लाल, नवी दिल्ली.

## फोऱ्हान्स

## —दंतवैद्यानें निर्मिलेली टूथपेस्ट

दांतांची योग्य निगा राखण्यासाठीं फोऱ्हान्स टूथपेस्ट व फोऱ्हान्स दुहेरी कार्य करणारा टूथब्रश दर रात्रीं व सकाळीं वापरा... आणि आपल्या दंतवैद्याकडे नियमितपणें जात चला!




मोफत! "दांतांची व हिरड्यांची निगा" नामक रंगीत पुस्तिका

ही पुस्तिका आपल्याला मराठी, हिंदी अथवा इंग्रजीमधून मिळूं शकेल. त्याकरितां हे कूपन भरून (टपालखर्चासाठीं) १५ पैशांच्या स्टॅम्पसहित पुढील पत्त्यावर पाठवा : मॅनर्स डेन्टल अॅडव्हायझरी ब्यूरो, पोस्ट बॅग क्रमांक १००३१, मुंबई १.

नाव ____________________ वय ____

पत्ता ____________________

भाषा ____________________

54F-152 MB

# पब्लो पिकासो आणि मुखवट्यांचे जग

जी दोन बिंदूंना सांधते आणि जिला रुंदी, उंची किंवा जाडी नसते तिला रेषा असे म्हणतात.

लहानपणी भूमिती शिकताना हेच शिकलो होतो.

कारण, मास्तरांनी फळा पुसायच्या डस्टरने आमच्या पाठी, खांदे आणि डोकीं पुसत हेच शिकविले होते.

आणि हा डस्टरचा धाक असा हा विलक्षण होता की, पुढे खूप वर्षेपर्यंत म्हणजे अगदी काल कालपर्यंत ही व्याख्या जीभेच्या टोकावर सरस्वती नांदावी तशी नांदत होती.

आयुष्यात ज्या अनेक खोटया गोष्टी शिकलो त्यातलीच रेषेची व्याख्या ही ही एक.

पुढे कालमानानुसार मी मोठा झालो. खरे–खोटे कळू लागले.

रेषेच्या व्याख्येने आपल्याला पार बनवले हे लक्षात आले.

असे असले तरी, खरे सांगू, असे मोठ्याने म्हणायची हिम्मत नव्हती माझ्यात. अशा वेळी उगाचच पाठीला, खांद्याला, डोक्याला मास्तरांच्या डस्टरची आठवण व्हायची.

पण, परवा अगदी अचानक एक पुस्तक हाती लागले.

आणि तुम्हांला सांगतो, डस्टरचीच काय पण, मास्तरांचीसुद्धा आठवण नाही झाली.

आयुष्यात अनेकदा अशी पुस्तके अकल्पितपणे भेटतात आणि आजवर शिकलेले, जपलेले, खरे मानलेले कसे धडाधड कोसळून पडते !

वसु भगत

# हे आहे एक रेषांचे पुस्तक

पुस्तकेच भेटतात असे नाही. कधी एखादा सूर भेटतो. कधी एखादा रंग भेटतो कधी एखादा शब्द, एखादी कविता, एखादे नाटक, एखादा चित्रपट...

आणि मनात बांधून ठेवलेल्या भिंती धडाधड कोसळून पडतात. पिढयान् पिढया चालत आलेल्या मूल्यांचे नक्षीकाम केलेले ऐने खळाळकन चूरचूर होतात.

कारण, त्यांतून घडलेले दर्शन नवीन असते. त्यांतून व्यक्त होणारा अनुभव नव्याने जाणवत असतो. त्या सुरांतून, त्या रंगांतून, त्या शब्दांतून आपणच आपल्याला नव्याने पाहत असतो. आपल्याला कधी न कळलेले किंवा कळूनही न जाणवलेले आपलेच रूप पाहत असतो.

परवा अगदी अचानक भेटलेल्या एका पुस्तकाने असे आपलेच रूप मला नव्याने दाखवून दिले आणि पिढयानपिढया चालत आलेल्या मूल्यांचे नक्षीकाम केलेले मनातील ऐने कसे खळाळकन भंगून गेले.

हे एक रेषांचे पुस्तक आहे.

अधिक नेमके सांगायचे म्हणजे, हा एक रेषांचा संग्रह आहे.

या संग्रहाने माझ्या मनातील रेषांची केवळ व्याख्याच बदलून टाकली असे नाही; तर त्यांचे उद्दिष्ट, त्यांचे जीवितकार्य, त्यांच्या अस्तित्वाचा अर्थ... साऱ्या साऱ्यांच्याच समजाला वेगळी दिशा दिली.

या रेषांच्या संग्रहाचे शीर्षक आहे " पिकासो अँड द ह्यूमन कॉमेडी. "

एकोणीसशे त्रेपन साली अठ्ठावीस नोव्हेंबरला पिकासो या जगद्विख्यात चित्रकाराने आपले स्केच–बुक उघडले. आणि काही रेखाटने करावयास सुरुवात केली.

पिकासोचे वय तेव्हा बहात्तर वर्षांचे होते.

सतत नऊ आठवडे म्हणजे तीन फेब्रुवारी एकोणीसशे चौपन्नपर्यंत तो ही रेखाटने करीत राहिला. या काळात त्याने एकूण एकशे ऐंशी रेखाटने केली.

वयाच्या एकाहत्तर–बहात्तराव्या वर्षी पिकासो मनाच्या अज्ञात कुहरातून उमळून आलेल्या घनघोर भावनात्मक वादळात सापडला होता. प्रत्येक सुजाण कलावंताला अशा आवर्तात आपले व्यक्तित्व पिंजून जाताना अनुभवावेच लागते. ती त्याची नियतीच असते. पण, या घनघोर वादळात व्यक्तित्व पिंजून जात असताना पिकासो जीवनापासून पळून गेला नाही. त्याने अस्सल आणि इमानदार कलावंताच्या निष्ठेने हे वादळ पाहिले. सहन केले. भोगले. त्या भोगांनीच त्याच्या व्यक्तिगत अनुभवांना कलात्मकतेबरोबरच वर्लेस्कचे, उपरोधाचेही रूप दिले. त्याच्या "द ह्यूमन कॉमेडी"मधील एकशे ऐंशी रेखाटनांतून हेच रूप व्यक्त झाले आहे.

ही रेखाटने पाहताना मला लुईजी पिरांदेल्लोच्या "नाटककाराच्या शोधात सहा पात्रे" या नाटकाची आठवण झाली. वस्तुसत्य की वस्तुसत्याचा आभास? हा नाटकाच्या क्षेत्रातला चिरंतन प्रश्न या नाटकात लुईजी पिरांदेल्लोने मांडला आहे. खरे म्हणजे हा केवळ नाट्यक्षेत्रातलाच प्रश्न नाही. प्रत्येक कलेच्या क्षेत्रात हाच प्रश्न आहे. कुठल्याशा एका रोमन संगीतिकेत कथावस्तूची आणि पात्रांची ओळख करून देताना सूत्रधार आवर्जून सांगतो की, याच संगीतिकेतील पात्रांच्या नाटकी पोशाखाने आणि रंगभूषेने आपली दिशाभूल होऊ देऊ नका. या कारागिरीच्या मागे एक विलक्षण उत्कट मानवी वस्तुसत्य आहे.

जगातील प्रत्येक श्रेष्ठ आणि अस्सल कलाकृतीच्या गर्भात वस्तुसत्याचे प्रवाह असतात, ही गोष्ट निर्विवाद आहे

पिकासोच्या "द ह्यूमन कॉमेडी"तील रेखाटनात, त्यातील विनोद, उपरोध, व्यंग यांच्या पलीकडे डोकावून पाहिले तर वस्तुसत्याचे प्रभंजक प्रपात आढळून आल्याखेरीज राहणार नाहीत.

पब्लो पिकासो हा आधुनिक चित्रकलेचा मुकुटमणी मानला जातो. १८८१ मध्ये स्पेनमधील माल्गा येथे त्याचा जन्म झाला. त्याने आपल्या चित्रांचे पहिले प्रदर्शन १९०१ साली पॅरिस येथे भरवले आणि १९०३ साली चित्रकलेच्या त्या माहेरघरीच त्याने आपला स्टुडिओ काढला. १९१७ ते १९२७ या दहा वर्षांच्या काळात त्याने "दॅघिलेव"साठी काम केले. १९३६ ते १९३९ या कालखंडात तो माद्रिदच्या प्रादो गॅलरीचा प्रमुख होता. स्पेनमधील नागरी युद्धानंतर तो फ्रान्समध्येच स्थायिक झाला.

पिकासोला कलात्मक आणि व्यावहारिक यश अमाप लाभले. अगदी हेवा वाटावा इतके.

असे यश क्वचितच कोण्या कलावंताच्या वाट्याला येत असते.

पण, कोणी कितीही महान असला तरी वर्षावर्षांनी वाढणारे वय किंवा कमी होणारे आयुष्य ही त्याच्या जीवनातील अपरिहार्य घटना असते.

पिकासोला ही जाणीव झाली.

त्या जाणिवेने त्याला विलक्षण एकाकी केले. एका महाप्रलयंकारी रिक्ततेत तो बुडून गेला.

त्याची ही व्यथा लिऑनकॅव्हेल्लोच्या " आय पॅगलीऑकी " या जगद्विख्यात संगीतिकेच्या नायकाच्या व्यथेसारखी होती. वाढत्या वयामुळे त्याची सरळ साधी श्रद्धा आणि नैसर्गिक उत्साह हरवला होता. दुसऱ्यांना मोहून टाकण्याची त्याची शक्ती त्याला सोडून गेली होती किंवा पिकासोची व्यथा ही " लाईम लाईट "मध्ये व्यक्त झालेल्या चार्ली चॅप्लीनच्या व्यथेसारखी होती. वाढत्या वयाने उमेद संपणाऱ्या विदूषकाची ती व्यथा होती. अशा अवस्थेत त्या माणसाने आपला आनंद, आपले सुख, आपले सारसर्वस्व असलेल्या कलेला रामराम ठोकावा ही त्या माणसाच्या सर्वस्वाची अखेर ठरते.

कलावंत हा कितीही महान, थोर वगैरे असला तरी अखेर तो माणूसच असतो. वृद्धत्व आणि मृत्यु त्यांच्याही आयुष्यात येत असतात. मृत्यूची हाक येते तेव्हा तुमच्याआमच्यासारखेच त्यालाही अगतिकपणे, निमूटपणे मृत्यूला शरण जावे लागते.

कारण, मृत्यू ही एवढी एकच गोष्ट सत्य आहे.

ती अंतीम शक्ती आहे. ते सर्वश्रेष्ठ सामर्थ्य आहे.

त्याची घनगर्द छाया आमच्या जन्माच्या आधीपासून आमच्यावर पडलेली असते.

त्याच्या भयाने आम्हांला आमूलाग्र ग्रासून टाकलेले असते.

आणि या भयाचा विसर पडण्यासाठी, या भयापासून दूर पळण्यासाठी आम्हांला वासनांचे मुखवटे दिले गेलेले असतात.

म्हणून तर म्हणायचे की, Death is the truth and sex is the fact.

पिकासोची " द ह्यूमन कॉमेडी "तील एकशेएँशी रेखाटने या मुखवट्यांच्या जगात आपल्याला घेऊन जातात.

ती आपल्याला मुखवट्यांचे जग दाखवितात. सारे मुखवटे बाजूला सारून त्यांच्या मागची माणसे दाखवितात. अगदी खरीखुरी माणसे !

आणि गंमत सांगू, या माणसांत स्वतः पिकासो तर भेटतोच भेटतो; पण, आपण स्वतःदेखील आपल्याला भेटतो.

या मुखवट्यांच्या आड एक कचकचीत भयावह वास्तवता दर्शन देते. एका विलक्षण क्षुद्रतेचे, दयनीयतेचे दर्शन घडते.

या भयप्रद वास्तवदर्शनात चिरंतनतेचा भ्रम प्रत्ययास येत नाही. काळाची

करालता ग्लोरिफाय केली जात नाही.

इथे फक्त एकच जाणीव राहते की, क्रूरतेच्या, निर्दयतेच्या प्रलयंकारी प्रपातात काळ साऱ्यांनाच वाहून नेणार आहे. कुणाची इच्छा असो वा नसो, साऱ्यांनाच वाहून जावे लागणार आहे. त्याला प्रतिकार करणे शक्य नाही. त्याच्याविरुद्ध बंड नाही. क्रांती नाही. तो प्रलयंकारी प्रपात या देहावर कोसळला की, मुकाट्याने वाहून जाणे एवढेच फक्त हाती उरते.

आणि तरीही ही माणसे वासनांचे मुखवटे घालून वावरत असतात. जणू काळाच्या भेटीचे भय त्यांना वाटतच नाही. जणू आपले खरे चेहरे ती खरे मानीतच नाहीत. ती खरे मानत असतात ते मुखवटे. ती खऱ्या मानत असतात त्या वासना. आणि त्यांचे हे खरे मानणे हे खरोखरीच मोठे प्रामाणिकपणाचे असते.

समाजात वावरणाऱ्या माणसांचा मोठेपणाच्या आवरणाखालील विदूषकीपणा आणि विदूषकाच्या अवगुंठनामागची व्यथा यांना एका तीव्र उपरोधाचा स्पर्श पिकासोने या रेखाटनात दिला आहे.

हे करताना त्याने वेगवेगळे प्रसंगांश वापरले असले तरी सर्व रेखाटनांतून कथा-वस्तू मात्र एकच एक आढळून येते. ती कथावस्तू म्हणजे स्त्री आणि पुरुष यांतले संबंध.

या रेखाटनातील स्त्री-पुरुष पिकासोच्या ऐन उमेदीतील चित्रांत आपल्याला भेटून गेलेले असतात. आणि तरीदेखील ते वेगळे वाटतात. वेगळेच असतात.

इथल्या एकजात साऱ्या स्त्रिया वासनात्मक प्रेमाची...सेक्सुअल लव्हची... प्रतीके आहेत. त्या सुंदर आहेत. वासनांना आव्हान देणाऱ्या आहेत.

पण, त्या अशा पृथक असूनही वेगळ्या नाहीत. त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाही.

कारण, त्यांचे सौंदर्य भोगण्यासाठी कुणीतरी असणे आवश्यक आहे. कुठलीही गोष्ट भोगली जावी लागते. मानली जावी लागते. सुंदर स्त्री ही प्रेम करण्यासाठी असते. आणि अशी भोगली जाण्यासाठी, मानली जाण्यासाठी, प्रेम केले जाण्यासाठी तिला पुरुषावर अवलंबून राहावे लागते.

सुंदर पुरुषांपेक्षा सुंदर स्त्रियांची संख्या जास्त आहे. असे सुंदर स्त्री-पुरुष जीव-नात एकत्र क्वचित येतात. सुंदर स्त्री उपभोगण्याची ज्यांची पात्रता नसते अशा पुरुषांशी त्यांची भेट घडून येते. आणि अशा वेळी मुखवटा चढवला जातो. सुखाचा, आनंदाचा, वासनेच्या उन्मादाचा !

हा कुणाचा अपमान आहे? स्त्रीचा की पुरुषाचा ?

खरे म्हणजे हा सौंदर्याचा, निसर्गाचाच अपमान आहे.

पाच जानेवारी एकोणीसशे चौपन्न या एकाच दिवशी काढलेल्या अठरा रेखाटनां-तून पिकासोने हे मोठ्या प्रभावीपणे व्यक्त केले आहे.

निसर्गाच्या सान्निध्यात विसावलेली एक सुंदर स्त्री, ती जणू निसर्गाचाच एक

भाग आहे. अकल्पितपणे तिच्याजवळ एक खुजी, चमत्कारिक आकृती अवतीर्ण होऊन तिचे आमूलाग्र निरीक्षण करू लागते. आणि बघता बघता तिच्या सौंदर्याने मोहित होऊन तिच्याभोवती रुंजी घालू लागते. ती आकृती आणि तिची शरीरावर ताबा मिळवण्याची धडपड पाहून त्या स्त्रीला आनंद होत नाही. ती फक्त विस्मयचकित होते. उन्मादाने ती आकृती अधिकाधिक अधीर होते. वेडी होते. ती स्त्री जागेवरून न हलता त्याला टाळण्याचा, निवारण्याचा प्रयत्न करते. तो तिला नको असतो. आणि तरी ती हसत असते. त्या आकृतीला निवारण्याच्या प्रयत्नांत होणारी तिची हालचाल तिला अधिकच सुंदर, अधिकच उन्मादक करते...एखाद्या भारतीय शिल्पाकृतीसारखी. ती तीच असते; आणि तरीही ती सारखी बदलत असते. रक्तमांसाच्या पेशी आणि स्नायू, एकाहून एक सुंदर, उन्मादक आकार धारण करीत जातात. पण, या सर्वसामान्य तपशिलाच्या पलीकडे...फार फार पलीकडे घेऊन जाणारी आणखी एक गोष्ट त्या रेखाटनात आहे. मदनाचा आभास उत्पन्न करणाऱ्या त्या खुज्या आकृतीने आपल्या चेहऱ्यासमोर एक मुखवटा धरलेला आहे. अत्यंत वृद्ध आणि तरीही कामपीडेने विद्रूप झालेला मुखवटा !

चित्रकार आणि त्याची मॉडेल्स यांचे परस्परसंबंध दाखविणाऱ्या (ही पुन्हा स्त्री-पुरुषांतील परस्परसंबंधाची प्रतीके.) रेखाटनात स्त्री-पुरुषांच्या संबंधातील एक वेगळाच पैलू...एक वेगळी अवस्था पिकासो दाखवतो. त्याच्या एका रेखाटनातील चित्रकाराचे चित्र काढून झाले आहे. चित्रकार, त्याचे स्नेही, रसिक, टीकाकार ही सारी मंडळी त्या चित्राच्या कौतुकात मग्न आहेत. आणि मॉडेल ? ती बिचारी थकून दमून एका कोपऱ्यात झोपी गेली आहे. तिची कुणाला दखलच नाही. तिचे अस्तित्व सारे विसरून गेले आहेत.

पिकासोने निर्माण केलेले सर्कशीचे जग तर अद्‌भुत असेच आहे. या सर्कशीच्या जगात सुंदर स्त्रिया आहेत. बलिष्ठ पुरुष आहेत. जनावरे आहेत. पशुपक्षी आहेत. या साऱ्या गर्दीत एक नगण्य आकृती अंग चोरून वावरत असते. आणि तरीदेखील तिची छाया साऱ्या गर्दीवर पडलेली असते. ही आकृती विदूषकाची. ती एखाद्या पाण्याच्या थेंबासारखी साधी, क्षुद्र आणि तरीही मानवी देहाची सारी गुंतागुंत व्यक्त करणारी. विदूषकाच्या मुखवट्याखाली तडफडणारा हा मानवी आत्मा !

पिकासो हे सारे मुखवटे पाहतो. त्याच्या आत मृत्यूच्या भीतीने थरारणारा आत्मा पाहतो. या मुखवट्यांच्या आत उसळणारा वासनांचा लाव्हा पाहतो.

वासनेची रूपे अनंत आहे. एक कमनीय स्त्रीदेह...पाठीची कमान करून माळावर झुकलेला...एखाद्या वेलीचा कमानीसारखा...आणि बाजूच्या झुडुपातून पुढे येणारा सॅटअर, उजाड विश्वात वावरणारा राक्षस तिच्या पोटावर मद्याचा पेला

[पृष्ठ ६० वर]

# हेरांची टुकल

अनंत भावे

लेखांक दोन

त्यानंतर झालेली तीन-चार माणसांची उलटतपासणी ही औपचारिकच होती. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल माझी सहजच खात्री पटली. त्यामुळे 'प्रिन्सेस आयरिन ब्रिगेड 'मध्ये दाखल होण्यासाठी मी त्यांची शिफारस केली. आता यादीमधील नवव्या माणसाची पाळी आली होती. बाखवीस–फ्लिटप्रमाणे यानेदेखील आपली जिंदगीभरची बचत बरोबर आणली होती.

त्याला माझ्या खोलीत आणण्यात आले. त्याला पाहताक्षणीच बाखवीस–फ्लिटपेक्षा हे प्रकरण वेगळे आहे याची मला जाणीव झाली. त्याचा चेहरा अत्यंत कावेबाज होता आणि डोळयांत धूर्ततेची चमक होती.

सुरुवातीला, त्याची स्थूल माहिती मिळवण्यासाठी मी त्याला काही जुजबी प्रश्न विचारले. त्यांची त्याने तत्परतेने आणि समाधानकारक उत्तरे दिली. त्याचे नाव व्हान-दर-आ असे होते आणि उत्रेख्त जिल्ह्यातील त्याचे गाव एमनेसपासून म्हणजे बाखवीस–फ्लिटच्या गावापासून फारसे दूर नव्हते. त्याचे वय बत्तीस वर्षांचे होते आणि यंत्रांचे सुटे भाग बनविणाऱ्या एका कारखान्यात तो फोरमन होता. त्याचे लग्न झाले नव्हते. परंतु स्त्रीसौख्याला तो पारखा असावा असे मात्र मला वाटले नाही. स्त्रियांना आकर्षित करील असा एक उमदेपणा त्याच्यापाशी होता.

"इतका धोका पत्करून इथं कशाला आलास तू ?" मी त्याला विचारले.

*ऑफिसमध्ये दाखल झालेल्या लोकांच्या सामानाची पाहणी करतानाच कर्नल पिंटोच्या मनात एक कल्पना आकार घेऊ लागली. ज्या दोन ढिगात त्याला नोटांची पुडकी दिसली त्यांच्या मालकांना भेटण्याचे त्याने ठरवले. अर्थात एकाला नंबर दिला चार व दुसऱ्याला नऊ. बाखवीस-फिंलट–नंबर चार–भेटीसाठी आला. तासभर चर्चा झाल्यावर त्याने त्याची रवानगी शेजारच्या खोलीत केली. आता त्याला उत्सुकता लागली होती नंबर नऊला भेटण्याची*

---

" साहेब, मला ' प्रिन्सेस आयरिन ब्रिगेड 'मध्ये दाखल व्हायचं आहे. "

" पण त्याकरिता एवढ्या उतावीळपणं जीव कशाला धोक्यात घातलास तू ? कारण, आता काही महिन्यांत थांबणारच आहे हे युद्ध. "

" तेच तर म्हणतो मी, साहेब. " त्याने उत्तर दिले, " खरं सांगायचं तर अजून-पर्यंत दोस्तांना काही फारशी मदत करू शकलेलो नाही मी. अर्थात भूमिगत चळ-वळीच्या संबंधांत थोडं काम केलं मी. पण ते काही फारसं लक्षात घेण्यासारखं नाही. त्यामुळं मला वाटलं युद्धप्रयत्नाला काहीतरी मदत करण्याची ही अखेरची संधी आली आहे ती डावलता कामा नये. "

## विश्वसनीय निवेदन

व्हान-दर-आचे उत्तर अत्यंत समर्पक होते. विनयाने आपल्या स्वतःच्याच उणीवा स्पष्ट करणाऱ्या माणसाबद्दल पृच्छकाला सहानुभूती वाटू लागते, तशी त्याच्याबद्दल मलाही वाटू लागली. मी त्याला म्हटले, " बरोबर आहे. पण भूमि-गत चळवळीला नेमकी कसली मदत केलीस तू ? "

" साहेब, मी मोठी मर्दुमकी गाजवली अशी तुमची समजूत झाली असेल तर ती योग्य नव्हे. मी अगदी सामान्य मनुष्य आहे. माझ्या काही मित्रांनी रात्रीबेरात्री जर्मन ठाण्यांवर धाडसी हल्ले चढवले आहेत. पण मला मात्र जमण्यासारखं नव्हतं ते. तेवढी हिंमतच नव्हती आपली. जीव बचावून जेवढं करणं शक्य होतं तेवढंच केलं आहे मी.

" साहेब, लहानपणापासूनच आगगाड्यांचं निरीक्षण करायचा छंद जडला होता मला. अगदी आत्तापावेतो त्या छंदाचा पाठपुरावा करीत आलो आहे मी. एका विधवा बाईच्या खानावळीत राहायचो मी. माझ्या खोलीच्या खिडकीतून रेल्वेमार्ग अगदी स्वच्छ दिसायचा. खिडकीपासून थोड्या अंतरावर बसलो म्हणजे कोणाचं लक्ष जाण्याचाही सहसा संभव नव्हता. काम नसेल तेव्हा खिडकीत बसून मी गाड्यांकडे तासचे तास नुसता पाहत राही. तेथून जवळच थोडासा उतार होता; आणि उतारावर गाड्यांचा वेग चांगलाच मंदावत असे. त्यामुळे गाड्यांचे डबे,

**[ पान ५० वर पहा ]**

प्रा. जनार्दन एम्. वाघमारे

४ एप्रिल १९६८ हा तो दिवस.
आज त्या घटनेला एक वर्ष झाले.

# डॉ. मार्टिन ल्यूथर किंग

बघता बघता एक वर्ष होऊन गेले त्या भयंकर पाशवी घटनेला. डॉ. मर्टिन ल्यूथर किंगचा खून झाला आणि जगाच्या इतिहासात आजपर्यंत घडलेल्या पाशवी कृत्यांत आणखी एकाची भर पडली. बंदुकीच्या एका गोळीने एक दिव्य स्वप्न क्षणार्धात उद्ध्वस्त केले. मृत्यूला क्षणिक विजय मिळाला. पण अनंत आणि चिरंतन जीवनाच्या शोधात असणाऱ्या आत्म्यांना मृत्यूला ओलांडूनच पुढे जावे लागते. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग हे दोन जगांचे नागरिक होते. आपण दोन जगांचे नागरिक आहोत असे ते नेहमी म्हणत असत : " Every true Christian is a citizen of two worlds, the world of time and the world of eternity." दुर्दैवाने या जगातील (wold of time)त्यांचे नागरिकत्व नेहमीसाठी संपले. येशू ख्रिस्ताला पुन्हा एकदा क्रूसावर चढावे लागले.

डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांच्या जीवनात एक दिव्य स्वप्न होते. त्या स्वप्नाला साकार करण्याच्या धडपडीत त्यांचे जीवनच मुळी ते बनले होते. आपल्या निग्रो-बांधवांना खरेखुरे स्वातंत्र्य प्राप्त करून देणे हेच त्यांचे स्वप्न होते. अमेरिकन निग्रोची एकच उत्कट इच्छा आहे : जगाने आपल्याला 'माणूस' म्हणावे आणि माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक असणारी अस्मिता प्राप्त करून द्यावी. निग्रोचे मागणे काही 'लई' नाही. पण अनेक शतकांपासून श्वेत अमेरिक-

Free at last !
Free at last !
Thank God almighty
I am free at last !



# उद्ध्वस्त झालेले एक दिव्य स्वप्न

नांनी त्याची ही इच्छा फलित होऊ दिली नाही. म्हणून निग्रो हा अस्तित्वात नसलेला एक माणूस (non-existent man) या नात्याने जगत आलेला आहे. अशा ह्या निग्रोला माणसाचे अस्तित्व आणि माणसाची अस्मिता देण्यासाठी मार्टिन ल्यूथर किंगला संघर्ष करावा लागला.

निग्रोची किंमत त्याच्या रंगावरून ठरवू नका; त्याच्या गुणकर्मांवरून त्याला बरोबरीचे स्थान द्या, समानतेची वागणूक द्या, असा डॉ किंगचा आग्रह होता. आणि म्हणून मोजेसप्रमाणे त्यांनी आपल्या लोकांना स्वातंत्र्याच्या वाटेवर चालणारे यात्रिक बनविले. अनेक वर्षांपासून ही निग्रो जमात ह्या वाटेवरून चालत आलेली आहे. त्यांपैकी अनेकजण promised land पाहण्यापूर्वीच मरून गेले. कित्येक हजार असेच गेले ! आपल्या स्वप्नाचे वर्णन डॉ. मार्टिन ल्यूथर किंगनी शब्द–ब्रह्मांडातील प्रभावी शब्द निवडून अनेकदा केलेले आहे. १९६३ साली वॉशिग्टनमध्ये भरलेल्या एका विराट सभेत लिंकनच्या पुतळ्याच्या पायथ्याशी उभे राहून डॉ. किंग एका अपूर्व आवेशात म्हणाले होते :

I have a dream that one day every valley shall be exalted every hill and mountain shall be made low, the rough place will be made plain and the crooked place will be made

straight and the glory of the Lord shall be revealed and all flesh shall see it together.

जगाच्या सगळ्याच दिशांतून स्वातंत्र्याचा निनाद ऐकू यावा हे त्यांचे स्वप्न होते. पण डॉ. मार्टिन ल्यूथर किंगचे हे स्वप्न फार जुने आहे. गेल्या चारशे वर्षांपासून अमेरिकन निग्रो हेच स्वप्न पाहत आला आहे. त्याचे डोळे थिजून गेले पण स्वप्न काही साकार झाले नाही. स्वातंत्र्याच्या देशात त्याच्या नशिबी गुलामी आली. नियतीच्या विरुद्ध तो झगडत राहिला, आपल्या मालकाच्या कापसाच्या शेतात उभे राहून निग्रो गुलाम समोरच्या क्षितिजाकडे खिन्न मनाने व अश्रूपूर्ण डोळ्यांनी बघत असत. पण त्यांना त्या क्षितिजावर स्वातंत्र्याची प्रतिमा तरंगताना कधी दिसली नाही. स्वातंत्र्याचे स्वप्न डोळ्यांतील अश्रूंत भिजतच राहिले. थरथरत्या ओठांनी निग्रो गुलाम गात असत–

O Freedom, O Freedom, O Freedom overcome me !

आणि 'फ्रीडम' म्हणजे 'डेथ' हे सांगायला नको. त्यांना मरणातच स्वातंत्र्याचा साक्षात्कार होत होता.

निग्रोंचे हे स्वप्न त्यांच्या आध्यात्मिक कवनांतून (spirituals) व्यक्त झालेले आहे. मालकाचा आसूड पाठीवर झेलीत झेलीतच अमेरिकन निग्रोंनी स्वातंत्र्याचे स्वप्न पाहिले. वेगवेगळ्या भावछटा घेऊन त्यांचे हे स्वप्न धुक्यावर कोरले गेले. केवळ विरून जाण्यासाठीच. हे स्वप्न म्हणजे एक भ्रम (myth) आहे असे त्यांना सतत वाटायचे. असे वाटणे स्वाभाविकच होते ना. पण ते स्वप्न विरले नाही; कारण निग्रोंचे निर्माल्य कधी झाले नाही. निर्माल्य झाल्याशिवाय स्वप्ने विरत नसतात. १८६३ साली निग्रोंची गुलामी कायद्याने नष्ट करण्यात आली. गुलामी गेली पण स्वातंत्र्य काही आले नाही. आपले स्वप्न पूर्ण होईल अशी आशा निग्रोंच्या मनात सतत वाढत राहिली.

निग्रोंचे स्वप्न खरे म्हणजे, सबंध अमेरिकेचेच स्वप्न आहे. ह्या स्वप्नातूनच अमेरिकन लोकांचे "अमेरिकत्व" निर्माण झालेले आहे. अमेरिकेच्या भौगोलिक सीमांना ओलांडून अमेरिकेत वसाहत करावयास आलेल्या श्वेत लोकांनी स्वातंत्र्य आणि संपत्तीचा शोध घेतला, पण ह्या धडपडीत त्यांनी निग्रोंच्या पायांत गुलामीची साखळी घातली आणि त्यांच्या घामाने आपल्या जमिनीचे सिंचन केले. पण असे असतानादेखील स्वातंत्र्याच्या स्वप्नाची भुरळ त्यांच्या मनावर पडलीच होती. ह्या स्वप्नानेच थॉमस जफ्फरसनच्या लेखणीला झपाटले होते. स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात (१७६९) त्याने ह्या स्वप्नाला चिरंतन केले. "All men are treated equal; that they are endowed by their Creator with certain uinalienable rights; that among them are life, liberty, and the pursuit of happiness." निग्रोंना मात्र समानतेची वागणूक मिळाली

नाही. त्यांना जीवनस्वातंत्र्य आणि मालमत्तेचा उपभोग करता आला नाही. हे स्वप्न स्वप्नच राहिले. वास्तवाच्या दुनियेत त्याने कधी पाऊल टाकले नाही. निग्रो हा आकाशाकडेच पाहत राहिला. ह्या अमेरिकन स्वप्नाने थॉमस पेनच्या मनाला अगदी वेड लावले होते. लिंकनला त्याने अमोघ वक्तृत्व आणि कर्तृत्व दिले होते. प्रत्येक अमेरिकन माणसाला ह्या स्वप्नाचा अभिमान आहे. श्वेत लोकांच्या जीवनात ह्या स्वप्नाचा साक्षात्कार झालेला आहे, पण ते निग्रोंच्या केवळ पापण्यांतच अडकून बसले आहे.

ह्या स्वप्नाने साकार होण्याची कितीतरी धडपड केली आहे–पण केवळ निरर्थक होण्यासाठी आणि पुनःपुन्हा असफल होण्यासाठी. कधी अश्रूंत तर कधी घामात आणि कधी रक्तात भिजवून अमेरिकन निग्रोंनी ह्या स्वप्नाला फुलासारखे ताजे आणि टवटवीत ठेवायचा सातत्याने प्रयत्न केलेला आहे. ते स्वप्न कधी दूर तर कधी जवळ येत राहिले पण हाती कधी लागले नाही. लँगस्टन ह्यूज (Langston Hughes) नावाच्या एका प्रसिद्ध निग्रो कवीने ह्याच स्वप्नाविषयी खालील कविता लिहिली आहे.

स्वप्न लांबणीवर टाकलं जातं–
तेव्हा त्याचं काय होतं ?
उन्हातील द्राक्षाप्रमाणं
ते सुकून जातं का ?
का जखमेसारखं सडून
मग ते नाहीस होतं ?
सडलेल्या मांसाप्रमाणं
त्याचा वास सुटतो का ?
का ते गोड पाकाप्रमाणं
घट्ट असं आळून बसतं ?
कदाचित जड ओझ्याप्रमाणं
ते अगदी खाली खेचतं ?
का त्याचा विस्फोट होतो ?

अमेरिकन निग्रोंचे आणि पर्यायाने डॉ. मार्टिन ल्यूथर किंगचे स्वप्न वरील सगळ्याच अवस्थेतून गेल्या चारशे वर्षांतून गेले आहे. गुलामीच्या काळात (१६१९–१८६३) हे स्वप्न उन्हातील द्राक्षाप्रमाणे सुकून गेले. पण त्याची गोडी तशीच कायम राहिली. १८६३ साली अध्यक्ष लिंकनने निग्रोंचे गुलामीतून विमोचन केले. त्यानंतर ह्या स्वप्नाचा विकास एका सुंदर फुलाप्रमाणे होईल असे सगळयांनाच वाटले होते. पण तसे काही घडले नाही. उलट १८६३ ते १८९६ ह्या पुनर्रचनेच्या कालात (Reconstruction period) निग्रोंवर अनन्वित अत्याचार होऊ लागले. त्यांचे

अधिकार हिसकावून परत घेण्यात आले. ह्या काळात निग्रोंना श्वेत लोकांपासून दूर ठेवण्यासाठी अनेक जुलमी कायदे दक्षिणेतील राज्यांनी पास केले व कठोरपणे अंमलात आणले. तेव्हा मग निग्रोंचे हे स्वप्न एखाद्या जखमेसारखे सडू लागले. त्यातून पू वाहू लागला. १८९६ साली निग्रोंच्या अलगीकरणाला (Segregation) अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने कायदेशीर ठरविले. 'समान पण वेगळे' (Separate but equal) हे तत्त्व अस्तित्वात आले. पण निग्रोंना वेगळे ठेवण्यात समानता येऊ शकत नाही ह्याची कुणी विशेष दखल घेतली नाही. निग्रोंना आपल्यापासून वेगळे व दूर ठेवणे एवढाच काय तो उद्देश. निग्रोला अशा प्रकारे विषमतेच्या खाईत लोटण्यात आले. जीवनाच्या मुख्य प्रवाहापासून तो दूर फेकला गेला. समानतेचा व स्वातंत्र्याचा असा उपहास होऊ लागला आणि अशा प्रकारे ह्या स्वप्नाला शिळ्या व सडलेल्या मांसाप्रमाणे दुर्गंधी सुटली. पण अमेरिकन निग्रोंना हे शिळे, सडके व दुर्गंधित मांस खावे लागले. पुढे परिस्थिती बदलू लागली. पहिल्या महायुद्धानंतर हजारो निग्रो दक्षिणेतून उत्तरेकडे गेले. उत्तरेने त्यांना रोटी आणि रोजगार, संरक्षण आणि स्वातंत्र्य देण्याची हमी दिली. त्याचा फायदा निग्रोंना मिळाला. १९२० नंतर "नवा निग्रो" जन्माला आला. शिक्षण आणि साहित्य, संगीत आणि संस्कृतीमध्ये या नव्या निग्रोने आपली अभिरुची वाढविली. निग्रोचे स्वप्न गोड पाकाप्रमाणे त्यांच्या भाकरीवर आळले. पण १९३० नंतर मंदीचा तडाखा सबंध अमेरिकेला बसला. निग्रोंना त्याची फारच झळ बसली. तशात निग्रोंच्या अपेक्षा अधिक उंचावल्या होत्या. आपल्या अधिकारांसाठी लढण्याचे सामर्थ्य त्यांच्यांत आता निर्माण झाले होते. पण मंदीने निर्माण केलेल्या परिस्थितीने त्यांचे हातपाय बांधून टाकले होते. त्यांचे स्वप्न अर्थात एखाद्या जड ओझ्याप्रमाणे त्यांना खाली खेचू लागले होते.


दुसऱ्या महायुद्धानंतर परिस्थिती पुन्हा झपाट्याने बदलली. अमेरिकेला दुसऱ्या महायुद्धात विजय मिळाला होता. तो विजय लोकशाही मूल्यांचा होता असा अमेरिकेचा व सर्व जगाचा दावा होता. पण अमेरिकेतच खरीखुरी लोकशाही नाही ही वस्तुस्थिती आणि विसंगती प्रत्यक्ष निग्रोंच्या ध्यानात आली. आता आफ्रिकाही जागी झाली होती. रिप व्हॅन विंकलसारखा अमेरिकन निग्रो कधीही झोपलेला नव्हता. जागतिक परिस्थितीच्या संदर्भात निग्रोंचा 'मूड' आता बदलला होता. आपले स्वप्न साकार करण्याची आकांक्षा आणि जिद्द त्यांच्यांत प्रकर्षाने निर्माण झाली होती. काही घटना त्यांची अपेक्षा उंचावण्यास कारणीभूत ठरल्या. त्यांपैकी एक महत्त्वाची घटना म्हणजे १९५४ साली अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने अलगीकरण (Segregation) बेकायदेशीर ठरविले. आता निग्रोंना अमेरिकन जीवनाशी एकात्म व्हायचे होते. पण अडथळे येत गेले. आणि निग्रोंच्या स्वप्नाचा १९५५ साली माँटगोमरी (आलाबामा) मध्ये भयंकर विस्फोट झाला. आणि डॉ. मार्टिन

ल्यूथर किंगच्या तरुण नेतृत्वाखाली " निग्रो-क्रांती " पुकारली गेली. डॉ. किंगनी अहिंसेच्या तरवारीचा फार प्रभावी उपयोग केला.

डॉ. मार्टिन ल्यूथर किंगच्या नेतृत्वाने सबंध निग्रोंमध्ये एक फार मोठा आत्मविश्वास निर्माण केला. 'आम्हांला विजय मिळेल—आज ना उद्या—किंवा कधी तरी.' We shall overcome.' कायद्याने गुलामी संपून आता जवळजवळ शंभर वर्षे पूर्ण होत आली होती. १९६३ साली निग्रो स्वातंत्र्याची शताब्दी साजरी करण्याची तयारी अमेरिकन शासनातर्फे होत होती. पण निग्रोंना सर्व नागरी अधिकार मिळाले नव्हते. त्यासाठीच डॉ. मार्टिन ल्यूथर किंगच्या तरुण, डोळस आणि प्रभावी नेतृत्वाखाली अमेरिकन निग्रोंनी एका फार मोठ्या आंदोलनाला (Civil Rights Movement) सुरुवात केली होती. थोड्याच कालावधीत डॉ. किंग हे जागतिक कीर्तीचे नेते बनले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात निग्रोंचे स्वप्न साकार होऊ पाहत होते. ते जवळजवळ साकार झालेच होते. त्या स्वप्नाला डॉ. किंगनी शब्द, अर्थ, आवाज आणि कृती दिली. येशू ख्रिस्त आणि म. गांधी यांच्या मार्गावर चालणाऱ्या ह्या महान व्यक्तीला त्यांच्यासारखेच शेवटी मरण पत्करावे लागले. एका दिव्य स्वप्नाला उद्ध्वस्त करण्यात आले, त्यांच्या शवपेटीवर एका निग्रो कवनातील (Spiritual) खालील ओळी लिहिल्या होत्या :

Free at last !
Free at last !
Thank God almighty,
I am free at last !

खरे म्हणजे हे स्वप्न कधीच उद्ध्वस्त होऊ शकत नाही. अनेकदा मरून हे स्वप्न जीवन मुठीत घेऊन अनेकदा उठलेले आहे. ते फेनिक्स पक्ष्यासारखे आहे. डॉ. किंगच्या वाटेवर चालणारे निग्रो आजही अमेरिकेत आहेत. त्यांना आपले स्वप्न पूर्णपणे साकार करावयाचे आहे. किंगच्या स्मृतींस शतशः अभिवादन ! ○



# झुंड

संरक्षणमंत्री मेनन !
जनरल या नात्याने तुम्हांला सांगतो
शत्रूंचे कधी नंबर लावावयाचे नसतात
प्रत्येक शत्रू हा नंबर एकचाच शत्रू असतो
जसा पाकिस्तान नंबर एक
तसाच चीनदेखील नंबर एकचाच शत्रू

भारतावर यशस्वी आक्रमण करायच्या अगोदर तिबेटमधल्या चीनविरोधी शक्तींचा पुरा नायनाट करा असा हुकूम चिनी सैन्याला मिळायचीच खोटी. १० मार्च १९५९ ला राक्षसी चिनी फौजा तिबेटमध्ये 'त्या कामा'साठी पुन्हा एकदा घुसल्या. तिबेटवर चीनने आक्रमण फार पूर्वीच केले होते; पण नावापुरता का होईना अजून तरी दलाई-लामा तिबेटमध्येच होता. चिनी सैनिक आणि राष्ट्रवादी तिबेटी लोक यांच्यांत तुंबळ युद्ध सुरू झाले. ही बातमी सर्वत्र पसरली मात्र; भारताच्या लोकसभेत पंडित नेहरूंनी भारताची राजकीय प्रतिक्रिया व्यक्त केली. पंडित नेहरू म्हणाले, "तिबेटमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत मी कुठलंच मत व्यक्त करायला तयार नाही. आपण काही मत व्यक्त करणं हे एक तर गोंधळ वाढवण्यासारखं आहेच, पण त्याहीपेक्षा तिथली

| लेखक | अनुवाद | |
|---|---|---|
| ब्रिगेडियर | ॲडव्होकेट | लेखांक |
| ज. पी. दळवी | माधव कानिटकर | पाच |

परिस्थिती अधिक बिकट करायला कदाचित ते कारणीभूत ठरेल." पंडित जवाहरलाल नेहरू पुढे म्हणाले, "तिबेटमध्ये फार मोठ्या प्रमाणांत हिंसा चालू आहे असं मला वाटत नाही. तिबेटमध्ये जे काही आता घडतंय् ते मूलत: 'वैचारिक संघर्ष' या स्वरूपाचं असून मानवी शरीरांची हत्या तिथं होत नसावी, असं मला वाटतं. अशा परिस्थितीत ज्या चीनबरोबर आपली मैत्री आहे त्या चीनच्या अंतर्गत व्यवहारात लक्ष घालण्याची भारताची इच्छा नाही."

एकच चूक भारताने दोनदा केली. याही वेळी तिबेटमध्ये जे काही घडतंय तो चीनचा अंतर्गत प्रश्न आहे असे म्हणून आपण स्वस्थ बसलो.

चिन्यांच्या दृष्टीने अपरिहार्य म्हणून प्रत्येक राष्ट्रवादी तिबेटी बंडखोर क्रूर अंत:करणाने चिरडला जात होता. शेवटी तिबेटमधल्या दलाई-लामाला समजले की आता आपली धडगत नाही. तिबेटमध्ये आता राह्यलो तर कदाचित आपल्याला गोळ्या घातल्या जातील. दलाई-लामा तिबेट सोडून पळत सुटला आणि शिताफीने ल्हासा सोडून भारतात आश्रयासाठी आला. ३ एप्रिल १९५९ पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी जाहीर केले की, '३१ मार्चलाच दलाई-लामा भारताच्या हद्दीत आले असून त्यांच्याच विनंतीवरून त्यांना भारतानं राजकीय आश्रय दिलेला आहे.'

भारत सरकारच्या बड्या-बड्या अधिकाऱ्यांनी दलाई-लामाचे स्वागत केले. त्याच्या राजकीय व्यक्ती आणि धर्मोपदेशक या पदांना ठीक शोभेल अशा तऱ्हेचे ते स्वागत होते. पण त्या स्वागतानंतर मात्र भारत सरकार गंभीर पेचात सापडले. २७ एप्रिलला पंडित नेहरूंनी बोलून दाखवले की, "मी गोंधळात

सापडलो आहे. राजकीय परिस्थिती झपाट्यानं बदलते आहे. तिबेटी जनतेबद्दल संपूर्ण सहानुभूती कायम ठेवून मी चीनशी दोस्ती ठेवण्याचा प्रयत्न करीन !"

कसं जमणार ते ? दलाई-लामाला भारताने आश्रय देणे म्हणजे चीनबरोबर शत्रुत्व ओढवून घेण्यासारखेच होते. पंडितजींनी भोळेपणाने आणि नेहमीप्रमाणे दोन घोड्यांवर पाय ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या एवढेही लक्षात आले नाही की, तिबेटी जनतेबद्दल प्रेम, दलाई-लामाला आश्रय, आणि चीनची मैत्री या तिन्ही गोष्टी एकाच वेळी घडणे शक्य नाही. कारण दलाई-लामा चीनला हवा होता तो त्याचा पुरा 'बंदोबस्त' करण्यासाठी. मूळच उपटले की फांद्या आपोआप खाली येतात. आपला दलाई-लामाच चिनी अधिकाऱ्यांनी चिरडला हे पाहून चिनी माणसाकडे वर मान करून नुसते पाहण्याचीदेखील हिंमत तिबेटी माणसाला झाली नसती. चीनविरुद्ध बोलणे, बंड करणे ह्या गोष्टीच विसरा.

१४ मे १९५९ ला पंडित जवाहरलाल नेहरूंनी या परिस्थितीचा स्पष्ट कबुली-जबाब दिला. पंडितजी म्हणाले, "दलाई-लामाच्या भारतातील अस्तित्वामुळं चीन-भारत यांच्या मैत्रीत थोडासा दुरावा येईल याची मला जाणीव आहे."

तसे काही होऊ नये म्हणून भारताने चीनला खूष ठेवण्याचा प्रयत्न केला. दलाई-लामाला आश्रय दिला पण त्याच्यावर अट घातली की, 'दलाई-लामा ! तुला इथं राहायचं असलं तर राहा. आम्ही तुला संरक्षण देऊ, पण कुठल्याही राजकीय किंवा आंतरराष्ट्रीय हालचाली तुला इथं राहून करायला भारत सरकारची बंदी आहे !'

पंडितजींचा असा अंदाज होता की दलाई-लामावर असा सरकारी हुकूम बजावला की चीन खूष होईल. चीन कदाचित म्हणेल की, 'ठीक आहे. राहू दे दलाई-लामाला भारतात. कम्युनिस्ट चीनबाबत काहीही बोलण्याची किंवा चीन-विरोधी कुठल्याही राजकीय हालचाली करण्याची बंदी भारतात त्याच्यावर आहे ना ? मग भारत आपला मित्रच आहे.'

कम्युनिस्ट चीनला पंडित नेहरूंनी अजून ओळखले नव्हते तर ! एखादा माणूस कम्युनिझमविरोधी आहे असे कळायची खोटी. तो कुठेही राहो, काही बोलो किंवा न बोलो त्याला 'खतम' करून टाकणे हे कम्युनिस्ट राष्ट्रांचे 'पवित्र' कर्तव्य असते. कारण त्यांना हे ठाऊक असते की आज जरी तो साम्राज्यवादी, प्रतिगामी, भांडवलदारांचा हस्तक (!) परिस्थितीमुळे गप्प बसला तरी उद्या जर का परि-स्थिती बदलली तर तो कम्युनिस्टांविरुद्ध बोलायला लागेल ना ! त्याला जिवंतच ठेवायचा नाही आणि म्हणूनच भारत सरकारने दलाई–लामाला आश्रय दिल्या-बरोबर पेकिंग रेडिओवरून भारताविरुद्ध लांबलचक निंदात्मक भाषणं, आणि भारताला गलिच्छ गालिप्रदान सुरू झाले. दलाई लामाला आश्रय देता काय ? मग भारत नक्कीच साम्राज्यवादी, प्रतिगामी, भांडवलदारांचा हस्तक, जंगली आणि विस्तारवादी राष्ट्र आहे.

इथे एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे की, भारताकडे राजकीय आश्रय मागण्यापूर्वी दलाई–लामाने ब्रह्मदेश आणि सिलोन या दोन राष्ट्रांकडे 'आश्रय' मागितला होता. दलाई–लामा हा बौद्धांचा धर्मगुरू आणि ब्रह्मदेश व सिलोन म्हणजे 'बुद्धं सरणं गस्सामी' हा कंठशोष करणारी राष्ट्रे. पण हाय रे बुद्धा ! ती दोन्ही राष्ट्रे शहाणी निघाली. त्यांना हे ठाऊक होते की, राष्ट्रगुरू किंवा धर्मगुरूपेक्षाही राष्ट्र मोठे असते. त्या दोन्ही राष्ट्रांनी विचार केला की, दलाई लामाला आश्रय देऊन चीनसारख्या प्रबळ जंगली राष्ट्राचे शत्रुत्व ओढवून घेण्यापेक्षा तिबेटमध्ये दलाई-लामा मेला तरी चालेल. आणि सिलोन आणि ब्रह्मदेश या दोन्ही राष्ट्रांनी अक्षरशः बुद्धासारखे डोळे मिटून घेऊन दलाई–लामाला 'प्रेमाचा संदेश' पोचवला की 'बाबारे ! 'धम्मं सरणं गस्सामी ।' हे खरोखरच मानत असशील तर इकडं येऊ नको. कारण तुला जर का आम्ही आश्रय दिला तर सिलोन आणि ब्रह्मदेश-मध्ये औषधालादेखील 'बुद्ध' मिळणार नाही अशी आमची स्थिती चीन करून टाकील.'

दलाई-लामा भारतात स्थायिक झाल्याबरोबर चीन भारताविरुद्ध आणखी भडकला. आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास. चिनी नेते पेकिंग रेडिओवरून सांगू लागले की, 'भारत सरकार ब्रिटिशांचं हस्तक आहे. विस्तारवाद हा ते ब्रिटिशां-पासून शिकले. भारतापासून चीनला धोका आहे. लवकरच भारत तिबेटी जनतेवर क्रूर आक्रमण करील.'

चोरांच्या उलटचा बोंबा. भारत–चीन यांच्यांतील वातावरण अशा तऱ्हेने चीनने जाणून बुजून तंग केले. कारण त्यांना पुढे बरीच कामे उरकायची होती. चीनबरो-बर मैत्री हवी होती ती फक्त भारताला. चीनला भारताबरोबरच्या मैत्रीचे नाटक-देखील नको होते. १९५९ मध्येच चीनने हा निर्णय घेतला असला पाहिजे की, 'भारताला एकदा जन्माची याद राहील असा धडा शिकवला पाहिजे.' मात्र त्याच-बरोबर चीनने ही काळजी घेतली की, 'चीननं भारतावर आक्रमण केलं' असे जगातल्या कुठल्याही राष्ट्राने म्हणता कामा नये. आक्रमण तर करायचेच; पण आक्रमण केले असे कुणी म्हणता कामा नये. चीनची सर्व जय्यत तयारी झाली होती. चीनला फक्त काहीतरी निमित्त हवे होते. आणि म्हणूनच चीनने प्रथम 'भांडण' निर्माण करायचे ठरवले. एप्रिल १९५९ मध्ये चीनच्या नॅशनल पीपल्स काँग्रेसपुढे भाषण करताना चीनचे पंतप्रधान चाऊ-एन-लाय स्पष्टपणे म्हणाले की 'चीन आणि भारत यांच्या सरहद्दीचा प्रश्न अजून सुटलेला नाही. आपण अशी आशा करू या की, भारतीय नेते हा प्रश्न शांततेच्या मार्गांनी आणि खेळीमेळीच्या वातावरणात सोडवतील.'

आधी जो प्रश्न नव्हता तो 'प्रश्न' झाला. तो सोडवायचा आपल्या नेत्यांनी आणि तोदेखील शांततेने आणि खेळीमेळीच्या वातावरणात. खरे काय आहे ते न

सांगता उगाचच दुसऱ्याला डिवचणारे भापण करून वर साळसूदपणाचा आव आणणे याला म्हणतात राजकारण. चीनच्या पंतप्रधानांचा असा अंदाज होता की आपण असे काही बोलली की, भारत सरकार खवळून उठेल. आणि आपल्याला भारतावर आक्रमण करण्याचे ' निमित्त ' सापडेल. पण कसचं काय नि कसचं काय. चाऊ–एन–लायनी इतका स्पष्ट इशारा देऊनदेखील भारत सरकार थंड बसलं. आपला तो नेहमीचा आणि आवडता निषेधखलितादेखील चीनला आपण पाठविला नाही. एका वेगळ्या अर्थाने भारत सरकारने चाऊ–एन–लायची पंचाईत करून टाकली. त्याला अडचणीत आणला. कारण तो चिनी पंतप्रधान आपण रागवावे म्हणून मुद्दाम काहीतरी बोलला, पण आपण मुळी रागावलोच नाही !


...तेव्हा कुठे चाऊ-एन-लायच्या लक्षात आले की भारत आपल्याला आक्रमणासाठी निमित्त देत नसेल तर आपल्यालाच आक्रमणाच्या समर्थनासाठी काहीतरी कुरापत काढली पाहिजे. आणि चीनने हिंदुस्थान तथा भारताची गंमत सुरू केली.

ऑगस्ट ते ऑक्टोबर १९५९ या तीन महिन्यांत चीनने भारताची मस्करी चालवली ती अशी की, भारतीय हद्दीत घुसायचे आणि परत जायचे. आक्रमण नव्हे, आक्रमणाची तयारी आणि पार्श्वभूमी होती. चीनला फक्त भारत सरकार आणि भारतीय जनता यांना भडकावून द्यायचे होते. केव्हाना केव्हातरी भारतीय सेना हा जाणूनबुजून होत असलेला ' चिनी चावटपणा ' थांबवण्यासाठी पाठवली जाईल. मग चीन लढाई सुरू करून भारताच्या हद्दीत मुसंडी मारील आणि यशस्वीरीत्या भारताचा प्रचंड प्रदेश कायमचा खाऊन टाकून वर पुन्हा साळसूदपणे सांगू शकेल की, आम्ही आक्रमण केलेले नाही. वादग्रस्त ( ! ) प्रदेशात भारताने सैन्य पाठवले मग काय चीन स्वस्थ बसेल ? चीनने फक्त त्यांच्या हितसंबंधांच्या संरक्षणासाठी नाइलाजास्तव मुक्ती सैन्य पाठवले. उलट भारताचाच चीनवर आक्रमण करण्याचा डाव होता. म्हणून तर भारताने वादग्रस्त टापूत सैन्य घुसवले.... आणि दुर्दैवाने पंतप्रधान चाऊ-एन-लाय यांचा हा पवित्रा आणि डाव यशस्वी ठरला.

दि. २८ ऑगस्ट १९५९ ला भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केवळ नाइलाज म्हणून भारताच्या लोकसभेला खरी माहिती दिली. प्रथम आणि सुरुवातीलाच पंडित नेहरूंनी ही कबुली दिली की, ' अक्साई-चीन या भारताच्या हद्दीत येणाऱ्या प्रदेशात चीननं एक महत्त्वाचा मोठा रस्ता बांधला आहे. या रस्त्याची टेहळणी करण्याकरता आपण पाठवलेल्या ' टेहळणी पथका 'ला चिन्यांनी अटक केली आहे. संशयातीतरीत्या आपल्या हद्दीत असलेल्या स्पँगूर या ठिकाणी चिन्यांनी त्यांचा तंबू ठोकला आहे. '

भारताच्या लोकसभेत प्रत्यक्ष पंतप्रधानांकडून ही प्रक्षोभक माहिती ऐकून हलकल्लोळ माजला. केवळ विरोधी पक्षांचेच नव्हे तर काही सरकार पक्षाचे खासदारदेखील खवळले. पंतप्रधानांवर प्रश्नांचा भडिमार सुरू झाला. तेव्हा कुठे पंत-

प्रधान नेहरूंनी आणखी कबुली दिली की, " आणखी दोन–तीन ठिकाणीदेखील भारताच्या हद्दीत घुसून तिथे कॅम्प्स उघडले आहेत. ' प्रथम पंडित नेहरूंनी किंझमाने या भारताच्या हद्दीत असलेल्या ठिकाणी काय घडले ते सांगितले. पंडितजी म्हणाले, " ७ ऑगस्ट १९५९ ला जवळ जवळ २०० चिनी सैनिक आपल्या हद्दीत किंझमाने या ठिकाणी घुसले. किंझमाने हे ठिकाण आपल्या हद्दीत केमाँग फ्रॉंटीयर डिव्हिजन या नावानं ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात आहे. त्या वेळी आपल्या सरहद्दीच्या संरक्षणासाठी किंझमाने या ठिकाणी आपले फक्त १० लोक होते. कदाचित बाराही असतील (! ). आता २०० माणसांसमोर १०–१२ लोक काय करणार ? आपल्या सैनिकांनी चिनी सैनिकांना ' विनंती ' ( सैनिक आणि ' विनंती ?' ) केली की, ' कृपा करून परत जा, ही जमीन आमची आहे. ' त्यावर चिनी सैनिकांनी आपल्या लोकांना ढकलून दिलं. अक्षरशः मागं ढकलून दिलं. अशा तऱ्हेनं चिन्यांनी जवळ जवळ २ मैल आपल्याच हद्दीत आपल्याला मागं रेटलं. गोळीबार केला नाही. काही


वृन्हमुंबईकरिता वितरक

**मे. बी. जयंतीलाल ॲण्ड को.,** १५ मंगलदास रोड, मुंबई २

वृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक

**मे. एस्. एम्. प्रभू ॲण्ड सन्स,** १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

वेळ दोन्ही पक्षांचे लोक समोरासमोर उभे राहिले, त्या वेळी आपले लोक आपल्याच हद्दीत २ मैल मागे आले होते. काही वेळानंतर चिनी निघून गेले आणि पुन्हा एकदा पुढं जाऊन भारतानं योग्य त्या ठिकाणी खुंटा ठोकून 'ही जमीन आमची आहे!' हे सिद्ध केलं! (२०० चिनी सैनिक चीनच्या हद्दीत परत गेल्यानंतर!) थोडया वेळानं चिनी सैनिक पुन्हा परत आले. त्यांनी आपल्या लोकांना धमकावलं की, 'आत्ताच्या आत्ता तुमचे खुंटे उपटा. तुमचा तिरंगी झेंडा खाली उतरवा आणि मघाशी मागं गेला होता तितके मागे जा. नाहीतर भारी पडेल; कारण ही जमीन आमची आहे.' मात्र आपल्या जवानांचं नीतिधैर्य उत्तम होतं (नशीब!) त्यांनी तसं मागं जायला नकार दिला. मग मात्र चिनी सैनिक परत गेले. हा प्रकार जवळ जवळ दोन आठवडयांपूर्वी घडला."

त्यानंतर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी लोकसभेला दुसरा प्रसंग सांगितला; "लोकसभेच्या सन्माननीय सदस्यांनो, मी आता सांगणार असलेला दुसरा प्रसंग नुकताच घडला आणि वस्तुतः त्याचा ७ ऑगस्टला किझमाने इथं घडलेल्या पहिल्या प्रसंगाशी संबंध आहे. घटना सुसंगत घडविण्यात येत आहेत. २५ ऑगस्टला फार मोठया संख्येनं आलेल्या चिनी फौजी तुकडया आपल्या हद्दीत घुसल्या. आपल्या हद्दीतील लोंगजू विभागात त्यांनी गोळीबार केला. गेल्या जून महिन्यातच चीनकडून 'भारतानं लोंगजूमध्ये अतिक्रमण केलेलं असून, चीनविरुद्ध असलेल्या तिबेटी बंडखोरांशी भारतानं संधान बांधलेलं आहे असं आम्हांला कळतं. याचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो!' अशा अर्थाचा निषेधखलिता आपल्याला आला होता. पण त्या वेळी ते प्रकरण तेवढयावरच थांबलं होतं. आपल्या संरक्षक जवानांवर चिनी सैन्यानं अचानक हल्ला केला. ते लोक फार फार २०० किंवा कदाचित ३०० असतील. त्या विभागातदेखील संरक्षणासाठी आपले फक्त १२ लोक होते. लोंगजू हे ठिकाण भारत-तिबेट सरहद्दीवरच आहे, असं मला वाटतं (!) (As we conceive) लेमकिंग या भारताच्या हद्दीत असलेल्या ठिकाणापासून लोंगजू अंदाजे ५ दिवसांच्या वाटचालीवर आहे. २६ ऑगस्टला चिनी सैनिक पुन्हा चाल करून आले. त्यांनी लोंगजूमधील आपल्या चौकीला वेढा दिला आणि गोळीबार केला. मात्र आपल्यापैकी कुणीही जखमी झाले नाही; कारण आपल्या लोकांनीदेखील चिन्यांवर उलट गोळीबार केला. मात्र ज्या वेळी चिन्यांचा जोर वाढतो आहे असं आपल्या लक्षात आलं, त्याच वेळी आपण मागं हटलो. त्याशिवाय दुसरा इलाज नव्हता. प्रबळ चिनीशक्तीपुढे आपल्याला आपलंच ठिकाण सोडावं लागलं."

पंडित नेहरूंचे हे वाक्य पूर्ण होतंय न होतंय तोच लोकसभेत कडाडून आवाज उमटले.

"त्यानंतर पंतप्रधान! तुम्ही काय केलंत ते सांगा."

आणि काकुळतीने पंतप्रधान पुढे म्हणाले, "सांगतो पण तुम्ही मला बोलूच देत

नाही, त्याला मी काय करू ? नीट ऐका. मी तांबडतोब चीनला या प्रकारांबद्दल तीव्र भाषेत निषेधखलिता पाठविला. एवढंच नव्हे तर चिन्यांनी ज्या आपल्या प्रदेशांचा अन्यायानं कबजा घेतला आहे ते प्रदेश परत मिळविता येण्यासारखे असतील तर परत मिळवा, असा हुकूम मी भारतीय सेनेला दिला ! "

पंतप्रधान पुढे म्हणाले की " या प्रकारानंतर मी प्रथमच सरहद्दीवरचा नेफा हा प्रदेश आपल्या सैन्याच्या ताब्यात दिला आणि आदेश दिला की, काहीही करून नेफा, लोंगजू आणि लडाख ह्यांचं संरक्षण करा ! "

"त्याप्रमाणं आपल्या सैन्यातील 'आसाम रायफल्स' ही तुकडी नेफाकडे रवाना झालेली आहे. आसाम रायफल्स ही तुकडी 'आसाम रायफल्स डिरोक्टरेट'च्या हुकमती खाली आहे. 'आसाम रायफल्स डिरोक्टरेट' आसामच्या राज्यपालांच्या हुकमतीखाली आहे आणि आसामचा राज्यपाल हा केन्द्र सरकारचा प्रतिनिधी म्हणून या सरकारच्या हुकमतीखाली आहे. तूर्त नेफामध्ये आसाम रायफल्स् ही आपली तुकडी राहील आणि जरूर भासलीच तर आणखी फौज पाठविली जाईल. मात्र आसाम रायफल्स् ही तुकडी संपूर्णपणे लष्करी अधिकाऱ्यांच्या हुकमाप्रमाणेच पावलं टाकेल; कारण आता नेफा विभाग लष्कराच्या ताब्यात दिलेला आहे ! "

हे आधीच केलं असतंत तर ? पण हे पंडितजींना विचारणारा होता कोण ? तुमचा कदाचित विश्वास बसणार नाही, पण पंडित नेहरूंच्या या निवेदनाने लोकसभेतील विरोधी पक्षांचे व वृत्तपत्रप्रतिनिधींचे पूर्ण समाधान झाले. पंडितजींनी संरक्षणासाठी केलेली ही 'व्यवस्था'(!) पुरेशी होती का नाही, हा प्रश्नच उपस्थित केला गेला नाही. पंडितजींनी दिलेली माहिती अभ्यास करून नीट तपासून पाहयला नको होती ? कुणीही असा प्रश्न पंडित नेहरूंना याच वेळी विचारला नाही, की 'पंतप्रधान ! चिन्यांचं किती डिव्हिजन सैन्य सरहद्दीवर त्यांनी आणून ठेवलंय हे तुम्हांला ठाऊक आहे का ? फक्त आसाम रायफल्स ही आपली तुकडी देशाचं संरक्षण करू शकेल का ? जरूर लागली तर आणखी फौज पाठवू असे म्हणता, पण कुठून आणणार आहात ही 'आणखी फौज ?' उत्तर सरहद्दीवर अचानक धोका उत्पन्न झाला तर राखीव फौज आपल्याकडे आहे कुठे ? गेल्या २० वर्षांत तुमच्या मंत्रीमंडळानं तर वेळोवेळी सैन्यात वाढ करण्याची परवानगी सेना-अधिकाऱ्यांनी तशी मागणी केलेली असूनदेखील नाकारली ना ? अंदाजपत्रक लोकसभेला सादर करताना मोटरी, नायलॉन, विडी, सिगारेट, पेट्रोल, तंबाखू यांवर टॅक्स वाढवलेत, पण सैन्यावर त्यातले किती पैसे खर्च केलेत ? केलेले नसलेत तर का केले नाहीत? आणखी फौज पाठवणार आहात ती हिन्दुस्थान आणि पाकिस्तान यांच्या सरहद्दीवर संरक्षणासाठी असलेली आपली फौज काढून घेऊनच ना ? मग तिथली आपली सेना काढून घेतल्यानंतर पाकिस्तानने गडबड सुरू केली तर ? एक भगदाड बुजवायला जायचं आणि दुसरं उघडं ठेवायचं ! हा काय कारभार आहे ? तुम्ही

अशा कोणत्या राजनैतिक हालचाली केल्या आहेत की, ज्यांवरून तुम्ही या सभागृहाला असं निश्चित आश्वासन देऊ शकाल की चीनशी आपली लढाई चालू असेपर्यंत पाकिस्तान नक्की आक्रमण करणार नाही ? पाकिस्तान आणि चीन हे दोन्ही शत्रू दोन्हीकडून घुसले तर आपली तयारी काय आहे ? ही दोन युद्धं एकाच वेळी सुरू झाली तर देशाची अर्थव्यवस्था कोसळेल की नाही ? नुसती बजेटं कसली ' सादर करता ! ' सांगा कुठून आणणार आहात आयत्या वेळी पैसा ? आतातरी सैन्यात वाढ करणार अहात का ? हिमालयासारख्या दुर्गम प्रदेशात लढाईसाठी जी आणि ज्या प्रकारची शस्त्रास्त्रं लागतात ती आपल्याकडं आहेत का ? '

पण...पण यांपैकी एकही प्रश्न लोकसभेत कुणी उपस्थित केला नाही. कारण लोकसभेत फक्त ' नेते ' असतात लष्करी अधिकारी नसतात. मी वर फक्त काय काय प्रश्न विचारायला पाहिजे होते याची नुसती ढोबळ कल्पना दिलेली आहे. या प्रश्नांची नुसती लोकसभेत चर्चा झाली असती तरी वृत्तपत्रांच्या संपादकांना ' देश धोक्यात आहे ' हे सर्वसामान्य माणसाला समजेल असे सडेतोड अग्रलेख लिहायला प्रोत्साहन मिळाले असते; पण लोकसभेत भारताच्या संरक्षणाच्या प्रश्नावर फक्त कागदी घोडे नाचवले गेले.

त्या वेळी हयातीत प्रथमच पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे देशाचे संरक्षण आणि त्यासाठी भारतीय सैन्याची मदत लागते अशा अर्थाची वाक्ये लोकसभेत बोलले. स्वातंत्र्य मिळाल्यापासून २० वर्षांत चीनपासून आपल्याला काय धोका आहे, त्यासाठी काय तयारी करावी लागेल, हा विचारसुद्धा त्यांच्या मनात आला नव्हता अगदी प्रत्यक्ष चीनबरोबर लढाई सुरू होईपर्यंत – १९६२ पर्यंत. चिन्याकडून भारताच्या सरहद्दीत घडवले गेलेले सर्व प्रक्षोभक प्रकार हे पंतप्रधानांनी वेगवेगळे व सरहद्दीवर घडणारे ' किरकोळ ' प्रकार मानले. त्यांच्या एवढे लक्षात आले नाही की चिन्यांकडून घडणाऱ्या प्रत्येक दुसऱ्या ' प्रकारा 'चा पहिल्या ' प्रकारा 'शी काहीतरी संबंध आहे. त्यात सुसंगती आहे. काहीतरी त्यामागे त्यांचा हेतू असावा. हे प्रकार बंद पाडायचे असतील तर आत्ताच सैन्याला हुकूम द्यायला पाहिजे की हे प्रकारच बंद पाडा; म्हणजे पुढचा ' मोठा प्रकार ' निर्माणच होणार नाही.

सप्टेंबर १९५९ मध्येच चीनने जाहीररीत्या भारताच्या भूमीपैकी लडाख आणि नेफामधील ५०,००० चौरस मैल (पन्नास हजार चौरस मैल) इतकी जमीन ही चीनचीच आहे, असा दावा केला. आणि १९६१ मध्ये भारत सरकारच्या लक्षात काय आले ? तर चिनी आक्रमण थांबवायचे असेल तर थोडीबहुत (!) (Limited defence measures ! ) लष्करी तयारी करायलाच हवी !

चिनी पंतप्रधान चाऊ-एन्-लाय निश्चित आणि जोरदार भाषेत सांगत होता की, " एकदा केव्हातरी भारत आणि चीन यांच्यांतली सरहद्द ठरवून घ्यायला हवी. कारण मॅकमोहन रेषा ही सरहद्दीची रेषा म्हणून चीन मानीत नाही. "

... आणि चाऊ-एन्-लाय खरे बोलत असला पाहिजे, असे अप्रत्यक्षरीत्या खुद्द पंडित जवाहरलाल नेहरू–भारताचे पंतप्रधान–म्हणत होते. वेळोवेळी पंडित नेहरूंची लडाख आणि नेफाकडे पाहण्याची वृत्ती 'ते फारच लांबचे प्रदेश आहेत' अशी होती. एकदा तर पंडितजींनी अशी कबुली दिली की, लडाखमध्ये सरहद्दीची अशी निश्चित रेषाच नाही. आपले पंतप्रधान म्हणत होते हे ! चाऊ-एन्-लाय नव्हे. सरहद्दीवर घडत असलेल्या प्रकारांबाबत विचारणा केली असता एकदा पंडित नेहरूंनी उत्तर दिले, "सरहद्दीवरचे हे प्रकार म्हणजे पुढं काहीतरी गंभीर घडणार आहे याची पूर्वचिन्हं आहेत असं मला वाटत नाही. चीनकडून आपल्यावर हल्ला केला जाणार नाही, अशी मला खात्री आहे."

चीनपासून निर्माण होत असलेल्या धोक्याकडे बघण्याचा संरक्षणमंत्री श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांचा दृष्टिकोणदेखील असाच होता. असे म्हणतात की ते असे सांगत असत की, "एकतर लडाख आणि नेफा हे प्रदेश फार दूरवर आहेत म्हणून तरी म्हणा किंवा सरहद्दीबाबतचं आपलं अज्ञान म्हणून तरी म्हणा किंवा दुसरीही अनेक कारणं अशी आहेत की ज्यांमुळं आम्ही असं ठरवलंय की चीनबाबत फार गंभीर विचार करण्याचं कारण नाही. हा प्रश्न चीनबरोबर वाटाघाटी करून सुटण्यासारखा आहे. शिवाय १९५८ पासून चीनला आम्ही पुन्हा पुन्हा सांगत आलेले आहोत की ते प्रदेश आमचे आहेत."

ही विचारसरणी पुढे इतक्या थराला गेली की, "सरहद्दीचा असा काही प्रश्न खरं म्हणजे आता शिल्लकच नाही. कारण नाहीतरी लडाख आणि नेफामध्ये गवताचं एक पातंदेखील उगवत नाही. तो ओसाड प्रदेश आहे." हे बोलणारी भारतीय माणसेच निघाली. चिनी नव्हेत.

चीन-भारत प्रश्नांवर लोकसभेतले वातावरण हे असा सावळा-गोंधळ निर्माण करणारे होते. या प्रश्नाचा उपयोग लोकसभेत व्यक्तिगत हाडवैरापोटी निर्माण


अर्कशाला निर्मित

गंधर्व हरीतकी
संवय न लागणारे
सौम्य विरेचक

आम्लोविन
आम्ल पित्तादी विकारावर
व प्रवासांत होणाऱ्या
ओकारीवर प्रतिबंधक

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

झालेल्या वैमनस्यांसाठी खासदार करून घेऊ लागले. संरक्षणाच्या त्या वेळच्या चर्चा म्हणजे फक्त पाल्हाळ, शब्दांचे अवडंबर आणि गरमागरमीचे वातावरण होते. 'देशाचे हित' बिचारे लोकसभेच्या कोपऱ्यात पडून राहून केविलवाण्या नजरेने वाट पाहत होते की हे खासदार खऱ्या अर्थाने माझ्याबद्दल कधी बोलणार आहेत ?

भारतावर राज्य करणाऱ्या, सर्व पक्षांत बलवान असलेल्या काँग्रेसमध्ये भिन्न प्रकृतिधर्माच्या व्यक्तींची खिचडी झाली होती. त्या वेळी काँग्रेसमध्ये राजे होते (निवडून आलेले), तसेच भिकारी होते. काँग्रेसमध्येदेखील डावे आणि उजवे असे दोन तट पडले होते. काँग्रेसचे वर्णन त्या वेळी असेच करता आले असते की स्वतःच्या स्वार्थाव्यतिरिक्त अन्य कुठल्याही बाबतींत एकमेकांशी न पटणाऱ्या अक्षरशः अगडबंब आणि बेडौल व्यक्तींचा संयोग म्हणजे काँग्रेस. असा पक्ष चीनचा प्रश्न सोडवायला खरोखरच असमर्थ होता. पण हे जनतेला कळायला हवे होते ना ! ही सर्व 'अगडबंब आणि बेडौल' माणसं जनतेनंच निवडूनदिली होती. देशाच्या संरक्षणासारख्या महत्त्वाच्या विषयावर आपण जे धोरण ठरवू त्यात विरोधी पक्षाच्या नेत्यांचा विचार घेऊन ते धोरण तरी सर्वपक्षीय करू हा विचार पंडित नेहरूंना मान्य नव्हता.

परदेशांशी संबंध असलेल्या कुठल्याही प्रश्नावर पंडितजी विरोधी पक्षांच्या नेत्यांशी एक शब्द बोलत नसत. तो विचारदेखील त्यांना असह्य होत असे. उलट असे सर्व प्रश्न फक्त आपल्या एकट्याच्याच विचाराने हाताळले गेले पाहिजेत या बाबतीत त्यांचा अट्टाहास असे. सल्ला घेतलाच तर फार फार तर श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांचा.

चीनच्या प्रश्नावर लोकसभेत होणाऱ्या चर्चा निरर्थक होत होत्या. तशातच काँग्रेससकट बाकी सर्व पक्षांचे नेते पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वापुढे नमते घेणारे. मग काय विचारता ? भारताच्या संरक्षणाचे धोरण नेहरू ठरवतील ते आणि पंडितजी तर शांतीची जपमाळच घेऊन बसलेले. भारत-चीन तंटा शांततेच्या मार्गाने–वाटाघाटीने–सुटेल हे सूत्र घेऊन. भारताचे संरक्षणविषयक धोरण भलत्या दिशेने वाहत जाऊ लागले. नंतर १९६१-६२ मध्ये जेव्हा का विरोधी पक्षांच्या सभासदांनी सत्य उजेडात आणून पंतप्रधान पंडित नेहरूंच्या धोरणाची चिरफाड सुरू केली, त्यांना असह्य टोमणे मारले तेव्हा 'भारताच्या संरक्षणाच्या प्रश्नावर मी पण तुमच्याइतकाच करारी आणि निग्रही आहे,' असा भलताच आव पंडितजींनी आणला. विरोधी पक्षांच्या कुत्सित टीकाकारांना शांत करण्यात पंडित नेहरू यशस्वी ठरले; पण चीनचे 'हृदयपरिवर्तन' करण्याच्या बाबतीत नेहरू संपूर्ण अयशस्वी ठरले. आपल्या शत्रूचे हृदयपरिवर्तन करण्याचा विचारदेखील माणसाने मनात आणू नये. शत्रूला हृदय असतेच असे नाही. चीनला हृदय नव्हते आणि नाही. नुसते पाहिले

तरी दया यावी अशा अवस्थेत असलेल्या आपल्या संरक्षक चौक्या आणि तिथले १० - १२ सैनिक यांच्यावर राक्षसी चिनी फौजा अक्षरशः तुटून पडल्या त्या काय त्यांना हृदय होते म्हणून ? पण त्यांना तरी कसा दोष द्यायचा ? ते आपल्याच सरकारच्या खास परवानगीने ' सर्व काही ' पाहून गेलेले. आपले कुठले ठिकाण किती अंतरावर आहे, तिथे संरक्षणाच्या दृष्टीने भारताची तयारी कितपत आहे, याची खडान् खडा माहिती भारत सरकारपेक्षाही चिनी सरकारला जास्त होती. आणि चिनी सरकारला हेही ठाऊक होते की हृदय ही सहज परिवर्तन करून टाकण्याची चीज नसून ते लढाईत गोळी मारण्याचे उत्तम ठिकाण आहे. हृदयाचाच चक्काचूर! परिवर्तन कसले करता ?

किंझमाने आणि लोंगजू या दोन ठिकाणी चिन्यांनी इतके प्रक्षोभक प्रकार करूनदेखील आपण आपले सुस्त. आपल्या संरक्षणविषयक धोरणात शंकांचे काहूर आणि गोंधळ.


किंझमाने या ठिकाणी काय घडले ते प्रथम पाहू. प्रत्यक्ष गोळीबार न करता २०० चिनी सैनिकांनी आपल्या १० – १२ जवानांना ढकलीत–अक्षरशः ढकलून देत – २ मैल भारतीय हद्दीत मागे हटवले. केवढा हा अपमान ! केवळ १२ जवानांचा नव्हे, सबंध राष्ट्राचा. त्या वेळीच का नाही कुणाचे रक्त खवळले ? आणि ही ढकलाढकली – दंडेली चिन्यांनी तिथेच का केली ? उगाच नव्हे. किंझमाने हे आपले ठिकाण थांग-ला पर्वतराजीच्या अगदी पूर्वेला आहे आणि १९६२ मध्ये चिनी फौजांनी मुसंडी मारली ती प्रथम तिथूनच. चीन पुन्हा पुन्हा सांगत आला होता की, १९१३ – १४ चा ब्रिटिश इंडिया आणि तिबेट यांच्यांत झालेला करार – सिमला करार – आम्हांला मान्य नाही. याच सिमला कराराप्रमाणे मॅकमोहन रेषा ही भारत आणि तिबेट यांची आन्तरराष्ट्रीय सीमारेषा म्हणून मान्य करण्यात आली होती. आणि चीन धूर्तपणे हे जाहीररीत्या सांगत होता की तो सिमला करार चीनला मंजूर नाही. कारण तो करार झाला तेव्हा चिनी प्रतिनिधी हजर असला तरी त्याने त्या करारावर सही केलेली नाही. शिवाय ब्रिटिशांसारख्या प्रबल, साम्राज्यवादी, विस्तारवादी, प्रतिगामी राज्यकर्त्यांनी तिबेटसारख्या ' गरीब बिचाऱ्या ' राष्ट्रावर दडपण आणून तो करार करवून घेतलेला आहे. ज्या मॅकमोहन रेषेला भारत आणि तिबेट यांची सीमारेषा म्हणून मान्यता द्यायला चीन तयार नव्हता ती मॅकमोहन रेषादेखील चीनच्या मते थांग-ला, किंझमाने या प्रदेशातून जात नसून ती भारताच्या हद्दीतच अलीकडे दोन मैल आतून जाते....आणि चीन त्याचे हे मत फक्त व्यक्त करून थांबला नाही. त्यांच्या मते जे होते ते बरोबरच होते. ते चीनचे मत तपासून पाहण्याची, भारताशी या बाबतीत चर्चा करण्याची, चीनला जरुरी वाटली नाही...त्यांनी सरळ दादागिरी करून भारतीय जवानांना भारतीय हद्दीतच आत दोन मैल ढकलीत आणले ते यासाठी. पंतप्रधान पंडित

जवाहरलाल नेहरूदेखील या मॅकमोहन रेषेबद्दल ठाम आणि स्पष्ट मत देत नव्हते. पंडित नेहरू फक्त, 'आमच्या मते भारत आणि तिबेट यांच्यामध्ये आन्तरराष्ट्रीय सीमारेषा असली पाहिजे.' असे मोघमात बोलत होते. पण ती आन्तरराष्ट्रीय सीमारेषा निश्चित कुठून कशी जाते, तिथून आम्ही एक इंचदेखील मागे यायला तयार नाही. या आणि अशा स्पष्ट दमदार शब्दांत प्रत्यक्ष आपले पंतप्रधान बोलायलादेखील या वेळी तयार नव्हते.

१९६० मध्ये भारत–तिबेट सरहद्दीचा प्रश्न चीनशी शांततापूर्ण वाटाघाटी करून सोडवण्याचा प्रयत्न झाला. भारताने चीनशी बोलणी सुरू केली. त्या वाटाघाटींत चिनी शिष्टमंडळाने अनेक नवे किचकट प्रश्न उपस्थित केले. 'वाटाघाटी' या शब्दाचा अर्थ चिनी अधिकारी बहुधा वाटा चीनला आणि घाटा भारताला असा करीत असावेत. कारण तसे काही होत नाही असे दिसल्याबरोबर चीनने सूर बदलला. आणि वाटाघाटी फिसकटल्या. मात्र या शांततापूर्ण वाटाघाटींत त्या फिसकटल्या तरी चीनचाच जास्त फायदा झाला. कारण भारताने उत्तर सरहद्दीवरच्या प्रदेशाबाबत चीनशी बोलणी सुरू केली याचा अर्थ तो प्रदेश जो निश्चितपणे भारताचा होता तो या बोलण्यामुळे एकदम 'वादग्रस्त टापू' झाला. चीनने वाटाघाटी करण्यासाठी शिष्टमंडळ पाठवले ते प्रश्न सोडवण्यासाठी नव्हे तर भारताची भूमी ही वादग्रस्त भूमी करून टाकण्यासाठी. चीनचे काम झाले होते. पुढे मी विस्ताराने सांगणारच आहे, पण आता विषयाच्या ओघात आपल्याकडून झालेली एक घोडचूक थोडक्यात सांगतो. ६२ च्या लाल स्वारीला तोंड लागण्यापूर्वीच घडलेली ही आपली पहिली चूक होती. मे–जून १९६२ मध्ये प्रथमच भारताने धोला या ठिकाणी आपली एक चौकी उभारली. ज्या ठिकाणची स्वातंत्र्य मिळाल्यापासून सतत १४–१५ वर्षे 'फार लांबचा प्रदेश, ओसाड प्रदेश, जेथे गवताचे एक पातेदेखील उगवत नाही' या शब्दांत उपेक्षा झाली होती तिथे १९६२ पर्यंत आपली चौकी अजिबात नव्हती. जो प्रदेश चीनशी वाटाघाटी केल्यामुळे आता वादग्रस्त झाला होता, तिथे आपली चौकी १९६२ मध्ये प्रथमच पाहिल्याबरोबर चिनी खवळले. रागाने पिवळे पिवळे झाले आणि चीनने काव काव सुरू केली, "पाहा, वादग्रस्त टापूत भारताने आगळीक केली. चिनी हद्दीत आक्रमण केले. आता चीनच्या संरक्षणासाठी चीनला गंभीर हालचाल करावीच लागेल." चीनने कांगावा चालू ठेवला तरी मनात मात्र चिनी हसत होते. त्यांना ठाऊक होते धोला या ठिकाणी भारताने ठाणे निर्माण केले असले तरी त्या ठाण्याचे संरक्षण करण्यासाठी तिथे पुरेसे लष्करी सामर्थ्य नाही! चिनी लष्करी अधिकारी चेष्टेने मनातल्या मनात भारताला उद्देशून म्हणत असावेत की 'बांधा! बांधा! चौक्या बांधा, आणखी चार बांधा. तुम्हांला त्या बांधायला दोन तास लागतील, पण आम्हांला त्या उडवून द्यायला दोन मिनिटंदेखील लागायची नाहीत. नुसती चौकी

निर्माण करून भागत नाही. ती लढवावी लागते आणि त्यासाठी प्रत्येक संरक्षक चौकीमागं लष्करी सामर्थ्य लागतं. वेळ येईल तेव्हा हे तुमचं सगळं 'बांधकाम' आम्ही उडवूनच देणार आहोत. आताच उडवून देत नाही, कारण आम्हांला या तुमच्या चौक्या तिथं सध्या हव्याच आहेत. त्याशिवाय वादग्रस्त प्रदेशात भारतानं आगळीक केली अशी बोंबाबोंब आम्हांला कशी बरं करता येईल ? '

किझमाने आणि लोंगजू या दोन ठिकाणी हेच घडले. तिथे आपले फक्त १० ते १२ जवान होते तर त्यांना आत 'ढकलायला' आलेल्या चिन्यांची संख्या होती २०० ते ३००. शिवाय त्या २०० ते ३०० चिनी सैनिकांना पाठीमागून व्यवस्थित रसद पोहोचवली जात होती तर आपल्या १०–१२ जवानांना अन्न-वस्त्रासाठी अक्षरशः आकाशाकडे डोळे लावावे लागत होते. कारण त्यांना पुरवठा होत होता तो फक्त विमानांतून पिशव्या खाली टाकून. त्या २००–३०० चिनी सैनिकांच्या मागे अगणित सशस्त्र चिनी सैनिक जय्यत तयार, तर आपल्या १०–१२ जवानांच्या मागे कुणी नाही. फक्त पर्वतांच्या रांगा. ह्या सगळ्या अडचणी दिसत असूनदेखील भारत सरकारने फॉरवर्ड पॉलिसी या शब्दाच्या आहारी जाऊन १९६१–६२ मध्ये लडाख-नेफामध्ये भराभर चौक्या उघडायला सुरुवात केली. धोला हे असेच एक ठिकाण होते त्या ठाण्यावर आपले मोजून ४० जवान फक्त होते. धोला हे ठिकाण तर चिन्यांना फारच महत्त्वाचे होते. त्यांनी त्या ठिकाणाबाबत तर पैजेचा विडाच उचललेला होता. कारण, त्यांची योजना अशी असावी की, या ४०–फक्त ४०– भारतीय जवानांना नाम–का–चू खिंडीपर्यंत मागे भारतीय हद्दीत रेटवीत न्यायचे, तावांगमध्ये भारताच्या या अजब संरक्षक व्यवस्थेला उघडी-नागडी करून टाका-



यची, की पुढे आसामपर्यंत रस्ता सरळ आहे. चिन्यांच्या डोक्यात हे होते. पण चिन्यांचे लष्करी डावपेच आपल्या पंतप्रधानांना कळत नव्हते. कारण त्याच वेळी पंतप्रधान नेहरू लोकसभेत या गंभीर परिस्थितीबद्दल बोलताना 'चिनी आले... आपल्या जवानांनी त्यांना परत जायची विनंती (!) केली...गोळीबार झाला नाही...चिन्यांनी आपल्याला ढकलून दिलं...चिनी परत गेले...आपले जवान पुन्हा पुढं गेले...नीतिधैर्य उत्तम आहे......चिनी पुन्हा परत आले... त्यांनी पुन्हा आपल्या जवानांना मागं जायला सांगितलं...आपण नाही म्हणालो...बस. तिथंच तो 'प्रकार' थांबला.' या भाषेत बोलत होते. काय हे? पंडितजींच्या भ्रामक विचारसरणीमुळेच ज्या वेळी १९६२ मध्ये चिनी फार मोठ्या संख्येने आत घुसले, त्या वेळी घोला हे आपले ठिकाण बघता बघता पडले. अवघे ४० जवान नको त्या ठिकाणी मृत्यूच्या जबड्यात अलगद सापडले. आणि मग आपल्याला आश्चर्य वाटले की "अरे, बापरे! असं झालं तरी कसं! चिनी एवढ्या मोठ्या संख्येनं येतील असं वाटलं नव्हतं."

...पण ते तसे होणारच होते केव्हा ना केव्हा तरी. लोंगजू इथे घडलेल्या प्रकाराबद्दल पंडित नेहरूंची ही भाषा पाहा– "चिनी आले...त्यांनी गोळीबार केला... पण आपल्यापैकी कुणी जखमी झालं नाही...चिन्यांनी आपल्या चौकीला वेढा दिला...त्यांनी आपल्या जवानांना पकडून नेलं...त्यांची ताकद जास्त होती... ते ठिकाण आपण शेवटी सोडून दिलं...परत आलो."

आपल्या जवानांना अटक केली. नुसते ढकलले नाही नेहमीप्रमाणे, ही काय साधी गोष्ट होती? पुढच्या होणाऱ्या लढाईची ती अनिष्ट सूचना होती. आणि एवढे होऊनदेखील आपल्या सरकारने पुन्हा एकदा तेच चुकीचे अनुमान काढले की, "छे: छे:! चीन आक्रमण करणं शक्य नाही. ते आपले आपल्या जवानांना ढकलतात– वेढा देतात–अटक करतात म्हणजे लगेच डोक्यात राख घालून घ्यायची की काय? अरे, तो नुसताच चिन्यांचा खेळ चाललाय. चीनला युद्ध नको आहे.'

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी हे स्वतःच मान्य केलेले होते की, "हिमालयासारख्या कठीण पर्वतराजीच्या प्रदेशात लढताना अनंत अडचणी येतील. आपलं सरहद्दीवरचं प्रत्येक ठिकाण हे सरहद्दीवरच्या दुसऱ्या ठिकाणापासून फारच लांब आहे. हमरस्ता संपल्यानंतर लोंगजू या ठिकाणापर्यंत पोचायला कमीत कमी ३ दिवस लागतात!" पण मग घोला ह्या ठिकाणी पोचायला–नुसतं पोचायला– लढणं नंतर–काय कमी दिवस लागत होते? पण आपल्या ह्या सगळ्या अडचणींकडे आपण दुर्लक्ष केले. दुर्लक्ष केले ते केलेच, पण वर ओढून ताणून चंद्रबळ आणले. लोकसभेत भाषा बोलली गेली ती अशी की, "चिन्यांना हुसकून लावण्याचा हुकूम भारतीय सेनेला दिलेला आहे." बरोबर होतं का हे? सैन्यावर खर्च करायचा नाही, सैन्यात वाढ करायची नाही, नवी आणि अद्ययावत शस्त्रे विकत घ्यायची नाहीत,

परराष्ट्रीय धोरण ठरवताना लष्करी अधिकारी काय म्हणतात ते विचारायचे-देखील नाही. फक्त आयत्या वेळी दिल्लीत बसून हुकूम द्यायचा की, 'चिन्यांना हुसकून द्या!' कोण हुसकणार होते चिन्यांना! आम्ही लष्करी माणसेच ना? मग गेली वीस वर्षे तुम्ही आमची उपेक्षा का केलीत? आमच्या मागण्या—आमच्या स्वत:साठी नव्हे, देशासाठी!—ज्या आम्ही वेळोवेळी तुमच्याकडे मागितल्या त्या का नाकारल्या?

लोंगजूमध्ये जो प्रक्षोभक प्रकार घडला... 'चिनी आले...त्यांनी आपल्या जवानांना ढकललं...चिनी परत गेले...' त्यापासून तरी सरकारने काही शिकावयाचे? जय्यत लष्करी तयारी करायची? पण नाही! कुणाला शिकायची इच्छाच नव्हती तिथे शिकणार काय! ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये हिमालयात पाऊस कोसळत असतो. हवामान खराब असते. विमानाने रसद पुरवणे धोक्याचे असते. कारण एक तर खराब हवेमुळे विमान परत आणावे लागते किंवा 'वरून' टाकलेली रसद भलत्याच ठिकाणी जाऊन पडते. सैनिकांना ती मिळतेच असे नाही. पण हे भारत सरकारला सांगायचे कुणी? आणि आधी सांगावेच का लागते? कारण कुठल्याही प्रबळ राष्ट्राचा पंतप्रधान हा देशाच्या सरसेनापतीबरोबर नेहमीच संरक्षणाच्या दृष्टीने चर्चा करतो. सनिकांच्या अडचणी प्रथम दूर करतो. नुसतीच भाषणे करीत, लहान मुलांच्या गालांवर प्रेमाने चापटया मारीत फिरत नाही.

लोंगजूमध्ये त्या वेळी जे काही घडले तेच १९६२ मध्ये पुन्हा घडले. कारण त्याच वेळी रसद पुरवण्यासाठी आपण काय व्यवस्था केली, किती विमाने या कामासाठी आपण देऊ शकतो, ठरलेल्याच ठिकाणी रसद 'पडावी' यासाठी काही सामग्री आहे का, (Supply dropping equipment) याचा अभ्यासदेखील भारत सरकारच्या कुण्या माणसाने—चुकलो, अधिकाऱ्याने—केलेला नव्हता.

किझमाने आणि लोंगजू इथे घडलेल्या प्रक्षोभक प्रकारांनंतर भारत सरकारने केले काय? आपले सरकार रागावले? सैन्यावर अफाट खर्च केला? सैन्य वाढवले? लडाख—नेफा यांच्या संरक्षणासाठी ते प्रदेश संपूर्णपणे लष्कराच्या स्वाधीन केले? छे: छे:! भलतेच? भारत सरकारने चीनला निषेधखलिता पाठवला आणि चीनला सणसणीत दम दिला की पुन्हा असे काही केलेत तर पुढच्या निषेधखलित्यातली भाषा अधिक तीव्र केली जाईल.

आपल्या प्रदेशात चिनी घुसले याची नक्की खात्री पटल्यानंतर केवळ 'खुर्ची' वाचवण्यासाठी सरहद्दीवर संरक्षणासाठी फौजा पाठवणे याला काही अर्थ होता का? तहान लागल्यावर मग विहीर खाणायला घ्यायची? १९४७ ते १९६२ पर्यंत होतातच ना खुर्चीत? मग त्या वेळी पुढे काय होणार आहे याबद्दल गंभीर इशारा देणारा, फार परिश्रम घेऊन, अभ्यासपूर्वक तयार केलेला आगाऊ सूचना देणारा जनरल कुलवंतसिंग यांचा रिपोर्ट का धूळ खात पडला? उलट, आयत्या वेळी

फौज' (मोजून ४०) पाठवल्यामुळ भारतान चीनला जगभर आरडाओरडा करण्याची संधी दिली की 'पाहा पाहा, भारत युद्धखोर आहे. वादग्रस्त टापूत त्यांनी फौजा घुसवल्या की!' आपल्या जवानावर अशी आफत आली की 'तयारी नाही' हे माहिती असून चीनबरोबर लढायचे. लढाई म्हणजे काय निवडणूक आहे? की कुठलाही रेम्याडोक्या उभा राहू शकतो! आलोच निवडून तर खासदार होईन, पडलोच तर राज्यपाल होईन. ६२ च्या दारुण पराभवानंतर आपली मित्र राष्ट्रे-देखील आश्चर्यचकित झाली. कारण त्या वेळी त्यांना हे कळले होते की, १९६२ च्या युद्धाची तयारी भारत सरकारने १९५९ पासून सुरू केली होती. फक्त २–३ वर्षांची अर्धवट तयारी लढाईसाठी पुरते? अरे, इ. स. २००० मध्ये पेकिंगवर तिरंगा फडकवू, असा विचार असेल तर त्याची तयारी आत्तापासून–सुमारे ३० वर्षे अगोदरपासून–आपल्याला करावी लागेल. लढाया अशा होत असतात. आयत्या वेळी फौज पाठवून नव्हे.

आता लवकरच चीन भारतावर आक्रमण करील, असा स्पष्ट इशारा देणारा गंभीर प्रसंग घडला तो लडाखमध्ये २० ऑक्टोबर १९५९ या दिवशी. त्याचे असे झाले की, सरहद्दीवर गस्त घालणारी आपल्या १९ जवानांची तुकडी त्या दिवशी आपले काम पार पाडीत होती आणि अचानक, दबा धरून बसलेले चिनी पोलीस आले आणि भारतीय हद्दीत ४० मैल आत घुसून त्यांनी आपल्या १९ जवानांपैकी ९ जवान अनपेक्षित गोळीबार करून ठार मारले. आणि १० जवानांना अटक केली, त्यांच्यावर आरोप ठेवण्यासाठी की तुम्ही 'चिनी हद्दी'त बेकायदेशीर रीत्या घुसलात. भारतीय जनतेत प्रक्षोभ उत्पन्न झाला. पण भारतीय सरकारला मात्र विशेष काही वाटले नाही. त्याच वेळी १९५९ मध्येच भारत सरकारने आम्हांला असा हुकूम दिला नव्हता का की 'लडाख आता संपूर्णपणे भारतीय लष्कराच्या ताब्यात दिलेला आहे' हे भारत सरकारने १९६२ मध्ये केले आणि तेदेखील नाइलाज म्हणून.

डिसेंबर १९५९ नंतर मात्र भारत सरकारच्या डोळ्यांवरचे झापड दूर झाले. खुद्द भारताचे संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्णमेनन यांनी जाहीर केले की, "डिसेंबर १९५९ पासून चीनच्या बाबतीत आम्ही आळशासारखे बसून राहिलेलो नाही. भारत-चीन सीमावाद जर का शांततापूर्ण वाटाघाटींच्या मार्गाने मिटणार नसेल तर उत्तर सरहद्दीच्या विस्तीर्ण ओसाड प्रदेशातदेखील चीनबरोबर युद्ध अटळ आहे." त्याचबरोबर चीनने आपल्याला गंभीर इशारा त्याच वेळी दिला की, "आम्ही तुमच्या हद्दीत येतो आणि परत जातो, ही केवळ गंमत नव्हे. आम्ही काय मागतोय ते आम्हांला देऊन टाका. अजून वेळ गेलेली नाही. नाहीपेक्षा शस्त्रबळाच्या जोरावर आम्हांला आमच्या हक्कांचं संरक्षण करणं भाग पडेल.'

गोष्टी या थराला जाण्यापूर्वीच भारतीय सेना अस्वस्थ झालेली होती. चीनच्या

बाबतीत जवान फार पूर्वीपासून सावध होते. कारण लोकसभेतल्या नुसत्या पोकळ आश्वासनांवर विसंबून राहून सत्य वस्तुस्थितीकडे डोळेझाक करायला भारतीय सेना म्हणजे सर्वसामान्य भारतीय 'जनता' नव्हती. भारताचे सरसेनापती जनरल थिमय्या यांनी डिसेंबर १९५९ पूर्वीच कितीतरी अगोदर भारत सरकारला वेळोवेळी इशारा दिला, 'लोकसभेत बसून नुसतीच तोंडाची वाफ दवडू नका. चीनबरोबर खरोखरच तुम्हांला लढायचं असेल तर भारतीय सेनेत तावडतोब वाढ करण्याची मला परवानगी द्या आणि मी सांगतोय ती आणि सांगेन तेवढी अद्ययावत शस्त्रास्त्रं तावडतोब आमच्या हातांत द्या. तसं केलंत तर 'चिन्यांना हुसकून द्या' हे सांगायचीच तुम्ही खोटी. मग पाहाच आपल्या 'जवानां'चा अभूतपूर्व पराक्रम.'

जनरल थिमय्यांसारख्या थोर सेनापतीच्या या इशाऱ्यांकडे संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्णमेनन यांनी केवळ दुर्लक्षच केले असे नाही, तर त्यांचा अपमान केला. आपल्याच संरक्षणमंत्र्यांनी आपल्याच सरसेनापतीला किताब दिला की, 'तू पश्चिमी साम्राज्यवादी राष्ट्रांचा हस्तक आहेस. भारतीय सेनेत तुम्ही उगाच घबराट निर्माण करण्याचा प्रयत्न करता आहात, जनरल थिमय्या! काय करायचं आणि केव्हा करायचं ते सरकारनं ठरवायचं असतं आणि चीनच्या बाबतीत सरकार जो हुकूम देईल तो पाळणं आणि अंमलात आणणं एवढंच तुझं काम आहे.'

...पण इथे मात्र कृष्णमेनन यांचा अंदाज चुकला. त्यांना वाटले होते, आपण असे काही बोललो की जनरल थिमय्या गप्प बसेल. पण झाले भलतेच. जनरल थिमय्या यांनी व्ही. के. कृष्णमेनन यांना तिथल्या तिथे ठणकावून सांगितले की, 'तुम्ही स्वतःच कम्युनिस्ट आहात आणि चीनचेच हस्तक आहात. मला 'जनरल' हा किताब तुमच्या मेहरबानीने मिळालेला नाही आणि दुसऱ्या कुठल्याही किताबाची निदान तुमच्यासारख्यांकडून तरी मला अपेक्षा नाही.'


प्रसिद्ध झाले ! मूल्य रु. १५/–

## वीर सावरकर आणि गांधीजी

(संकलक : बाळाराव सावरकर)

या पुस्तकांत दोघांचे तुलनात्मक जीवन नी विचार !

एकमेकांसंबंधी लेख, भेटी, वीर सावरकरांचे गांधीवधअभियोगातील निवेदन !

शाळा, महाविद्यालये, वाचनालये, यांनी १५% वटाव कापून पैसे पाठवावेत.

**वीर सावरकर प्रकाशन**

सावरकर सदन, मुंबई २८

झाले. संरक्षणमंत्री कृष्णमेनन आणि सेनापती थिमय्या यांची चांगलीच जुंपली

भारतीय जनतेचे लक्ष चिनी धोक्यापासून उडवून देण्यासाठी व्ही. के. कृष्णमेनन एकसारखे हे सांगत सुटले, की पाकिस्तान हा आपला शत्रू नंबर एक आहे. पण इथेही जनरल थिमय्या हे कृष्णमेनन यांची डाळ शिजू देत नव्हते. ते ठामपणे सांगू लागले, ' संरक्षणमंत्री मेनन ! ' जनरल ' या नात्याने तुम्हांला सांगतो, शत्रूंचे कधी नंबर लावायचे नसतात. प्रत्येक शत्रू हा नेहमी नंबर एकचाच असतो. जसा पाकिस्तान शत्रू नंबर एक तसाच चीनदेखील शत्रू नंबर एकच. '

मेनन आणि थिमय्या यांच्यांतली तणातणी अशी दिवसेंदिवस वाढत गेली. तशातच हे उघड उघड बोलले जाऊ लागले की, भारतीय सेनेतल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना बढत्या देण्यापासून तो लष्करी शिस्तीतल्या लहानसहान कार्यपद्धतीच्या बाबतीतदेखील संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्णमेनन हे ढवळाढवळ करतात.

सेनापती जनरल थिमय्या ह्यांना मेनन यांची ढवळाढवळ सहन होणे शक्यच नव्हते. जनरल थिमय्या यांना असह्य मनःस्ताप होऊ लागला आणि मग मात्र थिमय्या यांनी एक पाऊल असे टाकले की, त्यामुळे सबंध भारतात खळबळ उत्पन्न झाली. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची अक्षरशः धांदल उडाली. कारण भारतीय जनता असली आहे की तिचे पंतप्रधानांवर जितके अलोट प्रेम, तितकेच ' जनरल 'वरदेखील प्रेम. आणि हे माहिती असल्यामुळे काय केले जनरल थिमय्यांनी ?

जनरल थिमय्यांनी भारतीय सेनेच्या सेनापतिपदाचा राजीनामा दिला ! ...

[ क्रमशः ]

**By arrangement with THACKER & CO. LTD.**
**from their forthcoming publication,**
**" HIMALAYAN BLUNDER " by Brig. J. P. Dalvi.**
**© with the original publisher.**

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ग्रहांना झालेली ग्रहदशा

सिलोनचे राज ज्योतिषी काही अमेरिकन मंडळींच्या मदतीने एक कंपनी काढणार असून या कंपनीचे उद्दिष्ट "कॉम्प्यूटर यंत्राच्या साहाय्याने ज्योतिषाचा लाभ सर्व जगाला प्राप्त करून देणे" हे आहे. म्हणजे जपानी परराष्ट्रीय धोरण ठरविण्यापासून इंग्रजी नवकविता करण्यापर्यंत सर्व अवघड कामे करणाऱ्या या यंत्राने अखेर वक्रीच्या शनीवरही आपली वक्रदृष्टी फिरवलेली दिसते. बाकी लहरीप्रमाणे भटकणाऱ्या राहू-केतूवर बटण दाबल्याबरोबर भविष्य वर्तविण्याची पाळी येणे म्हणजे ही ग्रहांना झालेली ग्रहदशाच म्हटली पाहिजे. शिवाय कुडबुड्या जोशी आणि ग्रह यांचे संगनमत असते तसे कॉम्प्यूटरशी करायला राहू-केतूदेखील धजतील असे मला वाटत नाही. कारण वाईट भविष्य चांगले करण्यासाठी कॉम्प्यूटर म्हणायचा, "ग्रहशांतीची जरुरी नाही. जरा मलाच थोडा अधिक वीज-पुरवठा करा म्हणजे झाले."

मात्र मानवी ज्योतिषी विचारलेल्या प्रश्नांची जशी धोरणी उत्तरे देतो तशी हे स्पष्टवक्ते यंत्र देईल असे वाटत नाही. उदाहरणार्थ, नर्तिकेचा प्रश्न : माझ्या कार्यक्रमाला लोक गर्दी केव्हा करतील ? कॉम्प्यूटरचे उत्तर : तुमच्या घराचे वाकडे अंगण सरळ होईल तेव्हा. लेखक : स्वतंत्र प्रतिभेचा कथालेखक म्हणून माझे नाव केव्हा होईल ? उत्तर : वाङमय चौर्यात तुम्ही अधिक कौशल्य संपादन कराल तेव्हा. लॉटरीचे तिकिट विकत घेतलेला माणूस : मला अनपेक्षित धनलाभ होईल की नाही ? उत्तर : निश्चित होईल. तुमच्या बायकोने काल नकळत तुमच्या पाकिटातून काढलेली पाचाची नोट तिच्या हातून हरवली आहे, ती तिला न सापडता तुम्हांलाच सापडेल. सिनेमा-नटी : मला वर्तमानपत्रांत भरपूर प्रसिद्धी केव्हा मिळेल ? उत्तर : तुमच्या न्हाणीघरात लपवलेले वीस लाख रुपये इन्कमटॅक्सवाल्यांना सापडतील तेव्हा. कवी : मला नवकवी म्हणून केव्हा मान्यता मिळेल ? कॉम्प्यूटरचे उत्तर : तुम्ही माझ्याइतकी संपूर्णपणे निरर्थक कविता करू शकाल तेव्हा.

○

 [ पृष्ठ २३ वरून ]

डब्यांची संख्या, इतकंच नव्हे तर उतारू सैनिक आहेत का नागरिक, याचाही नेमका अंदाज करता येत असे मला, हे सारं मी टिपून ठवायचो आणि भूमिगत चळवळीशी संबंध असलेल्या एका कार्यकर्त्याच्या हाती ते सुपूर्द करायचो."

"पण या कार्यकर्त्याला गाठायचा कसा तू ?"

"त्यात काय ? आमच्याच कारखान्यात कामाला होता ना तो ! म्हणजे काय व्हायचं की त्याचं यंत्र आपलं मधूनमधून नादुरुस्त व्हायचं. मग फोरमन म्हणून मला त्याला मदत करावी लागे. कारण जर्मनीच्या युद्ध प्रयत्नांत अडथळा येऊन कसं चालणार होतं, नाही का साहेब ?" असे म्हणून तो हसला आणि पुढे म्हणाला, "या पद्धतीनं माझी माहिती त्यांच्यापर्यंत पोचायची साहेब."

"एकूण फारच उपयुक्त कामगिरी पार पडत होती तुझ्याकडून !" मी त्याला उत्तेजन देत म्हटले.

तो संकोचून म्हणाला, "हां. आता आपण म्हणत असाल तर फार खोटं नाही आहे ते. पण साहेब, खरं सांगायचं तर त्याकरिता मला काही फार कष्ट पडत नव्हते. जीव धोक्यात घालायचा तर मुळीच प्रश्नच नव्हता. अहो, गाड्यांचं निरीक्षण करण्याचा छंद असलेल्या एखाद्या लहान पोरानंदेखील हे काम इतकंच किंवा याहून चांगलं केलं असतं."

आतापर्यंत व्हान-दर-आचे निवेदन विश्वसनीय वाटत होते. अभिमान आणि विनय यांचा मोठा मनोहर समन्वय त्याच्या निवेदनात होता. त्याचा विनयीपणा थोडासा जादा आणि कृत्रिम वाटत होता हे खरे; पण बाखवीस-फ्लिटच्या भडक वल्गनांपेक्षा तो मला कितीतरी अधिक पसंत पडला. मी त्याला नंतर तपशील-विषयक अनेक प्रश्न विचारले : एका तासात खानावळीजवळून दोन्ही दिशांना एकूण किती गाड्या जातात ? प्रत्येक गाडीला सरासरी किती डबे असतात ? एकूण गाड्यांमध्ये मालगाड्यांचे प्रमाण किती असते ? यापूर्वीच मी हॉलंडमधील रेल्वे मार्गाने होणाऱ्या जर्मन सैन्यवाहतुकीबद्दल सारी माहिती गोळा केली होती. आगगाड्यांचे मार्ग उद्ध्वस्त करणाऱ्या शाही विमानदलाच्या खास तुकडीच्या कामगिरीच्या कल्पना करून देण्यासाठी विमानदलाने ही माहिती देणारा एक अतिगुप्त खलिता प्रसृत केला होता. त्यातील माहिती आणि व्हान-दर-आची उत्तरे यांचा अचूक मेळ बसत होता.

या वेळपर्यंत माझे त्याच्याबद्दलचे मन दुहेरी होते. एक तर तो खरोखरच प्रामाणिक उच्च भूमिगत कार्यकर्ता असला पाहिजे आणि त्याच्याजवळ असलेल्या कोऱ्या करकरीत नोटा हा केवळ एक विलक्षण योगायोग असावा; किंवा दुसरे म्हणजे तो एक अत्यंत हुशार आणि प्रशिक्षित जर्मन हेर असून त्याने कोऱ्या करकरीत नोटा



त्यातल्या काहींची नावे सांगू शकशील का तू ?

बाळगण्याची फक्त एक चूक केलेली असावी. आता या प्रकरणाकडे मी पाहतो, त्या वेळी मला वाटते की, त्या कोऱ्या करकरीत नोटांच्या बंडलाशिवाय जर व्हान-दर-आ माझ्यासमोर आला असता तर बहुधा अस्सल भूमिगत कार्यकर्ता असाच शिक्का मी त्याच्यावर मारला असता. आधीच माझ्याकडे पुरेसा नोकरवर्ग नव्हता. यामुळे फारच संशय आल्याखेरीज संपूर्ण उलट तपासणीचा वेळखाऊ कार्यक्रम योजणे मला शक्य नव्हते. या प्रकरणात, सुदैवाने त्या नोटांच्या बंडलामुळे मला चांगलाच संशय येत होता.

## " मी चोरी केली साहेब ! "

आता मी प्रश्नांचा सारा रोखच बदलून टाकला. मी विचारले, " हे पाहा, स्थूल मानानं किती काळ भूमिगत चळवळीला मदत करत होतास तू ?"

" तीन वर्षांपेक्षा थोडा अधिक काळ साहेब. "

" तीन वर्ष म्हणजे पुष्कळच झाली. एवढ्या काळात भूमिगत चळवळीतल्या कितीतरी कार्यकर्त्यांशी संबंध आला असेल नाही तुझा ? किंवा निदान नावं तरी ऐकली असशील तू त्यांची ?"

" होय तर. दहा–बारा कार्यकर्त्यांशी तरी संबंध आला असेल माझा–"

" त्यांतल्या काहींची नावं सांगू शकशील का तू ? पाहा प्रयत्न करून. "

व्हान-दर-आ आढेवेढे घेऊ लागला.

" का ? काय झालं ? " मी विचारले.

" तसं काही नाही साहेब. पण ती नावं सांगणं इतकं सोपं नाही साहेब. गुप्ततेसाठी त्यांतल्या अनेकांनी वेगळीच नावं धारण केली होती ना. उदाहरणार्थ, एकजण आपल्याला ' विल्यम टेल ' म्हणवत असे आणि दुसऱ्या एका अगडबंब माणसाचं

नाव ' किंगकाँग ' असं होतं. दुसऱ्या काही जणांनी सांकेतिक नावं धारण केली होती, वा नावांची उसनवारी केली होती. त्यामुळं सगळी नावं नीट सांगता येतील, असा विश्वास नाही वाटत मला. "

" चालेल. त्यानं काही फारसं बिघडणार नाही. तुला आठवतील तशी आणि तितकी नावं सांगितलीस तरी चालेल. "

" ठीक आहे साहेब. अगदी पहिल्याप्रथम बॅरन डेन टेक्स या नावाची आठवण होते मला. हे नाव खरं आहे की नाही ते ठाऊक नाही मला; पण तो माणूस मात्र मोठा हिंमतबहाद्दर होता.... " त्यानंतर व्हेरबीक, फ्लेक्स, सँडर्स, स्क्यूट आणि रोलॉफ्स आणि व्हॅन डाईक ही आणि अशी आणखी सहा-सात नावे व्हान-दर-आने सांगितली.

त्यांतील काही नावे मी चांगलीच ओळखत होतो. विशेषतः त्याने सांगितलेले बॅरन डेन टेक्स हे नाव माझ्या चांगल्याच परिचयाचे होते. तो खरोखरच एक झुंझार भूमिगत कार्यकर्ता होता. व्हान-दर-आने खरोखरच भूमिगत चळवळीत काही काम केले असावे काय ? की त्याच्या जर्मन हेरशिक्षकाने त्याला उत्कृष्ट संथा दिलेली असावी ?

मी पुन्हा प्रश्नांचा रोख बदलून त्याला सर्वांत महत्त्वाचा प्रश्न विचारला, " तुझ्याजवळ या एवढ्या कोऱ्या करकरीत नोटा कशा काय आल्या याचं का कुणास ठाऊक उगाच कुतूहल वाटून राहिलं आहे मला. "

त्यावर तो हसला आणि म्हणाला, " साहजिकच आहे. पण त्यात संशय येण्यासारखं काही नाही साहेब. पळून येण्यापूर्वी त्या नोटांची चक्क मी चोरी केली होती, साहेब. ज्या माणसाला लुबाडलं मी तो पक्का डांबीस माणूस होता. अहो, बोलून-चालून खाटिकच तो आमच्या गावातला. आणि जर्मनांना भरपूर मदत केली होती बघा त्या बोक्यानं. जर्मन लोक आल्यापासून हा आपला अखंड त्यांचीच लाळ घोटायचा. त्यामुळं आम्हांला ज्या वेळी उपास पडत होते त्या वेळी याच्या दुकानात मालाची लयलूट होती. त्या मालाची किंमत देणं दुसऱ्या एखाद्या जर्मनांची लाळ घोटणाऱ्या माणसालाच शक्य होतं. म्हणून मी विचार केला, आपण काही रिकाम्या हातानं जायचं नाही. त्यानं पैसे वाममार्गानं मिळविले होते, आणि त्यामुळं पैसे चोरीला गेल्याचं फारसं दुःख त्याला होण्याचं कारण नव्हतं.. "

व्हान-दर-आने उत्तर मोठ्या चतुराईने दिले होते. माणसाचा स्वभाव असा असतो की, एखाद्याने स्वतःच्याच तोंडून सांगितलेल्या आपल्या एखाद्या दोषावर, वैगुण्यावर आपण जेवढा विश्वास ठेवतो तेवढा गुणनिर्देशावर ठेवत नाही. माझेही तसेच होणार होते. जर बाखविस-फ्लिट आणि त्याच्यापाशी असलेल्या एकापाठोपाठच्या क्रमांकांच्या नोटा तेथे नसत्या तर व्हान-दर-आचे स्पष्टीकरण मान्य करण्यास मी एक क्षणाचाही विलंब लावला नसता.

" त्या खाटकाचे पैसे चोरताना कोणाची मदत घेतली होतीस का तू ? "

" छे छे, अगदी एकट्याच्या हिंमतीवर केली मी ती चोरी. "

येथे पहिल्यांदाच व्हान-दर-आच्याकडून लहानशी चूक झाली. माझ्या अंदाजाप्रमाणे खरोखरच बाखवीस-फ्लिटच्या मदतीने त्याने काही कारवाई केली होती तर सहज आपल्या मित्राचा उल्लेख करून, खाटकाची चोरी करताना त्याने आपल्याला मदत केली आणि त्यामुळे मिळालेल्या नोटा दोघांनी वाटून घेतल्या, असे सांगण्याची सुसंधी व्हान-दर-आला प्राप्त झाली होती. पण त्याने ती गमावली होती. मी माझा चेहरा निर्विकार ठेवला आणि पुन्हा प्रश्नाचा रोख मागील मुद्यांकडे वळवला. मी म्हटले, " भूमिगत चळवळीतल्या त्या कार्यकर्त्यांची नामावळी तू पुन्हा एकदा सांगितलीस तर मला ती ध्यानात ठेवायला बरं पडेल. "

" जरूर. अगदी जरूर सांगतो पाहा हं. प्रथम बॅरन डेन टेक्स, मग–मग व्हेरबीक, स्क्यूट, रेलॉफ्स, सँडर्स आणि डाईक... साहेब, माझा नावांचा क्रम चुकला की काय नकळे. "

" ठीक आहे " मी म्हटले. माझ्या दृष्टीने खरोखरच सारे ' ठीक ' झाले होते. पण व्हान–दर–आ मात्र सापळ्यात अडकला होता. सुरुवातीला त्याने सांगितलेली नामावळी यथाक्रम माझ्या पक्की लक्षात होती. यामुळे या वेळी त्याने काळजीपूर्वक एक नाव गाळले ते माझ्या लगेच लक्षात आले होते. फ्लेक्स हे ते नाव. कदाचित हा योगायोग ठरण्याचाही संभव होता; पण तरीही मी मनातल्या मनात या गोष्टीची व्यवस्थित नोंद करून ठेवली.

" आता मला एमनेसच्या आजूबाजूला असलेल्या जर्मन तुकड्यांच्या, तू तेथून निघण्याच्या अगोदरच्या काही आठवड्यात झालेल्या, हालचालींची माहिती देशील काय ? "

त्याने ती माहिती अस्खलितपणे पुरवली. आपले बोलणे स्वाभाविक वाटावे एवढ्यासाठी जरूर तेवढाच थांबत, अडखळत होता तो.

तो ती माहिती सांगत असताना मी मानेने होकार भरत होतो. माझ्यापाशी आधीच असलेल्या माहितीशी व्हान–दर–आने सांगितलेली माहिती तंतोतंत जुळत होती. मग मी म्हटले, " सकाळी तुझ्याबरोबर इथं आलेले इतर कार्यकर्ते पाहिले असशील तू. त्यातले काहीतर तुझ्या प्रांतातले असणार. आता मला सांग त्यातल्या एखाद्याशी तुझी ओळख आहे काय ? "

" नाही साहेब. " तो तत्परतेने म्हणाला, " तसं एक–दोन माणसांना कधीतरी, कुठंतरी पाहिल्याचं अंधुकपणं आठवतं आहे मला. परंतु खऱ्या अर्थानं त्यांच्यापैकी एकाशीही माझा स्नेह तर राहू द्याच, पण साधा परिचयदेखील नाही. आणि या भूमिगत चळवळीच्या बाबतीत तर तुम्हांला माहिती जितकी कमी तितकं बरंच असतं. कारण, जर्मनांनी पकडल्यावर समजा, एखाद्यानं द्रोह केलाच तर फारच

थोडी माहिती जर्मनांच्या हाती लागते. माझ्या गटात काम करणाऱ्या एमनेसच्या एकदोन मित्रांपलीकडे मला फारशी कोणाचीच माहिती नाही. आणि मीदेखील ती करून घेण्याचा जादा प्रयत्न कधी केला नाही."

मी पुन्हा मान डोलावली. व्हान-दर-आचे हे उत्तरदेखील समर्पक होते. प्रत्येकाने स्वतःचे तेवढेच काम करणे ही गोष्ट भूमिगत चळवळीत काम करणाऱ्यांच्या अंगवळणी पडते, हे खरेच होते.

"आभारी आहे मी तुझा." मी व्हान-दर-आला म्हटले. मग मी त्याला एक सिगरेट दिली, आणि आम्ही सिगरेट पेटवत असता काहीसे ओशाळून म्हटले, "माफ कर. माझी स्मरणशक्ती आताशा मला नेहमी दगा देते. पूर्वी अगदी लहानसहान गोष्टीसुद्धा कशा अचूक लक्षात राहायच्या माझ्या. पण आता म्हणजे......"

मी वाक्य मुद्दामच अर्धवट सोडले. आणि कपाळावरून हात फिरवत पुढे म्हणालो, "हा बहुधा या उलटतपासणीच्या त्रासदायक कामाचा परिणाम असावा. मला वाटतं, मी काही काळ विश्रांती घेणंच इष्ट ठरेल. या माझ्या स्मरणशक्तीची अगदीच चाळण झाली आहे, बघ. तू दोन-तीन वेळा तरी भूमिगत चळवळीतल्या त्या कार्यकर्त्यांची नामावळी सांगितली असशील. पण माझ्या या स्मरणशक्तीच्या चाळणीतून बहुतेक नावं वाहून गेलेली दिसतात. पुन्हा एकदा ती नावं सांगायला हरकत नाही ना तुझी ?"

"हरकत कसली साहेब ?" तो सहानुभूतीने म्हणाला, "मला कल्पना आहे आपल्याला होणाऱ्या त्रासाची. मला वाटतं, तुम्हांला चांगल्या दीर्घकाळच्या विश्रांतीची गरज आहे."

"खरं आहे तुझं म्हणणं. पण हे युद्ध काही कायम थोडंच राहणार आहे ? ते संपलं म्हणजे आहेच विश्रांती !"

"ठीक आहे साहेब" असे म्हणून त्याने ती नामावळी पुन्हा सांगितली. माझ्या स्मरणशक्तीने मला केव्हाही दगा दिला नव्हता आणि आतादेखील ती देत नव्हती हे सांगण्याची विशेष आवश्यकता नाही. त्याने नावे सांगताना पुन्हा फ्लेक्सचे नाव काळजीपूर्वक गाळले होते. खात्री करून घ्यावी म्हणून मी विचारले, "ही एवढीच का नावं ?"

त्याने एक क्षणभर विचार केला. मनात पुन्हा एकदा नावांची उजळणी केली आणि म्हटले, "होय साहेब. एवढीच नावं आठवतात मला."

"मी फार आभारी आहे तुझा" मी म्हटले, "मला वाटतं, तूर्त काम संपलं आहे आपलं. प्रतीक्षालयात थोडं थांबायला तुझी हरकत नाही ना ? माझा नोकर तुझ्या खाण्यापिण्याची सगळी व्यवस्था करील. हे काही आलीशान हॉटेल नाही. पण राष्ट्रासाठी आपला जीव धोक्यात घालणाऱ्या राष्ट्रभक्तांची शक्य तितकी उत्कृष्ट व्यवस्था ठेवणं कर्तव्यच आहे आमचं."

" पण मला फार वेळ थांबावं लागेल का साहेब ? मी आपल्याशी फटकून वागतो असा समज कृपा करून आपण करून घेऊ नका. परंतु कधी एकदा यातून सुटतो आणि ' प्रिन्सेस आयरिन ब्रिगेड 'मध्ये प्रवेश करतो असं झालं आहे मला. "

" मोठा कौतुकास्पद उत्साह आहे तुझा. जरुरीपेक्षा एक क्षण अधिक थांबवणार नाही मी तुला. पण या सगळ्या औपचारिक गोष्टी पार पाडाव्या लागतीलच मला. आणि तुला आतापर्यंत माहीत नसेल तर लौकरच सैन्यात या गोष्टी कशा दिरंगाईनं होतात याची कल्पना येईल तुला. "...मी हसलो आणि उभ्या राहिलेल्या व्हान-दर-आशी हस्तांदोलन केले.

## योजना ठरली

माझ्या शरीरसंरक्षकाने त्याला खोलीतून नेल्यानंतर पाच मिनिटे सिगारेट ओढत मी एकटाच विचार करीत बसलो होतो. एक कल्पना माझ्या डोक्यात आकार घेऊ लागली होती. व्हान-दर-आ आणि बाखवीस-फ्लिट ही एकमेकांना साहाय्य करणारी जर्मन हेरांची दुक्कल आहे, अशी माझी खात्री झाली होती. पण नुसती माझी खात्री होऊन भागण्यासारखे नव्हते. काहीतरी बिनतोड पुरावा मिळणे आवश्यक होते. ते आपण होऊन गुन्हा कबूल करतील, असे काहीतरी करणे जरुरीचे होते. माझी योजना मनात बारीकसारीक तपशिलासह सिद्ध झाल्यानंतर मी माझ्या सहकाऱ्याला बोलावून घेतले. माझा संशय मी त्याला बोलून दाखवला आणि त्याच्यावर एक छोटीशी कामगिरी सोपवली. तो खोलीतून निघून गेल्यानंतर मी व्हान-दर-आला पुन्हा माझ्या खोलीत बोलावून घेतले.

तो आला आणि खुर्चीत बसला. त्याचे वागणे आता थोडे बदलले होते. इतक्या लवकर पुन्हा बोलावल्यामुळे त्याचा गोंधळ उडाला होता. त्याने सावध होऊ नये एवढ्यासाठी मी म्हटले, " तुझ्यासाठी एक लहानसं काम काढलं आहे मी. तू खरोखरीचा अस्सल भूमिगत कार्यकर्ता आहेस याची खात्री पटली आहे मला. पण तुझ्याबरोबर आज इथं आलेल्या माणसांपैकी एकाबद्दल मात्र तो जर्मन हस्तक असल्याचा जबरदस्त संशय येतो आहे मला. त्याचा रहस्यभेद करण्याकरता तुझी मदत हवी आहे मला. "

" जरूर. आपण मागाल ती मदत अगदी आनंदानं द्यायला तयार आहे मी साहेब. मी मघाशीच सांगितलं तुम्हांला, माझ्याबरोबर आलेल्या माणसांपैकी एकालाही मी ओळखत नाही म्हणून. तरी पण तुम्ही मला अमूक अमूक कर असं सांगा आणि मी ते केलं असं समजा. "

" छान ! " मी उद्गारलो. " मला वाटलंच होतं तू मला तत्परतेनं मदत करशील म्हणून. एखाद्या सहप्रवाशाला गुन्हेगार ठरवायचं हे फार वाईट कृत्य आहे हे उघडच आहे. पण तू आताच सांगितल्याप्रमाणं सुदैवानं त्यांच्यापैकी कोणीही मित्र नाही आहे तुझा. आणि समजा, मित्र असता तरी माणसाला आपलं कर्तव्य करावंच

लागतं ना ? कारण, जर्मनांचा हस्तक असणं यासारखी दुसरी वाईट गोष्ट नसेल.'

"साहेब, तुम्ही म्हणता ते अगदी खरं आहे." त्याने माझ्या म्हणण्याला अनुमोदन दिले, आणि पुढे विचारले, "काय काम काढलं आहे तुम्ही माझ्यासाठी ?"

"काम अगदी साधं आहे. पहिली गोष्ट म्हणजे या भिंतीत असलेल्या भोकातून पलीकडे पाहशील का तू ? पलीकडे एक माणूस बसलेला दिसेल जमिनीवर. तू त्याला पाहिलंस तरी तो तुला नाही पाहू शकणार. तो माणूस तुझ्या ओळखीचा आहे काय, एवढंच सांगायचं तू मला."

व्हान-दर-आने भोकातून पलीकडे नजर टाकली. नंतर भिंतीपासून दूर होत होत मानेने नकार दर्शवीत तो म्हणाला, "छे बुवा, अगदीच अनोळखी माणूस आहे हा. सकाळी आम्ही आलो तेव्हा एखाद्या वेळी पाहिला असेल मी त्याला. त्याचा चेहरा पुसट ओळखीचा वाटला मला. पण तेवढंच."

"उत्तम" मी म्हटले, "आता आपण त्या शेजारच्या खोलीत जाणार आहोत. त्या माणसाशी ओळख करून देतो मी तुझी. नंतर मी त्याला काही प्रश्न विचारणार आहे. त्यानं दिलेली उत्तरं तू काळजीपूर्वक ऐकून ठेवायची आणि त्याच्याबद्दल तुला काय वाटतं ते सांगायचं तू मला. बस. काम काय आहे ते एवढंच आहे."

व्हान-दर-आ आपली बिकट भूमिका मोठ्या कौशल्याने पार पाडत होता. बाखवीस–फ्लिटचा संशय आला असून त्याला एकट्याला कोठडीत स्थानबद्ध करून ठेवले आहे हे पाहून त्याला मोठाच धक्का बसला असणार; पण आपल्या चेहऱ्यावर त्याने यत्किंचित चलबिचल दाखवली नाही. उलट, बाखवीस–फ्लिटची परीक्षा घेण्याची कल्पना व्हान-दर-आला फारच पसंत पडली असावी. "तुम्ही पूर्ण विसंबून राहा माझ्यावर साहेब," तो म्हणाला.

मी त्याला शेजारच्या खोलीपाशी नेले. पहारेकऱ्याने आम्हांला आत सोडले. बाखवीस–फ्लिट ताडकन उभा राहिला. त्या दोघांच्या प्रतिक्रिया न्याहाळत मी म्हटले, "तुम्ही दोघेही एकाच जिल्ह्यात राहता. तेव्हा म्हटलं ओळख करून द्यावी तुमची. मि. बाखवीस–फ्लिट, या मि. व्हान-दर-आना आपण भेटावं, अशी माझी इच्छा आहे."

त्या दोघांनी हस्तांदोलन केले. आणि त्यांच्या अभिनयकौशल्याचे मलादेखील कौतुक वाटले. त्या दोघांपैकी कच्चा असलेला बाखवीस–फ्लिट व्हान–दर–आला ओळखून सारा खेळ संपुष्टात आणील असे मनातून वाटत होते मला. परंतु खरोखरच एखाद्या अपरिचित गृहस्थाला भेटावे तसाच तो व्हान–दर–आला भेटत होता. त्याच्याबद्दल आवश्यक तेवढेच सभ्य, मर्यादित कुतूहल जणू त्याला वाटत होते. मी त्या दोघांनाही बसायला सांगितले, आणि नंतर बाखवीस–फ्लिटला त्याचे वय, धर्म, शिक्षण, राजकीय मते यांच्याबद्दल नेहमीचे प्रश्न विचारले. व्हान–दर–आ नुसता शेजारी बसून होता. टेनिसचा सामना पाहणाऱ्या एखाद्या प्रेक्षकाप्रमाणे

त्याचे डोळे माझ्यावर, माझ्या चेहऱ्यावर तर दुसऱ्यांदा बाखवीस–फ्लिटच्या चेहऱ्यावर असे फिरत होते.

काही मिनिटांनी मी प्रश्न विचारणे बंद केले. खिशात हात घालून मी सिगारेटचे पाकीट काढले आणि त्या दोघांना सिगारेट देऊ करत नेहमीपेक्षा किंचित मोठ्या आवाजात विचारले, " काय ओढणार काय सिगारेट तुम्ही ?"

पूर्वी ठरल्याप्रमाणे ही माझ्या सहकाऱ्याला सूचना होती. दरवाजाबाहेर उभा राहून तो आमचे बोलणे काळजीपूर्वक ऐकत होता. आता त्याने दरवाजा उघडला आणि आत येत मोठ्या आवाजात पुकारले, " मि. फ्लेक्स !"

बाखवीस–फ्लिट ताडकन उभा राहिला आणि म्हणाला, " हजर साहेब."

नाटक संपले होते. मी मोठ्याने हसलो आणि व्हान–दर–आकडे वळलो. त्याने स्वतःवर ताबा ठेवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो भेदरला आहे हे मला त्याच्या स्नायूंवर पडलेल्या ताणावरून समजले. " पाहा " मी म्हटले, " हे हरवलेले मि. फ्लेक्स कसे अचूक सापडले ते ! पहिल्या वेळी भूमिगत चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची नामावळी तू दिलीस तेव्हा तिच्यात या फ्लेक्ससाहेबांचा उल्लेख होता. आणि नंतर मात्र तू त्यांचा उल्लेख करायचं सोयीस्करपणं टाळलं होतंस !"

"तुझ्या मूर्खपणामुळं झालं हे सगळं." व्हान–दर–आ आपल्या मित्राला म्हणाला. आपण सापळ्यात अडकलो आहोत हे अर्थातच त्याला कळून चुकले होते.

मी म्हणालो " छे छे, मूर्खपणा त्याचा नाही झाला. मूर्खपणा झाला तो तुझा. प्रतिपक्षाला कमी लेखण्याचा. असा मूर्खपणा कधी करू नये बाबा. एकदा मि. फ्लेक्सचं नाव सांगितल्यावर त्याला तू चिकटून राहायला हवं होतंस. पुन्हा नामावळी सांगताना तू ते नाव गाळल्यामुळं मला संशय आला. आणि हे सोडा. पण निदान आपल्या जवळच्या नोटा तरी तुम्ही ताडून बघायला हव्या होत्या. जर्मन मालकांनी दिलेल्या नोटा ज्या वेळी तुम्ही वाटून घेतल्यात त्या वेळी त्या कोऱ्या करकरीत नाहीत अशी तरी काळजी घ्यायची होतीत तुम्ही. तुमच्या दोघांच्या पाकिटातल्या नोटा कोऱ्या करकरीत तर आहेतच; पण शिवाय त्यांच्यावर एकापाठोपाठचे क्रमांकही आहेत... पण आता जास्त बोला कशाला? तुमच्यापैकी सुरुवातीला कोण कबुलीजबाब देतो तेवढं सांगा मला."

युद्ध पुढेही चालू राहिले आणि मी आईंडहॉवेन सोडून वेगळ्या ठिकाणी गेलो. व्हान–दर–आ आणि बाखवीस–फ्लिट ऊर्फ मि. फ्लेक्स यांना खटल्यासाठी मुख्य तळावर पाठण्यात आले. त्या खटल्याचा निकाल काय लागला ते मला कधीच समजले नाही. त्यांना योग्य ती शिक्षा मिळाली असेल असा माझा विश्वास आहे. स्वतःला आणि देशाला पन्नास पौंडांइतक्या क्षुल्लक रकमेसाठी विकणारी माणसे जगायला एकूण नालायकच ठरतात. मग त्या पन्नास पौंडांच्या नोटा कोऱ्या करकरीत असल्या आणि त्यांच्यावर एकापाठोपाठचे क्रमांक असले म्हणून काय झाले ! ○

**समाप्त**

# चित्रपट

## शतरंज

गेल्या दोन-अडीच वर्षांत जेम्स बॉण्ड धर्तीचे, देशभक्तांच्या अचाट आणि अतर्क्य साहसांनी भरलेले जे काही चित्रपट पडद्यावर आले, त्यांत ' शतरंज 'चा उल्लेख करावा लागेल. असे देशभक्तिपर चित्रपट पडद्यावर आले पाहिजेत यात शंका नसली, उलट ती आजची एक प्रमुख गरज असली, तरी जे काही चित्रीकरण करायचे ते मनाला पटेल असे तरी असावे ? नेमके तेच घडत नाही ही गोष्ट दुःखाची आहे. तसे पाहिले तर या विषयावर वास्तवतेला धरून आकर्षक, नव्या नव्या कल्पनांनी नटलेले चित्र काढणे अशक्य आहे, असे मुळीच नाही. पण नेमकी तेवढीच उणीव आहे.

' शतरंज 'ची कथा पाहा. यातला नायक एक धाडसी भारतीय तरुण. तो करतो काय तर शत्रुपक्षाने बळजबरीने पकडून ठेवलेल्या एका भारतीय नर्तिकेला आणि तिच्या आईला शत्रूच्या कडक पहाऱ्यातून सुरक्षितपणे पळवून पुन्हा मायभूमीला परत आणतो. गंमत अशी की, हा भारतीय तरुण आपल्या फक्त एका साथीदारासमवेत ही कामगिरी पार पाडतो. शत्रुपक्षातील सहस्रावधी शस्त्रधारी सैनिकांविरुद्ध हा एकटा लढणार, तरीही स्वतःच्या रक्ताचा एक थेंब न सांडता तो शत्रुसैन्याला नामोहरम करतो. आहे की नाही अलौकिक धाडसी तरुण ? विशेष असा की हा भारतीय तरुण ज्या काही योजना अंमलात आणतो त्या पाहताना प्रेक्षक त्याच्या खोटेपणाला तर हसत असतोच, पण त्याच्या पोरकटपणाची कींव करावी तेवढी थोडीच असे वाटू लागते. भारताचा शत्रू कोण हे नक्की सांगितलेले नसले तरी चित्रात हाँगकाँगचे नाव पंचवीस-पन्नास वेळा तरी आले असल्याने आणि पाच-दहा नकट्या नाकांचे सैनिक आणि त्यांचे अधिकारी दाखविल्याने हा शत्रू म्हणजे चिनी समजायचा ! बरे, या चिन्यांना ही भारतीय नर्तिका अडकवून ठेवायचे काय कारण ? तर त्यांना तंग करणारा भारतीय हेर तिच्या शोधार्थ नेमका हाँगकाँगमध्ये येईल म्हणून ! गंमत अशी की, हा भारतीय हेर आणि ही नर्तिका यांची पूर्वीची जरासुद्धा ओळख नाही, तरीही तो तिला सोडवायला जाणार असे शत्रूला का वाटते ? कळत नाही. (अर्थात तो तसा जातो. आपले कामही फत्ते करतो हा भाग वेगळा !) भारतीय तरुणांचे शौर्य, धैर्य, वीरश्री या गोष्टी दाखवायच्याच होत्या, तर त्या अन्य मनाला पटतील अशा तऱ्हेने सहज दाखविणे शक्य नव्हते का ? पण तो विचारही सुचलेला नाही. तेव्हा अशा या नायकाचे ' पराक्रम ' ज्यात दाखविले आहेत तो ' शतरंज ' कसा असेल याची थोडक्यात कल्पना येईल. कथेचा मूळचा गाभाच अवास्तव, बेगडी असल्यामुळे पुढील कथेचा डोलारा डळमळीत झाल्यास नवल नाही. अगदी तसेच झाले आहे. दुसरी फार महत्त्वाची गोष्ट म्हणजे या

चित्रातील प्रत्येक प्रसंग पूर्वी कधीतरी हिंदी, इंग्रजी चित्रपटांत पाहिल्याचे लक्षात येते. स्वतंत्र प्रतिभेने नटलेला एकही प्रसंग नसावा यापरते दुर्दैव कोणते ?

' शतरंज 'च्या पटकथेचे तीन तेरा वाजलेच आहेत, पण दिग्दर्शनाची गोष्टही काहीशी अशीच झाली आहे. एस. एस. वासन हे एक बडे, थोर दिग्दर्शक असा त्यांचा लौकिक; पण त्यांच्या कल्पकतेचा, बुद्धिमत्तेचा, कौशल्याचा जराही प्रत्यय चित्र पाहून येत नाही. सारे चित्रीकरण सरळधोपट मार्गाने केले आहे. वासन यांच्या दिग्दर्शनातील सांचेबंदपणा पाहून मनात विचार आला, हे असेच चित्र दिग्दर्शित करायचे तर त्याला वासन कशाला हवे होते ? कुणाही क्लॅपरबॉयला अगर लाईटमनला सांगायचे. त्याने एवढे काम निश्चित पार पाडले असते. सीन घेण्याचे तेवढे ज्ञान त्याला खात्रीने असते. एकूण दिग्दर्शनाच्या नावाने आनंद आहे.

अभिनयाची बाजू थोडीबहुत समाधानकारक आहे. चित्राचा नायक शक्तिपेक्षा युक्तीने लढतो हे वासन यांना दाखवायचे होते. त्यामुळे युक्तिबाज नायक म्हणून राजेंद्रकुमार चालू शकला. शक्तिबाज म्हणून शोभला असता की नाही हा प्रश्न आहे, पण यात तो प्रश्न उद्‌भवत नाही. राजेंद्रकुमारने त्याच्या कुवतीप्रमाणे आपले काम प्रामाणिकपणे केले आहे. खास कौतुकाची कसलीही गोष्ट त्याच्याजवळ नाही; वहीदा रेहमानजवळ त्या गोष्टी खात्रीने आहेत. तिचे दर्शन मुळात लोभसवाणे, गोड असते. त्यात अभिनयातील सफाई, सहजता, सूक्ष्मता या गोष्टी असायच्या हे मुळी ठरलेलेच ! साहजिकच तिचे काम दर्जेदार, संपन्न वाटले. मेहमूदने आकस्मिक समाधान दिले. आपला पेटंट पोरकटपणा, आचरटपणा न करता कामाचा दर्जा ओळखून ते अत्यंत संयमाने, जिद्दीने करून मेहमूद एक दर्जेदार कलावंत आहे हे पटवून दिले आहे. शशिकलाचे दर्शन फारा दिवसांनी घडले. कामातील सहजते-प्रमाणेच अंगप्रत्यंगांचे अवास्तव प्रदर्शन करण्याचा तिला मोठा हव्यास, या दोनही गोष्टींचा प्रत्यय इथे आला. इतर कलाकार नगण्य !

शंकर जयकिशन यांच्या संगीतात फारसे वैशिष्टय आढळत नाही. त्याच ढंगाच्या चाली, ते तसेच म्युझिक सारे काही सांचेबंद वाटते. तेवढ्यापुरते प्रत्येक पद आकर्षक वाटले, तरी नंतर एकही पद लक्षात राहत नाही हे अपयश फार मोठे आहे.

' शतरंज 'च्या निर्मात्यांनी पाण्यासारखा अफाट अन् अमाप पैसा खर्च केला आहे ही गोष्ट भव्य अलिशान सेटस्‌वरून सहज लक्षात येते. प्रेक्षक अधिकाधिक गार होतो तो या सेटिंग्जमुळेच !! उरलेला त्यातील आकर्षक, लोभसवाण्या रंग-संगतीमुळे आणि कौशल्यपूर्ण, दर्जेदार छायाचित्रणामुळे मुग्ध होतो. श्री. कापाडियां-सारख्या मुरब्बी छायाचित्रकाराने आपले सारे कौशल्य पणाला लावले आहे. ' शतरंज 'मध्ये जर काही पाहायचे असेल तर ते म्हणजे त्यांचे छायाचित्रण, त्याची रंगसंगती आणि सेटिंग्ज. या तीन गोष्टी सोडल्या तर चित्र पाहणे म्हणजे खऱ्या रसिकाला तरी शिक्षा वाटावी.

**— सुधीर दामले**

# पिकासो आणि मुखवट्यांचे जग

पृष्ठ २१ वरून ]

रिता करतो आहे. दुसरा एक बुभुक्षित राक्षस झोपी गेलेल्या (की मरण पावलेल्या ?) स्त्रीवर झुकला आहे...

वासनेची ही सारी भयाण रूपे. ती नुसती भयाणच नाहीत तर त्यात मूर्खपणा आणि खुळचटपणा काठोकाठ भरला आहे.

विशेष म्हणजे हा मूर्खपणा, हा खुळचटपणा इतका ठाम आणि इतका उद्धट आहे की, यश अखेर त्यांच्याच पदरात पडणार असे वाटते.

तसे पाहिले तर आपण सारेच मूर्ख, खुळचट आणि विचित्र नाहीत का ?

आपण तसे असावे, तसे व्हावे असे आपल्याला वाटत नाही. तरीदेखील तो साऱ्या मानवतेचा अपरिहार्य, अविभाज्य भाग आहे. तो आपल्याला टाळता कसा येणार ?

यदाकदाचित आपण तसे नसलो तरी हे चक्रच असे विलक्षण आहे की, आपल्याला तसे व्हावेच लागते. त्यावाचून दुसरा मार्गच नसतो. हे मुखवटे आपल्यावर लादले जातात. वाढणाऱ्या आणि क्षणाक्षणाने मृत्यूकडे नेणाऱ्या वयाचा मुखवटा हा असाच.

असे हे मुखवट्यांचे जग. एखाद्या निष्णात शल्यविशारदाच्या कौशल्याने आपला देह, आपले मन, आपला आत्मा आपल्याच पुढे उघडून ठेवणारे.

आपले भय, आपला खुळचटपणा, आपला मूर्खपणा, आपल्या वासनांची भयद रूपे, आपली अगतिकता हे सारे आपल्याला विलक्षण सामर्थ्याने दाखवून देणारे...

आणि तेही नुसत्या रेषांनी !

रेषांची ही करामत पाहिली. आणि लहानपणी शिकलेली रेषांची व्याख्याच बदलून गेली.

रेषा या केवळ दोन बिंदूंनाच सांधत नाहीत, त्या वज्रासारखे शस्त्र होऊन तुमचे मुखवटे विच्छिन्न करून टाकतात.

त्यांना हादरवून टाकणारी रुंदी असते. उंची असते. जाडी असते.

त्या तत्त्वज्ञानी असतात. विलक्षण क्रूर वस्तुसत्य तेवढ्याच निर्दयतेने तुमच्या पुढे मांडतात.

परवा अगदी अचानक भेटलेल्या पुस्तकातील रेषांचा हा समर्थ खेळ पाहिला आणि पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या मूल्यांचे नक्षीकाम असलेले मनातले ऐने कसे खळाळून भंगून गेले !

O

# तुमचे भविष्य
# आमचा अंदाज

## दि. ५ ते ११ एप्रिलाचे राशिभविष्य
## श्री. गो. जोशी, सायनाचार्य

**मेष :** व्ययस्थानातील अनेक ग्रहांमुळे आणि आठव्या मंगळामुळे, हा आठवडा खूपच ताणाचा व दगदगीचा जाणवेल. पण अपयशाचा प्रसंग सहसा येणार नाही.

उलट, ८ एप्रिलच्या बुध-शुक्र युतीपासून शिक्षणात, व्यवसायधंद्यात आशादायक वातावरण सर्वत्र निर्माण होऊ लागेल. गेल्या कित्येक महिन्यांतील रेंगाळलेली कामे दि. ८–९ पासून भराभर निपटून काढली जातील. अपेक्षित यशही पदरी पडेल.

राजकीय, सामाजिक क्षेत्रांत चुकूनही पाऊल टाकू नका. सांपत्तिक दृष्टीने अधिक सावधानता बाळगा. इष्टमित्रांचे सहकार्य अपेक्षेप्रमाणे मिळण्याची शक्यता कमी.

दि. ९ ते ११ विशेष अनुकूल काल.

**वृषभ :** मंगळाच्या तीव्र विरोधाला न जुमानता आपली पावले पुढेपुढे पडायला लागतील. एकादशांतील बुध-शुक्र युती तुम्हांला अपेक्षेबाहेर लाभाची ठरेल. प्रगतीच्या नव्या वाटा या आठवड्यापासूनच दृष्टिक्षेपात यायला लागतील.

नोकरीधंद्यातील प्रगती वेग घेऊ लागेल. काही दिव्य करून दाखवण्याच्या आशा याच काली अंकुरायला लागतील.

राहत्या जागेची विवंचना मिटेल. थोरांचे हार्दिक सहकार्य सतत मिळेल. अनपेक्षित स्वरूपाचा धनलाभही व्हावा.

नवे स्नेहसंबंध जुळून येतील. राजकीय संघर्ष मिटू शकतील. कोणत्याही कार्यात घवघवीत विजय मिळवू शकाल.

दि. ९–१०–११ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**मिथुन :** दशमस्थानी चार ग्रहांचे संमेलन भरत आहे. ही स्थिती तुमच्या प्रतिष्ठेची उंची वाढवण्यास निश्चित कारणीभूत ठरेल. सांपत्तिक अपेक्षा सफल होतील. समाजात, राजकीय क्षेत्रात तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल.

नोकरीत अनपेक्षितपणे बदली–बढतीची लक्षणे दिसायला लागतील. विरोधक तुमच्या मार्गात येण्याचे धाडस करणार नाहीत. पैसा अपेक्षेप्रमाणे मिळेल. अडचणी कोणत्याच कामात उद्‌भवणार नाहीत.

गेल्या आठवड्यातील प्रकृतीच्या तक्रारी दूर होतील. विवाहविषयक वाटाघाटी

निर्णायक स्वरूप धारण करतील.

दि. ७–८–९ अनुकूल काल.

**कर्क :** भाग्यस्थानातील सूर्यशुक्रांमुळे आपल्या कार्याला नवी दिशा लाभेल. नव्या भव्य योजना आकार घेऊ लागतील. तुमच्यातील सुप्त कलागुणांना आवाहन करणारी ग्रहरचना निर्माण होत आहे.

व्यवसायधंद्यात आणि नोकरीचाकरीत प्रगती चौफेर धावू लागेल. अनपेक्षितपणे स्थानांतर घडेल. आणि त्या स्थानांतरामुळेच आपल्या बऱ्याचशा अपेक्षा सफल होतील.

यांत्रिक क्षेत्रात, रासायनिक व्यवसायधंद्यात फार मोठ्या उलाढाली घडून यायला लागतील. पैसा चांगला मिळेलच, प्रतिष्ठाही खूप उंचावेल.

उद्योगधंद्याला अनेकांचे सक्रिय साहाय्य लाभेल.

दि. ७–८–९ या काली अनेक प्रश्न सुटावेत.

**सिंह :** चौथ्या स्तंभी मंगळामुळे सांपत्तिक ताण असह्य होईल. वाढत्या खर्चाला आळा घालण्यात फारसे यशस्वी व्हाल असे वाटत नाही. पण धनस्थानचा गुरू तुम्हांला सहसा कशाचीही वाण भासू देणार नाही. अपयश येणार नाही, अपेक्षाभंगही होणार नाही, पण लाभणारे यश अविश्रांत परिश्रमाने मिळेल.

धावपळ-धडपडीचा हा आठवडा आहे. अनेक कामे निपटून काढण्यासाठी परिश्रम खूप करावे लागतील. पैसा कितीही हाती आला तरी ओढाताण सतत जाणवतच राहील.

कौटुंबिक अनारोग्य, व्यावसायिक मतभेद, भागीदारीतील पेचप्रसंग आणि वरिष्ठांचा त्रास इ. प्रकारांमुळे मन त्रस्त बनेल.

दि. ८–९–१० थोडेफार यश मिळेल याच वेळी.

**कन्या :** पराक्रमस्थ मंगळ म्हणजे सर्व काही. यश, प्रतिष्ठा, प्राप्ती–तो सर्व काही देऊ शकतो. शिवाय गुरूचीही तुमच्यावर कृपादृष्टी आहे.

तुम्हांपैकी कित्येकांना परदेशांत जाण्याची संधी लाभेल. नवे सोयीस्कर घर लाभेल. वाहनांचीही विवंचना मिटू शकेल. कित्येक वर्षांनी इतका चांगला काल तुमच्या वाट्यास येत आहे. अशाच काली प्रयत्नांची शिकस्त करायला हवी.

विरोधकांचा आवाज बंद होईल. उद्योगधंद्याचे क्षेत्र व्यापक बनेल. साहित्याच्या क्षेत्रांत अनेकांचे लक्ष वेधून घेण्यासारखी साहित्यनिर्मिती हातून घडेल. व्यापारी जगात तुमचे स्थान उंचावेल.

दि. ६–७–१०–११ या कालाची नोंद करा.

**तूळ :** धनस्थानातील मंगळाने प्राप्ती घटेल, तर व्ययस्थानच्या गुरूमुळे खर्चाचे मान गणितश्रेढीने वाढीस लागेल. या वेळी आपण सावध राहून कितीही सावध व्यवहार केलेत तरी तुमचे अंदाजपत्रक साफ कोलमडेल.

फार मोठे व्यावसायिक धाडस करणे परिणामी हितावह ठरणार नाही. या काली इष्टमित्रांची आश्वासने साफ खोटी पडू लागतील. आवाहन करणे आणि आव्हान देणे या दोन्हीही गोष्टींपासून दूर राहाल तरच आपत्तीचे प्रसंग टळू शकतील.

अनपेक्षित स्वरूपाचे धनलाभ होण्याचा संभव कमीच.

दि. ८, ९, १० हे दिवस थोडेफार स्वास्थ्याचे जाणवतील.

**वृश्चिक :** तुमच्या आजवरच्या अविश्रांत परिश्रमाचे श्रेय याच वेळी तुमच्या पदरी टाकावे अशीच ग्रहांची इच्छा दिसते. नोकरीधंद्यासाठी केलेले सारे प्रयत्न याच वेळी अपेक्षेबाहेर यशदायी ठरतील.

नोकरीमध्ये अनेक पायऱ्या ओलांडून पुढे जाल, धंदाव्यवसायांत कधी नव्हते एवढे यश सहजासहजी पदरी पाडून घ्याल.

नव्या व्यवसायधंद्याकडे पावले वळू लागतील, आणि त्या धंद्यासाठी अनेक धनिकांचे हार्दिक सहकार्यही लाभेल.

कला-साहित्याच्या प्रांतात तुमचा दबदबा खूपच वाढेल, नवे विचार जगापुढे ठेवले जातील, प्रतिभा बहरेल, प्रज्ञा विकसेल.

दि. ९, १०, ११ विशेष प्रगतीचे दिवस.

**धनू :** व्ययस्थानी मंगळ असेपर्यंत फारशी चांगली परिस्थिती सुधारेल अशी आशा करण्यात अर्थ नाही. उधारउसनवारच करावी लागेल असे माझे म्हणणे नाही, पण ताण खूपच जाणवेल.

व्यापारधंद्यांतील व्यक्तींनी तर या वेळी फारच सावधपणे सर्व व्यवहार करायला हवेत.

नोकराचाकरांवर, इष्टमित्रांवर फारसा भरंवसा ठेवण्यात अर्थ नाही, सारी कामे जातीने केल्याशिवाय गत्यंतर नाही.

विरोधक उठाव घेण्याच्या पवित्र्यात आहेत याची दखल घ्यावीच लागेल. खोटेनाटे आरोप येण्याचाही संभव आहे, प्रत्येक गोष्टीत सावधानता बाळगणे जरूर आहे.

दि. ६, ७, ८ काहीसा अनुकूल काल.

**मकर :** बुध-शुक्रादी चार ग्रह पराक्रमस्थानी आणि गुरू भाग्यस्थानी, इतकी सर्वांगाने अनुकूल ग्रहस्थिती कित्येक वर्षांनी तुमच्या वाट्यास येत आहे. या संधीचा लाभ उठवण्याचा प्रयत्न केलात तर आपल्या बहुतेक आशा-आकांक्षा सफल होतील.

नोकरीधंद्यांत अपेक्षेबाहेर यश लाभेल. सामाजिक प्रतिष्ठा खूपच उंचावेल.

कला–साहित्य व नाट्य या क्षेत्रांत तर तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल कोणत्याही क्षेत्रात तुम्हांला प्रतिस्पर्धीच उरणार नाही.

अनपेक्षित धनलाभ होण्याचीही शक्यता आहे. सामाजिक पुढारीपण लाभणे संभवनीय आहे.

कौटुंबिक कार्याचा प्रश्नही या वेळी सुटावा.

दि. १०, ११ विशेष लाभाचा, प्रगतीचा काल.

**कुंभ** : धनस्थानातील बुध–शुक्रांचा तुमच्या सांसारिक जीवनावर व व्यवसाय-धंद्यावर प्रकर्षाने परिणाम जाणवेल. अनेक योजना या आठवड्यापासून गती घेऊ लागतील. प्रगतीच्या नव्या वाटा याच काली दृष्टिक्षेपात यायला लागतील. सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी करून दाखवाल. राजकीय कार्यक्रमांत हिरीरीने भाग घ्याल. व्यापारधंद्यात तर याच्याइतका लाभाचा काल यापूर्वी आपण क्वचितच अनुभवलेला असेल.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल. राष्ट्रीय कार्यक्रमांत भाग घ्यावा लागेल.

दि. ८, ९ ची नोंद करा.

**मीन** : तुमच्या राशीतच बुध–शुक्रांची अंशपूर्ण युती होणार आहे. ( दि. ८ ) या युतीनंतर आपणांस कोणत्याही गोष्टीबद्दल चिंता करण्याचे कारण नाही.

कला–साहित्य हे आपले खास क्षेत्र. त्यांत अनन्यसाधारण यशाचे वाटेकरी बनाल. पैशापेक्षा कितीतरी पटींनी प्रतिष्ठा लाभेल.

सौंदर्यप्रसाधने, परराष्ट्रीय व्यवहार अशा व्यवसायधंद्यांशी आपला संबंध असेल तर आपण अपेक्षेबाहेर यश मिळवाल. सार्वजनिक क्षेत्रातही भाग घ्यायचा प्रयत्न होईल.


दि. ६, ७, ९ विशेष लाभाचा काल. ○

स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

# हा प्रश्न मुळींच "गुंतागुंतीचा" नाहीं..!




"प्रकाशचें माक्याचें तेल" हा त्यावर साधा, सरळ आणि खात्रीचा उपाय आहे. तें नियमित वापरण्यास सुरुवात करा आणि पहा .... हा प्रश्न कधीं उद्‌भवलाच नाहीं, असें आपणास वाटेल! केंस गळावयाचें तर थांबतिलच, शिवाय तजेलदार, निरोगी नि लांबसडक केशसंभार आपल्या सौंदर्यांत मोलाची भर घालील.

## प्रकाशचें
# माक्याचें तेल



प्रकाश ट्रेडिंग कंपनी
गोखले रोड (नॉर्थ) दादर, मुंबई २८

MANOOS (Weekly) । 40 Paise । Regd. No. M H-049




# व्होल्गा जेव्हा लाल होते

| लेखक | प्रस्तावना | मूल्य |
|---|---|---|
| वि. स. वाळिंबे | ना. ग. गोरे | अठरा रुपये |

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे २


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस, प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**